# मानवी जीवनातील गूढ रहस्ये

(भाग ३ रा)

स्वामी दत्तावधूत

ॐ वनिता बुक्स

मुंबई – ४०० ०१२.

☯ ॐ वनिता बुक्स

☯ पुष्प नववे

© सर्व हक्क प्रकाशकाच्या स्वाधीन

| | | |
|---|---|---|
| प्रथमावृत्ती | – | २००२ |
| द्वितीयावृत्ती | – | २००५ |
| तृतीयावृत्ती | – | २०१० |
| चतुर्थावृत्ती | – | २०१२ |
| पंचमावृत्ती | – | २०१४ |
| षष्ठमावृत्ती | – | २०१६ |
| सप्तमावृत्ती | – | २०१८ |

☯ प्रकाशक

ॐ वनिता बुक्स

बी, २१३, सात आसरा सहकारी गृहनिर्माण संस्था

डॉ. एस. एस. राव मार्ग,

लालबाग, मुंबई ४०० ०१२.

दूरध्वनी : (०२२) २४१८७३३९.

☯ मूल्य : रु. १६०/–

# अनुक्रमणिका


| | | |
|---|---|---|
| १. | मानव सुखी आहे का ? | ५ |
| २. | अदृश्य शक्ती | ११ |
| ३. | ईश्वर संधी देत असतो | ३१ |
| ४. | उच्चलोकातील आत्मे | ३३ |
| ५. | अदृश्य सृष्टी | ४२ |
| ६. | संचित – प्रारब्ध – क्रियामाण | ५४ |
| ७. | मानव जन्मरहस्य | ६५ |
| ८. | मानव देहरहस्य | ९५ |
| ९. | मानव मृत्युरहस्य | ११२ |
| १०. | प्रार्थनेचा प्रभाव | ११८ |
| ११. | उद्बोधक कथा | १२६ |
| १२. | भाग्यवंत ते नर | १३३ |
| १३. | सृष्टिरहस्य | १५१ |
| १४. | ईश्वरप्राप्तीचा मार्ग | १५९ |
| १५. | ईश्वरप्राप्तीचे चार मार्ग | १८२ |

भरो शांतीने विश्व ।

व्हावे आध्यात्मिक विश्व ।

भक्ती, ज्ञान, प्रेमयुक्त ।

व्हावे अखिल विश्व हे ।।

– स्वामी दत्तावधूत

# १. मानव सुखी आहे का ?

**गे**ल्या शंभर दीडशे वर्षांमध्ये सुख साधनांची इतकी काही रेलचेल झाली आहे, की त्यामुळे बाह्यात्कारी मनुष्य खूप सुखी झाला आहे असे वाटते; परंतु मनुष्याच्या जीवनात जर डोकावून पाहिले, तर मनुष्य सुखी झालेला नसून, तो पूर्वीपेक्षा अधिक अशांत, अस्वस्थ व अधिक बेचैन झालेला दिसून येतो.

समृद्धीच्या शिखरावर पोहोचलेल्या युरोप, अमेरिका इत्यादी देशांमध्ये तसेच जपानमध्ये आत्महत्यांचे प्रमाण प्रचंड प्रमाणात वाढलेले आहे. भारतातही आत्महत्यांचे प्रमाण खूपच वाढत आहे. याशिवाय मन:शांतीच्या शोधार्थ परदेशी

लोकांचे थवेच्या थवे भारतात येत आहेत. हिंसाचाराला सर्व जगभर ऊत आलेला आहे. आरोग्यशास्त्रामध्ये प्रचंड प्रमाणात प्रगती होऊनही असंख्य नवीन प्रकारचे रोग मानवावर आक्रमण करीत आहेत. कुठलाही देश व कुठलेही राष्ट्र आज खऱ्या अर्थाने सुखी नाही. समृद्ध राष्ट्रांमध्ये काही ठिकाणे अशी आहेत की, जेथे मनुष्य संध्याकाळी सहा वाजल्यानंतर बाहेर जायला घाबरतो. दिवसाढवळ्या लोक रस्त्यावरून चालायला घाबरतात. आतंकवादाने संपूर्ण जगभर कहर माजविलेला आहे. सकाळी घराच्या बाहेर पडलेला मनुष्य संध्याकाळी जिवंत घरी परत येईल की नाही, अशी धास्ती मोठमोठ्या शहरांतील कुटुंबियांना वाटत असते.

कुठल्या ना कुठल्या कारणावरून संपूर्ण जगभर वर्षभर युद्ध व जनहानी चालूच असते. बॉम्बच्या वर्षावाने त्रस्तग्रस्त झालेले लोक जीव वाचविण्यासाठी सैरभैर पळताना टी.व्ही.वर दिसतात. प्रचंड महापुरामध्ये कार, ट्रक्स वाहून जात आहेत, अशी दृश्ये टी.व्ही.वर दिसतात.

महापुरामध्ये गावेच्या गावे वाहून गेली, लाखो लोक बेघर झाले, अशा बातम्या ऐकू येत असतात.

भूकंपाने शहरेच्या शहरे उद्ध्वस्त होत आहेत.

ज्वालामुखीच्या प्रलयंकारी स्फोटांमध्ये गावेच्या गावे

उद्ध्वस्त होत आहेत.

याशिवाय खून, गुंडगिरी, मारामाऱ्या, जातीय दंगली, आतंकवाद, बॉम्बस्फोट व क्षणाक्षणाला होणारे वाहनांचे अपघात इत्यादी सर्व गोष्टींमुळे आजचा मानव हैराण झालेला आहे, मनाने दुर्बल झालेला आहे.

सुखसाधनांची रेलचेल होऊन सुद्धा मनुष्य इतका दुःखी का ?

या प्रश्नाचे उत्तर शोधण्याचा प्रयत्न या पुस्तकात केलेला आहे.

**दुखमें सुमिरन करे । सुखमे करे न कोय ।**

**सुखमें सुमिरन करे । तो दुख काहे को होय ।।**

कबीराने या दोह्यामध्ये मानवाला दुःख का होते, याचे उत्तर दिलेले आहे.

कबीर म्हणतात, की दुःख व आपत्तींमध्ये मनुष्य ईश्वराची आठवण करतो, ईश्वराचे स्मरण करतो, ईश्वराची भक्ती करू लागतो; पण मनुष्य जेव्हा सुखी असतो, परिस्थिती सर्व बाजूंनी त्याला अनुकूल असते, अशा वेळी ईश्वराची आठवण करण्यास ईश्वराची भक्ती करण्यास, त्याला वेळ मिळत नाही. इतकेच नव्हे, तर ईश्वराविषयी साधी कृतज्ञता तो व्यक्त करत

नाही व यामुळेच शेवटी त्याच्यावर दु:खाचे पर्वत कोसळू लागतात.

सुखामध्ये मग्न असताना मनुष्य जर दान, धर्म व ईश्वरभक्ती करेल, तर माणसाला कधीही दु:ख होणार नाही. यासाठी मानवाने सुखामध्ये असताना आपल्या उत्पन्नातील कमीत कमी १५ टक्के भाग दान-धर्मात खर्च करायला हवा. जो मनुष्य २० टक्के दान-धर्मात खर्च करतो, तो या जन्मात तर सुखी होतोच; पण पुढच्या जन्मीही सुखी होतो. याशिवाय दररोज किमान एक तास ईश्वरचिंतन करायला हवे. या दोन गोष्टी केल्यास पृथ्वीतलावरील सर्व मानवांच्या नव्वद टक्के समस्या सुटतील व ते सुखी होतील.

ईश्वरभक्ती व दान या दोन गोष्टी विसरल्याने आजचा मानव दु:खी झालेला आहे. सुख व शांती हा मनाचा विषय आहे. आजच्या मानवाचे मन अस्थिर व भ्रमिष्ट असल्याकारणाने त्याला सुख-शांती मिळू शकत नाही. दान व ईश्वरभक्ती केल्याशिवाय मानवाला कधीही सुख-शांती मिळणार नाही.

मानवाला जर सुख-शांती हवी असेल, तर दान, ईश्वरभक्ती व परोपकार यांची कास धरायला हवी.

ईश्वरभक्ती, दान व परोपकार या तीन गोष्टींच्या

आचरणाने मनाला शांती व आनंद प्राप्त होतो. मानवी मन सुखाच्या साधनांचा उपभोग घेण्यास सक्षम व सशक्त बनते. ईश्वरी शक्ती त्याचे संरक्षण करू लागतात. अदृश्य सृष्टीतून त्याला मदत मिळू लागते. असा मनुष्य कोठेही गेला, तरी त्याला सर्व बाजूंनी मदत मिळते.

हे विश्व परमेश्वराने निर्माण केले असून, या विश्वाचे नियंत्रण संपूर्णपणे त्याच्या हातात आहे. विश्वामध्ये असंख्य चांगल्या शक्ती आहेत व असंख्य वाईट शक्ती आहेत. ईश्वरभक्ती, दान-धर्म व परोपकार करणारे लोक चांगल्या शक्तींच्या अधीन राहतात, तर वाईट कर्मे करणारे लोक वाईट शक्तींच्या अधीन राहतात. वाईट कर्मे करणाऱ्या लोकांवर पिशाच्च शक्तींचा अंमल चालतो. असे लोक चांगला विचार करू शकत नाहीत.

स्वार्थी, लोभी, ईर्षा, द्वेष, मत्सर करणारे लोक वाईट शक्तींच्या अधीन राहतात. वाईट शक्ती अशा लोकांवर आपला प्रभाव गाजवितात, त्यांना चांगले काम करू देत नाहीत.

ईश्वरास विसरलेल्या मनुष्यास; तसेच दान-धर्म व परोपकार न करणाऱ्या मनुष्यास अशा वाईट शक्तींकडून तसेच वाईट व्यक्तींकडून त्रास होत राहतो, म्हणून नेहमी चांगली कर्मे

करत रहावीत व ईश्वरभक्ती, दान व परोपकार करत रहावे.

पुष्कळवेळा असेही घडते की, एखाद्या सज्जन व्यक्तीला दान-धर्म, परोपकार व ईश्वरभक्ती करणाऱ्या व्यक्तीलाही दुष्ट लोकांकडून तसेच दुष्ट शक्तींकडून त्रास भोगावा लागतो, असे का होते हे कळत नाही. अशा कितीतरी लोकांच्या समस्यांविषयी ध्यानाद्वारे उत्तरे मिळविण्याचा प्रयत्न लेखकाने केलेला असून या संशोधनात जी काही थोडीफार रहस्ये लक्षात आली, ती या पुस्तकात मांडण्याचा प्रयत्न केलेला आहे. हे सर्व ज्ञान ध्यानाद्वारे मिळविलेले असल्याने, अनुभवजन्य असून, यातील सर्व पात्रे अगदी खरी आहेत. सर्वांचीच नावे देणे शक्य नसल्याने फक्त काही लोकांचीच नावे या पुस्तकात दिलेली आहेत.

जीवनामागील गूढ रहस्ये शोधण्याचा डोळसपणे प्रयत्न या पुस्तकाद्वारे केलेला आहे.

या पुस्तकाच्या वाचकांना अदृश्य सृष्टीतील जीवनाच्या अनेक दालनांचे ज्ञान होईल.

# २. अदृश्य शक्ती

**मानवी** जीवन हे अदृश्य सृष्टीतून नियंत्रित केले जाते. अदृश्य सृष्टीमध्ये एकावर एक असे स्तर असून, पृथ्वीतलावर मनुष्य कुठल्या पद्धतिने वागतात, त्यावरून ते कुठल्या स्तरातील आहेत हे लक्षात येते.

मानवाने जर स्वत:चा विकास केला नाही, तर तो ज्या स्तरातून आला त्या स्तरात अडकून पडतो व पुढे हजारो वर्षे त्याची सुटका होत नाही.

माणसाच्या मन व बुद्धीला प्रभावित करणारे अनेक मुख्य स्तर, असंख्य उपस्तर व अनंत क्षूद्र स्तर आहेत. या

सर्वांचा विचार करणे अशक्य आहे.

आपण येथे काही मुख्य स्तरांचाच विचार करू.

जे लोक ईर्षा, द्वेष, मत्सर करतात ते लोक पिशाच्च योनीत जातात; तसेच जे लोक विविध प्रकारचे गुन्हे करतात (गुंडगिरी, खून, आतंकवाद, इतरांना छळणे इत्यादी) असे लोक पृथ्वीतलावर शांततेने कधीच जगू शकत नाहीत व मृत्यूनंतर हजारो वर्षे यातनालोकात खितपत राहतात. अशा क्रूरकर्मी लोकांच्या यातनांना पारावार नसतो. हजारो वर्षे असे लोक यातनालोकात यातना भोगत राहतात. अशा लोकांचा विचारही आपण येथे केलेला नाही.

**वेताळलोक**

पृथ्वीतलावर जे लोक ताळतंत्र सोडून वागतात, म्हणजे बेताल वागतात, अशी सर्व माणसे या वेताळलोकातून पृथ्वीतलावर जन्माला आलेली असतात. या पृथ्वीतलावर आल्यानंतर अशा माणसांनी जर स्वत:मध्ये काही सुधारणा केली, तर मृत्यूनंतर ते वरच्या लोकांमध्ये जाऊ शकतात. पृथ्वीतलावरील जवळजवळ पंचाहत्तर टक्के माणसे वेताळलोकातून जन्माला आलेली असतात, त्यामुळे

पृथ्वीतलावरील पंचाहत्तर टक्के लोकांना स्वार्थाशिवाय दुसरे काही सूचत नाही. त्यांचे वागणे पूर्णपणे बेताल असते. परोपकार करणे त्यांना जमत नाही. व्यवस्थित वागणेही त्यांना जमत नाही.

ईश्वराची अनेक माध्यमे पृथ्वीतलावर वावरत असतात. ही ईश्वराची माध्यमे अशा स्वार्थी लोकांना योग्य मार्गावर आणण्यासाठी खूप प्रयत्न करतात. जर अशा माध्यमांच्या प्रयत्नांना अपयश आले, तर या बेताल वागणाऱ्या लोकांच्या शिक्षेत वाढ होते.

पैसा मिळविणे, जेवणे व झोपणे या व्यतिरिक्त ज्यांना काही कळत नाही, जे फक्त स्वत:चाच विचार करतात, अशा माणसांना पशू भावातील माणसे असे म्हणतात. अशा माणसांनी जर स्वत:ची प्रगती केली नाही, तर मृत्यूनंतर अशा माणसांना विविध प्रकारच्या शिक्षा भोगाव्या लागतात.

प्रत्येक माणसाला आपण खूप विद्वान आहोत, हुशार आहोत असे वाटते; परंतु मानवाच्या बुद्धीचे कनेक्शन तो ज्या लोकातून जन्माला आला आहे, त्या लोकाशी जोडलेले असते. आपल्यातील बुद्धीचा योग्य वापर करून मानवाने स्वत:चा विकास घडवून आणायला हवा. असे मानवाने जर

केले नाही, तर आयुष्यभर तो पशूभावात राहतो व मृत्यूनंतर वेताळाचा गुलाम होतो.

### भैरवलोक उर्फ क्षेत्रपाललोक

वेताळाच्या प्रांतातून ज्यांची सुटका झाली असे लोक पुढे भैरवाच्या प्रांतात जातात. अनेक प्रकारचे भैरव असून, त्यांची एकूण संख्या किती आहे ते समजण्यास मार्ग नाही. या भैरवांची रूपे फार विचित्र असतात.

धड (शरीर) माणसाचे तर शिर प्राण्यांचे, अशी यांची रूपे असतात. वेताळावर यांचे अधिपत्य चालते. त्यामुळे समाजातील जवळजवळ दहा हजारातील नऊ हजार नऊशे नव्याण्णव व्यक्तींवर यांची सत्ता चालते.

वेताळ व भैरव प्रांतातील शक्ती माणसाला परमार्थात टिकू देत नाहीत व परमार्थ करू देत नाहीत. यामुळे परमार्थाच्या प्रांतातील ९९ टक्के साधक भूत-भैरवांच्याच उपासना करतात व एखादी क्षूद्र सिद्धी प्राप्त करतात. या क्षूद्र सिद्धीच्या आधारे ते लोकांना अनेक चमत्कार करून दाखवितात; परंतु अशा माणसांच्या आत्म्याचा विकास मुळीच झालेला नसतो. अशा भूत-पिशाच्चांच्या साधना करणाऱ्या साधकांना मृत्यूनंतर पिशाच्चलोकामध्ये हजारो वर्षे

काढावी लागतात.

दान-धर्म, दया व परोपकार, ईश्वरसेवा आणि सत्पुरुषांची सेवा यांच्या आधाराने मनुष्य भूत, भैरव, वेताळ यांच्या कब्जातून सुटू शकतो; परंतु बऱ्याच लोकांना हे जमत नाही. काही लोक स्वार्थापुरती देवभक्ती करतात, थोडाफार दानधर्मही करतात, पण तोही स्वार्थासाठी केलेला असतो. अशा स्वार्थी लोकांनी केलेला दान-धर्म ईश्वरापर्यंत जाऊन पोहोचत नाही. त्यांनी दान केलेल्या रकमेच्या दहा पटीने रक्कम ईश्वर त्यांना देतो व स्वत:ची सुटका करून घेतो.

नि:स्वार्थी बुद्धीने दान केले असताना दानाच्या अनेक पटीने आपल्याला परत मिळत असते व त्याचबरोबर आशीर्वादही मिळत असतात.

वरील वर्णनावरून मनुष्याच्या बुद्धिमत्तेला कितपत अर्थ आहे, हे कळून येईल.

मनुष्याला होणारी बुद्धी ही त्याच्या पूर्वजन्मातील कर्मानुसार होत असते. वातावरणातील शक्ती मानवाची कर्मे जर चांगली नसतील तर सुखाने जगू देत नाहीत.

एकंदरीत ज्याची पूर्वजन्मीची व या जन्मीची कर्मे

चांगली आहेत, असा मनुष्य चांगल्या शक्तींच्या अंतर्गत राहतो. ज्याची पूर्वजन्मींची तसेच या जन्मीची कर्मे वाईट आहेत, असा मनुष्य वाईट शक्तींच्या अंमलाखाली राहतो. अशी माणसे चांगली संगत मिळूनही सुधारत नाहीत.

### रुद्र

जेव्हा अनेक लोक खूप पाप करतात व जगात पापाची वाढ होते, तेव्हा वातावरणातील रुद्रशक्ती पृथ्वीवर युद्ध, भूकंप, जलप्रलय, वादळे इत्यादी आपत्ती आणतात. चोऱ्या व लुटमार अशा घटना वाढतात.

मनुष्य दान-धर्म व परोपकार इत्यादी किमान गोष्टी विसरून जेव्हा स्वार्थाने किंवा अहंकाराने वागू लागतो; स्वार्थ, लोभ बळावतो, धनसंग्रह करण्याची वृत्ती जेव्हा बळावते, समाजात दुर्गुणांची जेव्हा वाढ होते, अशा वेळी समाजाला शिक्षा करण्यासाठी चोरी, दरोडे, लुटमार, हत्या, युद्ध, भूकंप, आतंकवाद, चक्रीवादळे इत्यादी रूपाने रुद्रशक्ती कार्य करू लागतात. या सर्व शक्ती समाजावर आघात करीत असतात, समाजावर आघात करून समाजाला ईश्वराची आठवण करून देत असतात.

जेव्हा समाजामध्ये चुकीच्या चालीरितींची भरमसाट वाढ होते व समाज जेव्हा दया व परोपकार इत्यादी सद्गुणांना विसरतो व चुकीच्या चालीरितींना चिकटून बसतो, अशा वेळी रुद्रशक्तींच्या कोपाला समाजाला तोंड द्यावे लागते.

मानवाने मोठ्या मनाने वागावे, प्रेमाने वागावे, परोपकार करावा, दान-धर्म करावा, ईश्वरभक्ती करावी, ध्यान करावे, इतरांना आनंद देत जगावे, अशी परमेश्वराची अपेक्षा असते.

ईश्वरी इच्छेच्या विरुद्ध मनुष्य स्वार्थाने वागतो, कपटाचरण करतो, त्यामुळे संपूर्ण समाजाच्या प्रारब्धाचा तोल बिघडतो. सामूहिक प्रारब्ध विकृत होते व त्यामुळे समाजामध्ये विकृती वाढू लागतात व सर्व समाजाला त्याची फळे भोगावी लागतात व शेवटी रुद्रशक्तीचा कोप होतो. या रुद्रशक्तीच्या कोपामध्ये गावेच्या गावे नष्ट होतात. नकाशावरून देश पुसले जातात. प्रचंड प्राणहानी होते. स्वार्थाने वागणाऱ्या समाजाला, देशाला, त्यांच्या कर्माची फळे भोगावी लागतात. सामूहिक जनसंहाराची ही खरी कारणे होत.

## चांगल्या व वाईट शक्तींचा मानवी बुद्धीवरील प्रभाव

राम नावाचा एक अतिशय चांगला सद्‌भक्त माझ्याकडे येत असे. तो अतिशय सज्जन, परोपकारी, नि:स्वार्थबुद्धीचा होता. त्यामुळे माझे त्याच्यावर खूप प्रेम होते.

आपण स्वयंपाक करावा व लोकांना खाऊ घालावे असे त्याला नेहमी वाटत असे व त्यामुळे तो स्वयंपाकात मदत करण्यासाठी जात असे; परंतु ज्या ज्या वेळी तो स्वयंपाकात मदत करण्यासाठी जाई त्या त्या वेळी काहीतरी गडबड होत असे. एकदा तर शंभर किलो भात शिजेल एवढे मोठे पातेले त्याने गॅसवर ठेवले. त्या पातेल्याचा तळ पूर्ण वितळून गेला व पातेल्याला भाकरीच्या आकाराएवढे एक मोठे भोक पडले.

असे का होते? याचा शोध घेण्यासाठी मी ध्यानमार्गाने प्रयत्न केला, तेव्हा असे आढळून आले की, त्याच्या जवळच्या नात्यातील काही आत्मे परलोकातील अत्यंत खालच्या दर्जामध्ये निवास करत असून, विविध प्रकारच्या यातना भोगत आहेत. जोपर्यंत त्यांना सद्‌गती मिळत नाही, तोपर्यंत ते रामला सोडणार नाहीत व त्याला सन्मार्गाने पुढे

जाऊ देणार नाहीत.

हे लक्षात आल्यानंतर मी त्याला आश्रमात काम करण्यास मनाई केली व एका ठिकाणी बसून ईश्वरचिंतन कर असे सांगितले.

हे उदाहरण फक्त एवढ्यासाठीच दिले आहे, की सज्जन व नि:स्वार्थ माणसाचे पूर्वज जर पिशाच्चलोकात असतील, तर आपला वंशज सुद्धा आपल्याच लोकात यावा, त्याने पुण्यकर्म करू नये, सत्पुरुषांची सेवा करू नये, त्याला पुण्य प्राप्त होऊ नये, म्हणून अदृश्य सृष्टीतील आत्मे विविध प्रकारच्या उचापती करत असतात.

आणखी एक सज्जन गृहस्थ माझ्या माहितीत होते. या सद्‌गृहस्थाच्या हातून नकळत काही गोष्टी अशा घडत असत, की आपण जे काही करत आहोत ते चूक आहे, असे त्यांना वाटत नसे.

त्यांना एखाद्या मित्राने मी तुमच्या घरी येतो असे म्हटले, की ते लगेच म्हणत, 'मी उद्या घरी नाही, येऊ नका!' अशा प्रकारे आपल्या घरी कोणी येऊ नये अशी व्यवस्था ते बेमालूमपणे गोड बोलून करीत असत.

हा सज्जन गृहस्थ असे का करतो ? हे बरेच दिवस माझ्या लक्षात येत नव्हते. यात आणखी एक वैशिष्ट्य असे होते, की हा फक्त सद्भक्तांना घरी येऊ नका असे म्हणत असे. त्याच्या नातेवाइकांचे मात्र तो स्वागत करीत असे.

एक दिवस मला त्याच्या वागण्याचे रहस्य कळले.

याचे सर्व पूर्वज प्रेतलोकात अडकून पडलेले होते व मृत्यूनंतर हा सुद्धा आपल्या लोकात यावा म्हणून ते आत्मे आपल्या वंशजाला अशा प्रकारची बुद्धी देत होते.

ईश्वरभक्त जर त्याच्या घरी गेले असते व तेथे त्यांनी काही खाल्ले, जेवले असते, तर त्या गृहस्थाला पुण्य मिळाले असते व त्याच पुण्याईच्या बळावर तो प्रेतलोकाहून वरच्या लोकात गेला असता. असे घडू नये म्हणून पूर्वजांचे आत्मे त्याला तशी बुद्धी देत होते.

वरील उदाहरणांवरून एक गोष्ट लक्षात येते, की पूर्वजांचा उद्धार झाल्याशिवाय आपला उद्धार होत नाही, म्हणून भक्ती, दान व परोपकार विपुल प्रमाणात करायला हवा. असे केले असता आपलाही उद्धार होतो व पूर्वजांचाही उद्धार होतो.

यात आणखी एक महत्त्वाची गोष्ट माझ्या लक्षात आली, ती म्हणजे, पुण्य मिळविण्याचे अनेक मार्ग असून, प्रत्येक मार्गाचे एक विशिष्ट फळ असते. अदृश्य सृष्टीतील आत्मे अथवा शक्तींनी एखादा विशिष्ट मार्गच अडवून धरलेला असतो. बाकीचे मार्ग त्यांनी मोकळे सोडलेले असतात.

उदाहरणार्थ, राम इतर अनेक मार्गाने पुण्य मिळवत होता. फक्त आश्रमातील अन्नदानाच्या कार्यात तो भाग घ्यायला गेला, की तेथे काहीतरी गडबड होत असे. म्हणजे तेवढ्या एकाच शाखेमध्ये त्याचा मार्ग कोणीतरी रोखून धरत असे.

दुसरे सद्गृहस्थ ईश्वरभक्ती व दानधर्म खूप करत असत. फक्त सद्भक्त, सज्जनांना ते आपल्या घरी येऊ देत नसत. तिथे कोणीतरी त्यांची वाट रोखून धरत असे.

वरील दोन्ही उदाहरणे ही अत्यंत सद्भक्त व सज्जनांची आहेत. जर सज्जन, सद्भक्तांची परिस्थिती अशी होते, तर दुष्ट-दुर्जनांचे काय होत असेल याचा विचार वाचकांनीच करावा.

बऱ्याच वर्षांपूर्वी मला एक मुलगा भेटला होता. हा मुलगा अतिशय तेजस्वी व खूप देखणाही होता. त्याच्या

देहातून दिव्य स्पंदने बाहेर पडत होती. हा मुलगा सतत ईश्वरभक्ती करीत असायचा व खूप परोपकार, दान-धर्म करीत असायचा, इतके असूनही या मुलाला खूप दुःख भोगावे लागत असे. अंगी अनेक सद्गुण असूनही तो अनेक संकटांना तोंड देत होता. काहीही कारण नसताना कित्येक वेळा त्याला मारही खावा लागला. त्याचे असे का होते म्हणून ध्यानाद्वारे उत्तर मिळविण्याचा प्रयत्न केला. त्यात असे आढळून आले की हा मुलगा पूर्वजन्मी साधक होता. याने खूप साधना केली होती व शक्ती मिळविल्या होत्या. या शक्तींचा गैरवापर झाल्याने या जन्मी त्याला त्रास भोगावा लागत आहे. त्याला योग्य ते मार्गदर्शन करून पुन्हा असा त्रास होऊ नये म्हणून व्यवस्था केली.

कर्माची फळे चांगली अथवा वाईट, जी काही असतील, ती योग्याला सुद्धा भोगावीच लागतात. यातून कोणीही सुटत नाही.

मी एक व्यक्ती अशीही पाहिली आहे, की त्या व्यक्तीला नेहमी चांगली माणसे भेटतात. वाईट मनाचा मनुष्य त्या व्यक्तीजवळ टिकू शकत नाही. स्वार्थी, दुर्गुणी माणसे त्या व्यक्तीजवळ राहू शकत नाहीत. अनेक सज्जन लोकांचे कल्याण

या व्यक्तीकडून झालेले आहे. सर्व प्रकारची सत्कर्मे या व्यक्तीच्या हातून होतात. पारमार्थिक दृष्टीने जितका विकास होणे आवश्यक आहे, तितका या व्यक्तीचा झालेला आहे.

अशा व्यक्ती या पृथ्वीतलावर फारच क्वचित आढळतात. ईश्वराचे विशिष्ट कार्य करण्याकरिताच अशा लोकांचा जन्म झालेला असतो. वातावरणातील दैवी शक्ती अशा व्यक्तींच्या माध्यमाद्वारे पृथ्वीतलावर खूपच चांगले कार्य करत असतात. अशा व्यक्तींच्या आसपास देवता वावरत असतात.

अशा व्यक्तींच्या आशीर्वादाने अनेकांचे कल्याण होत असते. अशा व्यक्तींना देवच म्हटले पाहिजे.

आसुरी शक्तींच्या अंमलाखाली राहणारे लोक दंभ, दर्प, अभिमान, अहंकार इत्यादी तामसी वृत्तीने भरलेले असतात. अशा मनुष्यांना ईश्वर सुधारण्याची संधी देतो.

एखाद्या देवतेच्या, महात्म्याच्या अथवा सद्गुणी स्त्री अथवा पुरुषाच्या सहवासात अशा लोकांना ठेवले जाते. त्यांना सुधारण्याची संधी दिली जाते. पाच-सात वर्षे संधी देऊनही जर हे लोक सुधारले नाहीत, तर पुनश्च पिशाच्चलोकात, म्हणजे प्रेतलोकात त्यांची रवानगी केली जाते.

अदृश्य सृष्टीमध्ये असंख्य स्तर असून, प्रत्येक स्तरामध्ये वेगवेगळ्या शक्ती राहतात. या वेगवेगळ्या शक्ती माणसांना विविध प्रकारच्या बुद्धी प्रदान करत असतात. विविध प्रकारच्या प्रवृत्ती माणसामध्ये निर्माण करतात. विविध प्रकारचे स्वभाव माणसामध्ये निर्माण केले जातात. अहंकाराने भ्रमिष्ट झालेले मानव हे सर्व आपणच करत आहोत, अशा भ्रमामध्ये राहतात.

पूर्वजन्मामध्ये ज्यांनी दुष्ट कर्मे केलेली असतात अशा लोकांना अहंकार जास्त असतो, असे लोक खूप तामसी असतात. ईर्षा, द्वेष, मत्सर इत्यादी प्रवृत्तींनी ते भरलेले असतात. अशा लोकांवर पिशाच्चांची सत्ता चालते व मृत्यूनंतर अशी माणसे पिशाच्च होतात.

## कंजूषपणा

असे म्हणतात, की एखाद्या श्रीमंत व्यक्तीला भिकेचे डोहाळे लागले, की ती व्यक्ती कंजूष होते. वातावरणातील अदृश्य दुष्ट शक्ती अशा व्यक्तीच्या बुद्धीवर आपला अंमल गाजवितात व अशा व्यक्तीला पुण्य मिळू नये, कुणाचे आशीर्वाद मिळू नयेत, अशी व्यवस्था करतात व त्याचबरोबर

अशा व्यक्तींच्या मनात विविध प्रकारचे भ्रम निर्माण करतात. या भ्रमामुळे कंजूष व्यक्तीला आपण जे काही करत आहोत ते अचूक आहे, बरोबर आहे असे सारखे वाटत राहते. अशा कंजूष माणसाची संपत्ती विविध मार्गाने नष्ट होते. अशी व्यक्ती या जन्माच्या अखेरीस अथवा पुढील जन्मी भिकारी बनते. त्याची सर्व संपत्ती अति लोभामुळे नष्ट होते. अशी व्यक्ती कर्जबाजारी होते. त्याची स्थावर इस्टेट मातीमोल भावाने विकली जाते. मृत्यूनंतर अशा व्यक्तीला असंख्य वर्षे पिशाच्चलोकात काढावी लागतात. पिशाच्चलोकात असंख्य वर्षे काढल्यानंतर मानवेतर योनीत अनेक जन्म घालवावे लागतात व त्यानंतर अशा आत्म्यांना भिकारी म्हणून पृथ्वीतलावर जन्म मिळतो.

**अशाच एका कंजूष माणसाची ही कथा...**

या माणसाकडे भरपूर पैसा असूनही या माणसाला व त्याच्या पत्नीला नेहमी 'आम्ही कंगाल आहोत, आमच्याकडे काही नाही, आम्ही अगदी भिकारी आहेत,' असे वाटत असे. पैसे वाचविण्यासाठी ते प्रयत्नांची पराकाष्ठा करीत. पुष्कळवेळा उपाशीही रहात असत. असे करता करता एक दिवस त्यांच्या घरात चोरी झाली व सर्व संपत्ती चोर लुटून

घेऊन गेले व खऱ्या अर्थाने ते कंगाल व भिकारी झाले.

संपत्ती तर चोरांनी लुटून नेलीच; पण या कंजुषांना असा काही चोप दिला, की त्यातून ते कधीही ठीक होऊ शकले नाहीत. अक्षरश: भिकाऱ्यापेक्षाही जास्त दैन्यवाणी परिस्थिती झाली व अशा स्थितीतच त्यांचा अंत झाला.

एकेकाळी भरपूर श्रीमंत असणाऱ्या या कंजुषांना मृत्यूसमयी पोहोचविण्यास सुद्धा कोणी नव्हते.

एक गृहस्थ खूप कंजूष होते; परंतु त्यांच्या पूर्वपुण्याईने एका सत्पुरुषाची व त्यांची भेट झाली. सत्पुरुषाने त्यांना दान-धर्म करण्याचा सल्ला दिला; परंतु दान-धर्म म्हणजे भिकाऱ्याला पाच-दहा पैसे देणे असे त्याला वाटले. त्यामुळे आपण तर नेहमीच दान-धर्म करत असतो, असा त्याने स्वत:चा समज करून घेतला. परिणाम असा झाला, की पुढे त्याचे चार लाखांचे नुकसान झाले व मग तो म्हणू लागला...

'मी दररोज सकाळी आंघोळ करून देवाला नमस्कार करतो, स्तोत्रवाचन करतो, यथाशक्ती दान-धर्म करतो आणि तरीसुद्धा माझे असे का होते?'

या महामूर्ख माणसाला हे माहीत नव्हते, की ईश्वर

त्याची गणना कंजूष माणसांमध्ये करत आहे. सर्वसाधारणपणे वरील गोष्ट पृथ्वीतलावरील हजारापैकी नऊशे नव्वद लोकांना लागू पडते. माणसे दान-धर्म, परोपकार करत नाहीत; पण आपण खूप सज्जन आहोत, आपण खूप दान-धर्म, परोपकार करत आहोत अशा भ्रमात राहतात. हजारो माणसे जेव्हा अशा संकुचित वृत्तीने वागतात, तेव्हा सामूहिक प्रारब्धाचे परिणाम म्हणून भूकंप व जलप्रलयासारख्या आपत्ती येतात.

**एकमेका सहाय्य करू । अवघे धरू सुपंथ ।।**

हे मानवी जीवनाचे खरे सूत्र आहे. हे सूत्र सोडून मनुष्य जेव्हा बेताल वागू लागतो, तेव्हा सामाजिक जीवनाचा तोल बिघडू लागतो.

परलोकामध्ये स्वार्थाला महापाप समजले जाते. केवळ स्वत:चाच विचार करणारी माणसे पराकोटीची स्वार्थी असतात. अशा माणसांना मृत्यूनंतर हजारो वर्षे अंध:कारमयलोकात रहावे लागते. दुर्दैवाने पृथ्वीतलावर अशाच माणसांचा भरणा जास्त आहे व स्वार्थ हेच पृथ्वीतलावरील सर्व समस्यांचे मूळ आहे.

स्वार्थी व कंजूष माणसांच्या संगतीत राहण्याने सद्भक्त व सदाचारी लोकांचेही खूप नुकसान होते. सद्भक्त व

सदाचारी व्यक्तींची सूक्ष्मशरीरे पवित्र असतात. स्वार्थी, लोभी, कंजूष माणसांच्या सहवासात जर सदाचारी व्यक्ती सतत राहिली, तर कालांतराने ही सदाचारी व्यक्ती सुद्धा बिघडू शकते. म्हणून दान-धर्म, परोपकार करणाऱ्यांनी, इतरांच्या सतत उपयोगी पडणाऱ्या व्यक्तींनी स्वार्थी व कंजूष माणसांपासून दूर रहावे. अन्यथा सदाचारी व्यक्तींची पुण्याई नष्ट अथवा दूषित होण्याची शक्यता असते. म्हणून 'असंगाशी संग प्राणाशी गाठ' असे म्हटले जाते. याचा अनुभव मला अनेकदा आला. त्यातील एक अनुभव इथे सांगितल्याशिवाय राहवत नाही.

एकदा एका महाकंजूष माणसाच्या बिछान्यावर झोपण्याची पाळी माझ्यावर आली. त्या रात्री मला भयंकर त्रास झाला. त्या माणसाच्या कंजूषपणामुळे भावी काळात त्याच्यावर कोठकोठल्या आपत्ती ओढवतील हे मला दिसून आले; तसेच मृत्यूनंतर त्या माणसाला; तसेच त्याच्या घरातील सर्वांना कशा यातना भोगाव्या लागतील याचेही ज्ञान झाले. याशिवाय या माणसाला दैवी शिक्षा म्हणून मनुष्येतर योनीत कसे जन्म घ्यावे लागतील हेही दाखविले गेले.

अशा प्रकारच्या घटना सविस्तर लिहायच्या नसतात,

म्हणूनच याविषयी मी जास्त काही लिहीत नाही. फक्त एवढेच सांगतो की, कंजूष माणसांची रवानगी यातनालोकात होते व शेकडो वर्षे यातना भोगल्यानंतर त्यांना त्यांच्या कर्मानुसार अशुभ पशू, अशुभ पक्षी, प्राणी अशा योनीत जन्म मिळतो. यावरून आणखी एक गोष्ट लक्षात येते, की शुभ प्राण्यांच्या योनीत (म्हणजे गाय, पोपट, हंस, मोर इत्यादी) जन्म मिळण्यासाठी सुद्धा थोड्याफार पुण्याईची आवश्यकता असते व आजकालच्या श्रीमंत व सुखवस्तू माणसांजवळ एवढी सुद्धा पुण्याई नाही याची खंत वाटते.

एक दहा-बारा वर्षांची मुलगी माझ्याकडे यायची. तिच्याकडून मी भरपूर स्तोत्रपठण, जप, साधना करून घेतल्या. नंतर ती मोठी झाली, तिचे लग्न झाले व बऱ्याच वर्षांनी ती मला भेटली. थोडेफार तिच्याशी बोलल्यानंतर मी ध्यानाला बसलो. ध्यानामध्ये मला खूप त्रास होऊ लागला. तिच्या सासरची माणसे खूप कंजूष व स्वार्थी असून, मृत्यूनंतर तिच्या सासरच्या लोकांना हजारो वर्षे यातना भोगाव्या लागतील; तसेच मनुष्येतर योनीत (अशुभ प्राण्यांच्या योनीत) जन्म घ्यावे लागतील, याचे ज्ञान मला झाले. ध्यानातून उठल्यानंतर मी त्या मुलीला सांगितले... ''मनुष्याचा जन्म

ईश्वरप्राप्तीसाठी आहे. आध्यात्मात प्रगती करण्यासाठी आहे. तू जास्तीत जास्त ईश्वरभक्ती, नामस्मरण, जप व दान करून स्वत:चा उद्धार करून घे, अन्यथा तुलाही तुझ्या सासरच्या लोकांबरोबर विविध प्रकारच्या यातनालोकात भटकत रहावे लागेल.''

ईश्वराने जीवन निर्माण केले. मृत्यू नावाची कुठलीही गोष्ट या जगात नाही. हौसेने आपण एखादे चांगले कापड विकत घेतो. त्याचा शर्ट शिवतो. कालांतराने तो शर्ट जीर्ण होतो, फाटतो व मग तो आपण फेकून देतो. त्याचप्रमाणे आपण हे शरीर धारण करतो.

चांगली-वाईट कर्मे करतो व या शरीराच्या मृत्यूनंतर कर्माप्रमाणे आपल्याला नवीन शरीर प्राप्त होत असते. मरते फक्त शरीर! आपण सदैव जिवंतच असतो! सत्कर्मे आपल्याला दिव्य व प्रकाशमय शरीरे प्राप्त करून देतात, तर आपलीच दुष्कर्मे व आपल्यातील दुष्प्रवृत्ती-स्वार्थ, लोभ, कंजूषपणा इत्यादी आपल्याला अशुभ प्राणी, पशूंची शरीरे प्राप्त करून देतात.

# ३. ईश्वर संधी देत असतो

**विविध** स्तरांवरील आत्म्यांना मनुष्य जन्म देऊन परमेश्वर त्या आत्म्यांसाठी मोक्षाचे द्वार उघडत असतो.

मनुष्य देह हे परमेश्वराने दिलेले एक वाहन असून, या वाहनात बसून आत्म्याने ईश्वराच्या दिशेने प्रवास करायचा असतो परंतु मनुष्य जन्म प्राप्त झाल्यानंतर मानव ईश्वराच्या दिशेने प्रवास करण्याऐवजी स्वत:च्या शरीराचे चोचले पुरवण्यात आयुष्य फुकट घालवितो व ईश्वराने दिलेली संधी गमावितो. मृत्यूनंतर अशा मानवांना ते ज्या लोकातून जन्माला आले त्याच लोकांत ईश्वर त्यांची रवानगी करतो.

मनुष्य जन्म प्राप्त झाल्यानंतर प्रेम, परोपकार,

ईश्वरभक्ती व दान या चार सद्‌गुणांच्या आश्रयाने मानवाने स्वत:चा उद्धार करून घ्यायचा असतो. हे चार सद्‌गुण मानवाला ईश्वरापर्यंत नेऊन पोहोचविण्याला समर्थ आहेत. याशिवाय मानवाला मार्गदर्शन करण्यासाठी सत्पुरुष सद्‌ग्रंथ निर्माण करतात. अशाप्रकारे ईश्वर मानवाला त्याच्या उद्धाराचा मार्ग मोकळा करून देत असतो. आपल्या उद्धाराच्या दिशेने मानवाने काही प्रगती न केल्यास संकटे, त्रास, दु:ख, समस्या, कटकटी या सर्व गोष्टी मानवाला ईश्वराची आठवण करून देण्याचा प्रयत्न करतात.

अगदी खालच्या दर्जाच्या माणसापासून ते श्रीमंत माणसापर्यंत सर्वांना उद्धाराची संधी अनेक वेळा दिली जाते. इतके करूनही जर मानव सुधारला नाही, तर पुढे भयंकर शिक्षांना तोंड द्यावे लागते.

मागील प्रकरणामध्ये अदृश्य सृष्टीमध्ये कसे स्तर असतात व त्या स्तरांमध्ये कुठल्या प्रकारचे आत्मे वास्तव्य करतात हे पाहिले. पुढच्या प्रकरणात आणखी काही स्तरांची माहिती घेऊ.

# ४. उच्चलोकातील आत्मे

### यक्ष-यक्षिणी

या लोकातील आत्मे हे मुख्य करून कलाकार असतात. विविध कलांमध्ये ते निपुण असतात परंतु आध्यात्मिकदृष्ट्या ते उन्नत नसतात.

पृथ्वीतलावरील कलाकार या यक्षलोकातून जन्माला आलेले असतात. पृथ्वीतलावरील डॉक्टर्स, इंजिनिअर्स, शिल्पकार, वस्त्रोद्योगातील लोक असे बरेचसे लोक या लोकातून जन्माला आलेले असतात. खावे, प्यावे व आनंदात रहावे अशा वृत्तीचे लोक या लोकातून आलेले असतात.

या आत्म्यांनी अधिक प्रगती करावी, म्हणून ईश्वराने त्यांना पृथ्वीतलावर पाठविलेले असते. यांनी प्रगती न केल्यास मृत्यूनंतर ईश्वरी शिक्षांना तोंड द्यावे लागते.

दान, ईश्वरभक्ती, प्रेम व परोपकार या गोष्टींच्या आचरणाबरोबरच ध्यान व हिमालयातील तीर्थक्षेत्रांचे दर्शन व आत्मज्ञानाच्या प्राप्तीसाठी लोकांनी प्रयत्न केल्यास अशा लोकांची आध्यात्मात प्रगती होण्याची शक्यता असते. अशा लोकांनी अहंकार सोडून अतिशय नम्रतेने वागले पाहिजे; तरच यांची प्रगती होते.

**गंधर्वलोक**

'पृथ्वीतलावरील कर्णमधुर संगीत हे गंधर्वलोकातील आत्म्यांकडून निर्माण केले जाते.'

'पृथ्वीतलावरील कानठळ्या बसविणारे कर्णकर्कश संगीत हे पिशाच्चलोकातून आलेल्या आत्म्यांकडून निर्माण केले जाते.'

'गंधर्वलोकातील आत्मे हे संगीतप्रेमी असतात. जे गाणारे ते गंधर्व, असा गंधर्व शब्दाचा अर्थ आहे.'

'पृथ्वीवरील गीत, संगीत, गायन, वादन व नृत्य या विषयातील सर्व लोक हे गंधर्वलोकातून जन्माला आलेले

असतात व पृथ्वीतलावर कर्णमधुर संगीताची निर्मिती करतात.'

गायनामुळे अशा लोकांचे मन अतिशय प्रसन्न असते. ईश्वरभक्ती, प्रेम, परोपकार व दान इत्यादी सद्गुणांचे आचरण, तसेच ध्यान नेहमी करत राहिल्यास या लोकांचा उद्धार एकाच जन्मामध्ये होतो परंतु ईश्वराचा विसर पडल्यास अशा लोकांना दारिद्र्य येते व पश्चात्ताप करण्याची वेळ येते. परंतु अशा लोकांची फारशी अधोगती होत नाही. ईश्वर अशा लोकांना सांभाळून घेतो.

### अप्सरालोक

अप्सरांचे अनेक प्रकार असून, स्वर्गलोकातील अप्सरा, ज्या पृथ्वीतलावर जन्म घेतात, त्या नर्तिका होतात. पैसा, प्रसिद्धी व सौंदर्य यांना प्राप्त होते. पृथ्वीवरील आपले जीवन व्यतित करत असताना यांनी जर आध्यात्मिक चिंतन केले, तर यांचा उद्धार होतो. तशी संधी यांना दिली जाते.

### जल अप्सरा

अप्सरालोकामध्ये आणखी एक प्रकार आहे. यांना जल अप्सरा म्हणतात. ही एक पिशाच्चांतील योनी असून, हे आत्मे पाण्याच्या आश्रयाने राहतात, म्हणून यांना जल अप्सरा म्हणतात.

वयात आलेल्या मुलींना जल अप्सरांची बाधा होते. पुष्कळवेळा या लोकातून मुलीच्या रूपाने आत्मे जन्म घेतात. शंभरातील कमीत कमी दहा-पंधरा मुली जल अप्सरा या योनीतून आलेल्या असतात.

ईश्वराने त्यांना उद्धाराची संधी दिलेली असते. अंगात येण्यासारखे प्रकार अशा मुलींच्या किंवा स्त्रियांच्या बाबतीत घडतात.

अशा मुलींनी, स्त्रियांनी भरपूर जप केल्यास त्यांची प्रगती होते; परंतु हे आत्मे अतिशय अहंकारी असतात, त्यामुळे त्यांची प्रगती होत नाही व मृत्यूनंतर असे आत्मे पुनश्च पाण्यामध्ये निवास करतात. शेकडो वर्षे पुन्हा त्यांना मनुष्य जन्म मिळत नाही.

**नागलोक**

सर्पांच्या असंख्य जाती असून, या सर्पलोकातूनही काही आत्मे पृथ्वीतलावर जन्म घेतात. सर्पलोकातून जन्माला आलेले स्त्री-पुरुष स्वभावाने पराकोटीचे हट्टी, अहंकारी, अतिशय द्वेष करणारे, मनात राग धरणारे व सूड बुद्धीचे असतात.

सर्पातही अनेक जाती आहेत. यात एक सर्प असा

असतो की, त्याला ब्राह्मण सर्प म्हटले जाते. यांना देवता सर्प असेही म्हणतात. काही योगीही सर्परूपाने राहतात. अशा आत्म्यांना मनुष्य जन्म मिळाल्यास ते पराकोटीचे शांत, क्षमाशील व आध्यात्मिक असतात.

## ब्रह्मलोक

ब्रह्मलोकातून जन्माला आलेले आत्मे अतिशय सात्त्विक असतात. आपली आध्यात्मात प्रगती व्हावी म्हणून त्यांनी जन्म घेतलेला असतो. असे लोक बहुतकरून सत्पुरुष असतात. पृथ्वीतलावर जन्म घेऊन ते साधना करतात व ईश्वराशी एकरूप होतात व इतर असंख्य लोकांना ईश्वराच्या दिशेने शक्य होईल तितके पुढे नेतात. अशा लोकांना संत म्हटले जाते. हे लोकच पृथ्वीचा खरा आधार होत. यांच्या मुखाने ईश्वर बोलतो. यांच्या डोळ्याने ईश्वर पाहतो. भारतात आतापर्यंत असंख्य संत होऊन गेले व पुढेही होत राहतील.

या प्रकरणामध्ये कोठकोठल्या लोकातून कसे आत्मे जन्माला येतात हे आपण पाहिले; परंतु हे वर्णन अतिशय अपुरे आहे. इतरही अनेक योनीतून पृथ्वीतलावर आत्मे जन्म घेतात.

उदाहरणार्थ : बैलाच्या योनीतून मनुष्यरूपाने जन्माला

आलेला मनुष्य अतिशय कष्टाळू असतो; परंतु त्याचे सर्व कष्ट स्वत:साठीच असतात. तो जे काही करतो ते स्वत:पुरतेच करतो. इतरांच्या बाबतीत तो विचारही करत नाही.

वस्तुत: ईश्वराने त्याला मानव जन्म देऊन परोपकार व ईश्वरभक्ती करण्याची संधी दिलेली असते. ही संधी गमावल्यास कठोर ईश्वरी शिक्षांना मृत्यूनंतर तोंड द्यावे लागते.

चित्त्याच्या योनीतून जन्माला आलेला मनुष्य धूर्त, कपटी व कावेबाज असतो. असे लोक सत्तेच्या जवळपास असतात किंवा मांत्रिक-तांत्रिक असतात. अशा प्रकारे नरदेहाचा दुरुपयोग केल्यास मृत्यूनंतर पिशाच्च योनीत हजारो वर्षे शिक्षा भोगत रहावे लागते. पिशाच्च शक्तीची साधना करणारे साधू, लोकांना ठकवून पैसा मिळविणारे लोक, चित्त्याच्या योनीतून जन्माला आलेले असतात.

गायीच्या योनीतून जन्माला आलेल्या स्त्रिया भक्तिमान असतात; परंतु मूढ असतात.

मार्जार योनीतून जन्माला आलेले स्त्री-पुरुष भांडकुदळ असतात व यातील काही चोरही असतात.

वाघ, सिंहाच्या योनीतून जन्माला आलेले आत्मे शूर,

वीर असतात. क्रोधी असतात. कठोर साधना करणारे असतात. वीरपुरुष असतात.

देवतालोकातून जन्माला आलेले स्त्री, पुरुष अत्यंत भक्तिमान व परोपकारी असतात. मनाने मोठे असतात. दिसायला सुंदर असतात.

अशाप्रकारे विविध योनींतून व विविध लोकांतून पृथ्वीतलावर मानवरूपाने आत्मे जन्म घेत असतात. या कलियुगात तर राक्षस योनीतील आत्मेही जन्माला येतात. त्रेता व द्वापार युगातील राक्षस व दुष्ट आत्मे कलियुगात पृथ्वीतलावर मानवरूपाने जन्म घेतात. अशाप्रकारे ईश्वर विविध योनींतील आत्म्यांना मानवजन्म देतो व ईश्वराच्या दिशेने, मुक्तीच्या दिशेने या आत्म्यांनी प्रयत्न करावा म्हणून एक महान संधी उपलब्ध करून देतो.

'मानवजन्म ही ईश्वराने आत्म्याला दिलेली महान संधी होय !'

मानवदेह हे वाहन असून, या वाहनात बसून आत्म्याने परमात्म्याच्या दिशेने प्रवास करायचा असतो. जे आत्मे परमात्म्याच्या दिशेने प्रवास करण्याऐवजी फक्त पोट भरण्याचेच काम करतात अशा आत्म्यांना मृत्यूनंतर विविध प्रकारच्या

शिक्षांना तोंड द्यावे लागते.

'परमात्म्याच्या दिशेने प्रवास म्हणजे स्वत:ला ओळखणे!' जसजसे अंगी सद्‌गुण निर्माण होऊ लागतात, तसतसा मनुष्य ईश्वराच्या जवळ जातो. म्हणून परोपकार, दया, क्षमा, शांती, मानवता, प्रेम व ईश्वरभक्ती या सद्‌गुणांची कास धरणे आवश्यक आहे.

मानव जितके सद्‌गुण अंगी बाणवेल तितका तो ईश्वराच्या जवळ जाईल.

ज्यांच्या अंगी सद्‌गुण आहेत अशा स्त्री-पुरुषांना देवता म्हटले जाते.

दुर्गुणी लोकांना पिशाच्च म्हटले जाते. मृत्यूनंतर असे आत्मे पिशाच्चलोकात जातात.

काय व्हायचे, कसे वागायचे व मृत्यूनंतर कोठे जायचे, ज्याचे त्याने ठरवावे.

**जो अन्न देतो उदरासी । शरीर विकावे लागे त्यासी ।।**
**मग जेणे घातले जन्मासी । त्यासी कैसे विसरावे ।।**

समर्थ रामदास स्वामी म्हणतात.

पोटासाठी तुम्ही नोकरी करता, म्हणजे दररोज ८ ते १० तास तुम्ही तुमचे शरीर, मन व बुद्धी तुमच्या मालकाला

विकलेली असते. मग ज्या परमेश्वराने तुम्हाला शरीर दिले, मन-बुद्धी दिली, मानवजन्म दिला त्या परमेश्वराला तुम्ही का विसरता ?

स्वत:च्या आत्मस्वरूपाला म्हणजेच परमेश्वराला विसरल्या कारणाने आज कोणीही सुखी नाही. करोडोपती व्यक्तींकडे वैभव आहे; परंतु मन:शांती नाही, सुख नाही, मन सारखे तडफडत आहे, अशी अवस्था आहे. आपण असुरक्षित आहोत, असे सदैव त्यांना वाटत असते. याउलट दारिद्र्याने गांजलेल्या व्यक्तीला संध्याकाळी भाकरी कशी मिळेल, ही चिंता सतावत असते. एकंदरीत श्रीमंत व गरीब दोघेही सुखी नसतात.

दररोज ५ हजार जप, सतत नामस्मरण व आपल्या उत्पन्नातील २० टक्के रक्कम दान-धर्मात खर्च करणाऱ्या व्यक्तीला ईश्वर सांभाळून घेतो व त्याला योग्य मार्ग दाखवतो.

# ५. अदृश्य सृष्टी

**अदृश्य** सृष्टीमध्ये असंख्य स्तर असून, प्रत्येक स्तराचा एक एक अधिपती असतो. या अधिपतीच्या हाताखाली असंख्य आत्मे काम करीत असतात. प्रत्येक मनुष्याच्या कर्मानुसार त्याला चांगले किंवा वाईट फळ देण्याचे काम हे आत्मे करीत असतात. पृथ्वीतलावर घडणाऱ्या चांगल्या-वाईट घटनांचे मूळ अदृश्य सृष्टीत असते. या घटना व्यक्तिगत असू शकतात अथवा सामाजिक असू शकतात. अशा काही व्यक्तिगत व सामाजिक घटनांकडे आपण लक्ष टाकू या !

याशिवाय अदृश्य सृष्टीमध्ये असंख्य विभाग असतात. पृथ्वीतलावरील मानव अदृश्य सृष्टीतील या असंख्य

विभागांपैकी कुठल्या तरी विभागात अडकलेला असतो. म्हणजे त्याच्या मेंदूचा कंट्रोल अदृश्य सृष्टीतील या असंख्य विभागांपैकी एखाद्या विभागाच्या हातात असतो व त्याप्रमाणे त्याला बुद्धी होत असते. हा विषय अतिशय सूक्ष्म व गूढ आहे. एकेका विभागामध्ये करोडो जीव अडकलेले असतात. विशिष्ट मर्यादेइतकी आध्यात्मिक उन्नती झाल्याशिवाय अदृश्य सृष्टीतील या चौकटीतून मानवाची सुटका होत नाही. अदृश्य सृष्टीतील ही बंधने मानवाला आध्यात्मात प्रगती करू देत नाहीत, आध्यात्मिक प्रगतीत अडथळे निर्माण करतात, सांसारिक कामामध्ये अडथळे निर्माण करतात, नोकरी लागू देत नाहीत, लागली तरी टिकू देत नाहीत, चुकीचे वागल्यास बुद्धी भ्रष्ट करतात.

अदृश्य सृष्टीतील या विभागाचे काही विभागीय प्रमुख असतात. पुष्कळशा विभागीय प्रमुखांची धडे माणसांची असतात, तर शिरे प्राण्यांची असतात. जीवात्म्याला आपल्या चौकटीच्या बाहेर ते जाऊ देत नाहीत.

वातावरणातील या अदृश्य शक्ती व्यक्तिगत जीवनामध्ये कशा ढवळाढवळ करत असतात, याविषयी आपण येथे माहिती घेऊ.

## अदृश्य सृष्टीतून घडविण्यात येणाऱ्या सामूहिक मृत्युच्या घटना

काही लोक असा प्रश्न विचारतात, की एखाद्या विमान अपघातामध्ये दोन-तीनशे लोक एकदम मृत्यू पावतात, या सर्वांनी एकत्र मरावे असे विधिलिखित असते काय ? किंवा या सर्वांचे मृत्यू एकाच दिवशी होणार असतात काय ? मुख्यत्वेकरून हे प्रश्न ज्योतिषांना विचारले जातात.

याचे उत्तर होकारार्थी द्यावे लागेल. ज्यांचा मृत्यू होणार आहे, अशी सर्व माणसे एकत्र येतात व मरण पावतात. याची एक-दोन उदाहरणे येथे देत आहे.

ही परदेशातील घटना आहे.

विमानाने प्रवास करण्यासाठी म्हणून एक मनुष्य विमानात चढला. विमानाच्या आतील दृश्य पाहून त्याला एकदम धक्का बसला. विमानातील प्रत्येक सीटवर हाडांचे सापळे बसलेले होते. विमानातील कर्मचारी वर्गही हाडांचे सापळे दिसत होते. हे दृश्य पाहून तो घाबरला व त्याने त्या विमानाने प्रवास करणे रद्द केले. नियोजित वेळी विमानाने उड्डाण केले व ५-१० मिनिटांत विमान कोसळले व आतील सर्व प्रवासी, कर्मचारीवर्ग मृत्युमुखी पडले.

यावरून असे म्हणता येते, की ज्यांचा मृत्यू होणार होता, अशा सर्वांना एकत्र आणण्याचे काम अदृश्य सृष्टीतून केले गेले.

ख्रिश्चन व मुस्लीम दंगलीमध्ये इंडोनेशियातील हजारो लोक ठार झाले. दंगलीतून स्वत:चा जीव वाचविण्यासाठी हजारो लोक इंडोनेशिया सोडून पळू लागले. एका बोटीमध्ये दोन हजाराहून अधिक लोक बसले व इंडोनेशिया सोडून पळून जाऊ लागले. बोट थोडी दूर गेली व अदृश्य शक्तींनी बोट समुद्रात बुडवून टाकली. एकही मनुष्य वाचला नाही. विविध देशांच्या विमानांनी आठवडाभर शोध घेऊनही बोट कोठे बुडाली हे कळले नाही.

मनुष्य जेव्हा आपण कोण ? कोठून आलो व जाणार कोठे? यावर विचार करणे सोडून देतो, ईश्वरभक्ती, दान-धर्म, परोपकार करणे सोडून देतो, तेव्हा मानवावर विविध प्रकारच्या आपत्ती अदृश्य सृष्टीतून येऊ लागतात.

राज्यकर्ते जेव्हा आपले कर्तव्य विसरतात व स्वार्थी बनतात, जनतेच्या हिताकडे दुर्लक्ष करतात, अशा वेळी दहशतवाद व आतंकवाद पसरू लागतो.

विमान, रेल्वे, जहाज, बसेस यांचे अपघात होऊन असंख्य लोक एकाच वेळी मृत्युमुखी पडणे, भूकंपामध्ये

गावेच्या गावे उद्ध्वस्त होणे, या सर्व गोष्टी सामूहिक प्रारब्धात मोडतात व या घटना अदृश्य सृष्टीतून घडविल्या जातात.

मोठमोठी चक्रीवादळे होऊन शहरेच्या शहरे उद्ध्वस्त होतात. काही साधक लोकांनी वादळे निर्माण करणारी पिशाच्चे पाहिलेली आहेत.

अशाप्रकारे पृथ्वीतलावर घडणाऱ्या शंभर घटनांपैकी नव्वद घटना अदृश्य सृष्टीतून घडविल्या जातात. बरेचसे अपघातही अदृश्य सृष्टीतील पिशाच्चे घडवीत असतात. अशा प्रकारे अदृश्य सृष्टीतील विविध प्रकारच्या शक्ती पृथ्वीतलावर विविध प्रकारचे उत्पात घडवीत असतात.

काही देश विनाशकारी प्रवृत्तींची जोपासना करतात इतर देशांमध्ये आतंकवाद घडवून आणतात, दहशत निर्माण करतात अशा प्रकारे जे देश आसुरी मार्गाचा अवलंब करतात, असे देश एकतर समुद्रात बुडतात किंवा युद्धात नष्ट होतात.

व्यक्ती, समूह, समाज, गाव, शहर, राज्य, देश अशा सर्वांच्या कर्मांचा हिशेब ईश्वराकडे असतो व या हिशेबाप्रमाणे सर्वांना त्याची फळे भोगावी लागतात. याकरिता प्रत्येक देशाने ईश्वराला स्मरून कार्य करायला हवे. ईश्वराला विसरल्याने

अनेक साम्राज्ये आतापर्यंत उद्ध्वस्त झालेली आहेत.

दुसऱ्या महायुद्धाच्या काळात एक दिवस एक फकीर मुंबई बंदरानजीक 'अरे ! जान बचाना है तो भाग जाव' असे जोरजोराने ओरडत फिरत होता. त्याला वेडा समजून कोणीही त्याच्याकडे लक्ष दिले नाही. दोन दिवसांनंतर मुंबई बंदरात प्रचंड स्फोट झाला अनेक इमारती कोसळल्या व शेकडो लोक मृत्युमुखी पडले.

असंख्य लोकांची मृत्यूची घटका जेव्हा एकच असते, तेव्हा त्या घटकेला ते सर्व लोक त्या ठिकाणी एकत्र होत असतात जेथे त्यांचा मृत्यू व्हायचा असतो. हे कसे घडते हे अत्यंत गूढ रहस्य आहे. अदृश्य सृष्टीतील शक्ती मरणाऱ्या सर्व लोकांना एकत्र आणतात. विमानामध्ये, बसमध्ये, बोटीमध्ये, कारमध्ये, ट्रेनमध्ये, भूकंप अथवा बॉम्बस्फोट होण्याच्या ठिकाणी ज्यांचा मृत्यू व्हायचा असतो, असे सर्व लोक एकत्र येतात. अदृश्य सृष्टीतून या सर्व घटना घडविल्या जातात.

**व्यक्तिगत जीवनामध्ये अदृश्य सृष्टीतून हस्तक्षेप**

अहंकाराच्या समुद्रात पूर्णपणे बुडालेल्या मानवाला सर्व काही 'मी' करतो असे वाटत असते परंतु त्यांच्या जीवनाची

दोरी पूर्णपणे अदृश्य सृष्टीच्या हातात असते, हे फक्त ज्ञानी व्यक्तीलाच माहीत असते.

१९९२ मध्ये दक्षिण हिंदुस्थानातील तीर्थक्षेत्रांना भेट देण्याचे मी ठरविले. रेड्डी नावाच्या व्यक्तीला मी प्रवासात आपल्याबरोबर घ्यायचे ठरविले होते. प्रवास सुरू करण्याच्या दोन दिवस अगोदर मला अदृश्य सृष्टीतून सारख्या सूचना येऊ लागल्या, 'ज्या व्यक्तीला तुम्ही बरोबर नेत आहात ती व्यक्ती तीर्थयात्रा करण्याच्या लायकीची नाही. या व्यक्तीला बरोबर घेऊ नका !' वारंवार अशा सूचना येऊनही मी तिकडे दुर्लक्ष केले व प्रवासास सुरुवात केली.

दोन-अडीचशे किलोमीटर प्रवास पूर्ण होण्यापूर्वीच माझ्या संपूर्ण शरीराला इतकी सूज आली, की मला जराही हलता-डुलता येईना. पाच पावलेही चालता येईना. या शिवाय दर चार-पाच किलोमीटरला इतरही विविध मार्गांनी त्रास होऊ लागला. शेवटी प्रवास अर्ध्यावर सोडून परत आलो. पुढे तीन महिने आजारी होतो व या आजारपणातच अदृश्य सृष्टीतील आत्म्यांनी भरपूर त्रास दिला.

त्यानंतर बऱ्याच वर्षांनी पुन्हा एकदा प्रवास करण्याचे ठरविले. यावेळी एका सरकारी अधिकाऱ्याने मला आपली

गाडी प्रवासासाठी दिली होती. प्रवासाच्या आदल्या दिवशी अदृश्य सृष्टीतून सूचना येऊ लागल्या, 'या अधिकाऱ्याच्या गाडीने प्रवास करू नये.' मी माझ्या ड्रायव्हरला सांगितले. ड्रायव्हर म्हणाला, 'ही गाडी मोठी आहे, आपण हीच गाडी घेऊन जाऊ !''

ड्रायव्हरच्या आग्रहापोटी आम्ही त्या अधिकाऱ्याच्या टाटा सुमोने प्रवास करण्यास सुरुवात केली; परंतु या खेपेला मी सावध होतो. काही दुर्घटना घडू नये म्हणून विशिष्ट प्रकारचे अनुष्ठानही गाडीत बसूनच करीत होतो. ईश्वराची प्रार्थनाही करीत होतो.

सुमारे तासभर प्रवास केल्यानंतर ट्रॅफिक जाम झालेले होते. गाड्यांची लांबलचक रांग उभी होती. आम्हीही आमची गाडी त्या रांगेमध्ये उभी केली. आमच्या मागे सुमारे पंधरा फुटांवर एक भला मोठा एल. पी. ट्रक उभा राहिला. या ट्रकमध्ये जवळजवळ वीस टन सामान भरलेले होते. मागून एक ट्रक धडधडत आला व त्याने या वीस टन माल भरलेल्या ट्रकला जोरात धडक दिली व त्या ट्रकने आमच्या उभ्या असलेल्या गाडीला धडक दिली.

अदृश्य सृष्टीतून अशा प्रकारे मानवी जीवनात नेहमी हस्तक्षेप केले जातात. मी जर अदृश्य सृष्टीतून आलेले संदेश

ऐकले असते, तर हा अपघात घडला नसता परंतु सावध होतो. ईश्वर प्रार्थना, जपजाप्य करीत होतो, त्यामुळे ईश्वराने वीस टन वजनाची ट्रकरूपी संरक्षक भिंत पाठीमागे उभी केली व त्यामुळे संरक्षण झाले.

एक योगिनी होती. या योगिनीचे वैशिष्ट्य असे होते, की अपात्र व्यक्ती तिच्या दर्शनास जाऊ शकत नसे. ज्याच्यावर त्या योगिनीची कृपा आहे, अशीच व्यक्ती तिच्या दर्शनास जाऊ शकत असे. अपात्र व्यक्तीने त्या योगिनीच्या दर्शनास जाण्याचा प्रयत्न केल्यास अदृश्य सृष्टीतून अनेक प्रकारचे अडथळे येत असत व दर्शनार्थी तिच्यापर्यंत पोहोचू शकत नसे.

अदृश्य सृष्टीमध्ये चांगले, वाईट व मध्यम असे तीन प्रकारचे आत्मे असतात. मनुष्य आपल्या कर्मानुसार विशिष्ट प्रकारच्या आत्म्यांच्या अधीन रहात असतो. विशिष्ट प्रकारच्या चाकोरीच्या बाहेर मनुष्य जाऊच शकत नाही. या चाकोरीच्या बाहेर जाण्याचा एकमेव मार्ग म्हणजे ईश्वरभक्ती, दान व परोपकार !

आजकालचा मनुष्य थोडीफार ईश्वरभक्ती करतो; परंतु दान व परोपकार करत नाही, माणुसकीने वागत नाही व त्यामुळे तो आध्यात्मात प्रगती करू शकत नाही.

दान व परोपकार करून प्रथम प्रारब्ध शुद्ध करावे लागते. त्यानंतर पुण्याई साठू लागते. विशिष्ट मर्यादेइतकी पुण्याई साठल्यानंतर अदृश्य सृष्टीतील ज्या चौकोनामध्ये आपला जन्म झालेला आहे, ज्या चौकोनातील शक्तींनी आतापर्यंत आपल्याला विविध प्रकारच्या पीडा दिल्या, त्या चौकोनातून आपली सुटका होते व उच्च कोटीच्या लोकात आपल्याला प्रवेश प्राप्त होतो.

मी लिहिलेली पुस्तके वाचून अनेकांनी आपल्या वागण्यामध्ये सुधारणा केली. त्यांना खूप चांगले अनुभव आले. श्री. व सौ. मुळे या उभयतांनी असंख्य लोकांना पुस्तके दिली. ही त्यांची सेवा चालू असताना त्यांना अनेक अनुभव आले. त्यापैकी दोन अनुभव अतिशय महत्त्वाचे आहेत, ते पुढे देत आहे.

एका दुकानात काम करणाऱ्या एका सद्भक्त गृहस्थास श्री. मुळे यांनी सांगितले, 'मी तुम्हाला काही धार्मिक पुस्तके भेट देणार आहे. रविवारी तुम्ही माझ्याकडे या !' तेव्हा या गृहस्थाने रविवारी येण्याचे कबूल केले. एक-दोन दिवसात त्या गृहस्थाला या गोष्टीचा विसर पडला. शनिवारी रात्री त्याच्या पत्नीच्या स्वप्नात श्री अक्कलकोट स्वामी आले व म्हणाले , 'तुझ्या

नवऱ्याला उद्या मुळे यांच्याकडे पुस्तके घेण्यास पाठव ! ही पुस्तके एका सिद्धयोग्याने लिहिलेली आहेत व खूपच चांगली आहेत.'

रविवारी सकाळी सदरहू गृहस्थ श्री. मुळे यांच्याकडे गेला. पुस्तके घेतली व स्वप्न सांगितले.

श्री. व सौ. मुळे अशा प्रकारे ईश्वरसेवेचे कार्य करीत होते. एक दिवस सौ. मुळे यांना स्वप्न पडले. स्वप्नात त्यांना एका देवतेने पुढीलप्रमाणे सांगितले.... ''तुझे प्रारब्ध शुद्ध झाले आहे. यापुढे तू जी सेवा करशील ती सर्व शिल्लक राहील व पुढील जन्मासाठी उपयोगी येईल.''

सौ. मुळे यांना अशा प्रकारचा दृष्टांत झाल्यानंतर सुमारे दीड वर्षाने श्री. मुळे यांना दत्तजयंतीच्या दिवशी एक सुंदर स्वप्न पडले.

स्वप्नामध्ये श्रीदत्त महाराज श्री. मुळे यांना एका नदीच्या काठी घेऊन गेले व त्यांना सूर्यमंत्राची दीक्षा दिली.

ईश्वरभक्ती, परोपकार, दान, सेवा इत्यादी गोष्टींनी प्रारब्ध शुद्ध होऊ लागले, की स्वप्न-दृष्टांत होऊ लागतात, स्वप्नात मार्गदर्शन मिळते व याहून आणखी प्रारब्ध शुद्ध झाल्यास देव-देवता प्रत्यक्ष प्रकट होतात आणि मार्गदर्शन करतात.

प्रवीण जोशी हा पुस्तकांचे वितरण करण्याची सेवा करतो. एकदा तो अक्कलकोटला गेला असता एका अनोळखी व्यक्तीने त्याला खूप सहकार्य केले व दिवसभर ती व्यक्ती त्याच्याबरोबर राहिली व त्याला सर्व काही माहिती दिली. ही अनोळखी व्यक्ती आपल्याशी इतक्या प्रेमाने का वागते हे त्याला कळत नव्हते. प्रवीणचे सर्व काम पूर्ण झाल्यानंतर ती व्यक्ती कोठे गेली हे त्याला कळले नाही.

वरील दोन हकिकतींमध्ये अदृश्य सृष्टीतील आत्म्यांनी साकार होऊन सद्भक्तांची श्रद्धा, भक्ती वाढविण्याचे कार्य केले, हे निर्विवाद सत्य आहे.

सिद्धपीठामध्ये (शिर्डी, अक्कलकोट इत्यादी) असंख्य आत्मे राहतात व भाविकांच्या मनातील श्रद्धा, भक्तिभाव वाढविण्यासाठी वेगवेगळे चमत्कार करतात. वातावरणातही असे असंख्य परोपकारी आत्मे फिरत असतात. निरनिराळ्या सत्पुरुषांची रूपे घेऊन ते भक्तांना स्वप्नात दर्शन देतात व श्रद्धा बळकट करण्याचे कार्य करतात.

# ६. संचित-प्रारब्ध-क्रियामाण

**आपण** जन्माला येताना असंख्य जन्मांचे कर्म आपल्याबरोबर असते. कर्मांच्या या गाठोड्याला संचित म्हणतात. या संचितातून या जन्मी आपण जेवढे कर्म भोगून काढणार असतो, त्या कर्माला प्रारब्ध असे म्हणतात. या प्रारब्धानुसारच कोणी डॉक्टर होतो, कोणी इंजिनिअर होतो, कोणी वकील होतो तर कोणी हमाल होतो. श्रीमंती-गरिबी, सुख-दुःख, प्रगती-अधोगती, सद्‌बुद्धी-दुर्बुद्धी, यश-अपयश, जीवनातील उतार-चढाव, आरोग्य-अनारोग्य, देवतांची कृपा-पिशाच्चबाधा अशा सर्व गोष्टी प्रारब्धावर अवलंबून असतात. प्रारब्धशुद्धी झाल्याशिवाय आध्यात्मात

प्रगती होत नाही. बरेच लोक आध्यात्मिक पुस्तके वाचतात, थोडी फार ईश्वरभक्ती करतात व स्वत:ला फार मोठे आध्यात्मिक समजतात; परंतु प्रारब्धशुद्धी झाल्याशिवाय खऱ्या अर्थाने आध्यात्मात प्रवेशही होत नाही, हे या लोकांना माहीत नाही.

प्रारब्धशुद्धी झाल्यानंतर आध्यात्मात तीव्र गतीने प्रगती होते. अशा आत्म्याची अधोगती होत नाही. त्याचे पुढील सर्व जन्म आध्यात्मात प्रगती करणारे असतात. ईश्वरी शक्ती अशा व्यक्तीचे सदैव संरक्षण करीत राहतात. प्रारब्ध शुद्ध झाल्याने क्रियामाण कर्मही शुद्धच होते. अंत:करणात सद्प्रवृत्ती निर्माण होतात. मन नि:स्वार्थ होते. लोभ, स्वार्थ व संकुचित प्रवृत्ती मनात रहात नाही. मन स्फटिकाप्रमाणे शुद्ध होते. मोक्षाचा मार्ग मोकळा होतो.

मनुष्य या जन्मी जे जे काही कर्म करतो, त्या सर्व कर्माला क्रियामाण कर्म असे म्हणतात. हे क्रियामाण कर्म संचितात जमा होत राहते. अशा प्रकारे कर्मशृंखला युगानुयुगे चालत राहते व मनुष्य आपण केलेली कर्मे भोगून काढण्यासाठी पुन:पुन्हा पृथ्वीतलावर विविध अवस्थांमध्ये जन्म घेत असतो.

स्वार्थाने, अहंकाराने, कपटीपणाने, ईर्षा, द्वेष, मत्सराने, कंजूषपणाने वागणाऱ्या लोकांना पुष्कळवेळा त्यांच्या वागण्याची शिक्षा म्हणून ओझे वाहणाऱ्या प्राण्याच्या रूपात जन्म घ्यावा लागतो. याशिवाय इतर अनेक प्रकारच्या ईश्वरी शिक्षा भोगाव्या लागतात. राक्षसी प्रवृत्तीच्या लोकांना तर लाखो वर्षे ईश्वरी शिक्षा भोगाव्या लागतात.

परोपकार, दान, ईश्वरभक्ती, नम्रता, अहंकाररहित वागणे, अशा सद्प्रवृत्तींची जोपासना केल्यास प्रारब्धशुद्धी होते व प्रारब्धशुद्धी झाल्यानंतर आध्यात्मात प्रगती होते.

'आध्यात्मात प्रगती का होत नाही' असा प्रश्न विचारणारे अनेक जण भेटतात. वरील लिखाणात त्यांच्या प्रश्नाचे उत्तर तर आहेच; पण त्याचबरोबर मानवी जीवनात भेडसावणाऱ्या असंख्य समस्यांचे उत्तरही या लेखनात आहे.

### अदृश्य सृष्टीतील शक्तींचा प्रभाव

अदृश्य सृष्टीमध्ये असंख्य आत्मे असे असतात, की जे मानवी मन व बुद्धीवर ताबा मिळवितात. व्यसनी लोकांच्या मनावर ताबा मिळविणे या पिशाच्च आत्म्यांना सहज शक्य होते. पुष्कळवेळा अदृश्य सृष्टीतील आत्मे व्यसनी माणसाच्या शरीरात शिरून दारू पिणे, सिगारेट ओढणे, शिवाय इतर बऱ्याच वाईट गोष्टी करणे, अशी कामे करतात. तामसी

प्रवृत्तीच्या व गुंड प्रवृत्तींच्या लोकांवर अदृश्य सृष्टीतील आसुरी शक्ती आपला प्रभाव गाजवत असतात.

गुंडगिरी करणारे, मारामाऱ्या करणारे, दारू पिणारे, उग्र प्रवृत्तीचे, चोऱ्या करणारे, विविध प्रकारचे गुन्हे करणारे अशा प्रवृत्तींच्या लोकांवर जन्मापासूनच अदृश्य सृष्टीतील दुष्ट पिशाच्चांचा अथवा राक्षसांचा प्रभाव असतो. अदृश्य सृष्टीतील दुष्ट शक्तींचे ते गुलाम बनलेले असतात. दुष्ट शक्तींचे हे गुलाम पृथ्वीतलावर जगताना भयंकर अहंकाराने जगत असतात. अदृश्य सृष्टीमध्ये काही शक्ती अशा आहेत, की ज्या मानवामध्ये लोभ, स्वार्थ, कंजूषपणा, अहंकार अशा विविध प्रकारच्या प्रवृत्ती निर्माण करतात व अधोगतीच्या मार्गाने माणसाला रसातळाला घेऊन जातात. या शक्ती असे का करतात हे एक आश्चर्यच आहे.

जे लोक ईश्वराला विसरतात, एखाद्या सत्पुरुषाने केलेले उपकार विसरतात, अशा लोकांवर या शक्ती आपला प्रभाव गाजवितात, असे आढळून आले आहे.

मानवी जीवन जगताना ईश्वर, सत्पुरुष व देवता यांच्याशी अहंकाराने वागल्यास अथवा अन्य काही चुका केल्यास अदृश्य सृष्टीतील या शक्ती मानवी मन, बुद्धीवर आपला प्रभाव पाडण्यास सुरुवात करतात.

या शक्ती प्रथम माणसामध्ये अहंकार निर्माण करतात. नंतर कंजूषपणा निर्माण करतात. अशी माणसे मग धूर्तपणे वागू लागतात. स्वार्थी व संकुचित प्रवृत्तीची होतात. अशी माणसे फक्त स्वत:पुरताच विचार करतात. बायको-मुलांचाही ते विचार करत नाहीत. पशू ज्याप्रमाणे स्वत:चे पोट भरतो, त्याप्रमाणे अदृश्य सृष्टीतील वाईट शक्तींचे गुलाम झालेले हे लोक फक्त स्वत:पुरताच विचार करतात व स्वत:चेच पोट भरतात. मृत्यूनंतर अशा लोकांची रवानगी पिशाच्चलोकात होते. मानवी जन्माचा त्यांनी दुरुपयोग केलेला असतो. ईश्वर त्यांना शिक्षा म्हणून मानवेतर योनीत (रेडा, बैल, गाढव) जन्म देतो व ओझी वाहण्यास लावतो. हजारो वर्षे त्यांना मनुष्यजन्म मिळत नाही.

ईश्वराच्या दरबारात मृत्यू नामक कोणतीही घटना नाही. मनुष्य जन्माला आल्यानंतर एखाद्या आत्म्याने जर वाईट कर्मे केली किंवा मनुष्य जन्माचा दुरुपयोग केला तर अशा आत्म्याला कठोर शिक्षांना तोंड द्यावे लागते व विविध प्रकारच्या प्राणी, पशू, पक्षी इत्यादी योनीत जन्म घ्यावा लागतो.

मनुष्य जन्मामध्ये पूर्वजन्माची स्मृती नसते, त्यामुळे मी कोण; हे कोणालाच कळत नाही; परंतु आत्मा जेव्हा विविध

प्रकारच्या योनीतून फिरत असतो व शिक्षा भोगत असतो तेव्हा मात्र त्याला आपण मनुष्यजन्मात कोण होतो ? काय नाव होते? पापे काय काय केली ? याची सारखी आठवण होते.

सत्पुरुषांना, साधकांना व काही विशिष्ट व्यक्तींना पूर्वजन्माची स्मृती असते; परंतु अशा व्यक्ती लाखात एक असतात.

ईश्वराच्या दरबारात मृत्यू ही घटना नसते. शर्ट काढून फेकून द्यावा त्याप्रमाणे आत्मा शरीर सोडून देतो व आपल्या कर्माची फळे भोगण्यासाठी दुसरे शरीर धारण करण्यास सिद्ध होतो. त्याच्या कर्माप्रमाणे त्याला नवीन शरीर मिळते व या नवीन शरीरात तो त्याच्या कर्माचे परिणाम भोगत राहतो. कर्मे वाईट केली असतील तर पिशाच्च शरीर किंवा पशू, पक्षी, प्राण्यांचे शरीर मिळते. कर्मे चांगली केली असतील, तर देव-देवतांचे तेजस्वी शरीर मिळते.

ज्याप्रमाणे ईश्वराच्या दरबारात मृत्यू नाही, त्याचप्रमाणे ईश्वराच्या दरबारात भूत, भविष्य, वर्तमान हे काळही नाहीत.

ज्याप्रमाणे डोंगरावर उभा असणारा एखादा मनुष्य खूप दूरवरचे पाहू शकतो, त्याप्रमाणे ईश्वर भूतकाळ, वर्तमानकाळ व भविष्यकाळ या तिन्ही काळात एकाच वेळी वावरत

असतो. त्यामुळे ईश्वराला कोणीही फसवू शकत नाही.

'ईश्वराने मनुष्य बनविला व मनुष्याने ईश्वराला उल्लू बनविले' अशी म्हण उर्दू भाषेत आहे; परंतु ती पूर्णपणे चुकीची आहे. ईश्वराला प्रत्येक मनुष्याचे सर्व पूर्वजन्म माहीत असतात व या जन्मामध्ये तो कसा वागतो इकडे परमेश्वराचे अतिशय बारकाईने लक्ष असते.

'**पेरावे तसे उगवते**', '**कर्म तैसे फळ**', '**करावे तसे भरावे**' हा ईश्वरी नियम बऱ्याच लोकांना माहीत आहे; परंतु आणखी एक सूक्ष्म नियम असा आहे की, मनुष्याला त्याच्या सूक्ष्मातिसूक्ष्म चांगल्या-वाईट प्रवृत्तींचीही फळे भोगावी लागतात. याविषयी एक-दोन उदाहरणे देतो.

एक मुलगी होती. तिला आपल्या लग्नाची अतिशय घाई झालेली होती. आपले लग्न केव्हा होईल ही एकच चिंता अहोरात्र तिला सतावीत असे. वयाच्या १७व्या वर्षीच तिच्या आई-वडिलांनी तिचे लग्न करून दिले. आपण जणू काही स्वर्ग जिंकला एवढा आनंद त्या मुलीला झाला. लग्नानंतर कुठल्याही कारणाने ती माहेरी आली नाही.

माहेरच्या लोकांनी अनेकदा बोलावूनही ती माहेरी आली नाही. आपल्या संसारात ती पूर्णपणे बुडून गेली होती. सुमारे वर्षभर सर्व ठीक चालले. नंतर नवरा रोज भांडू लागला.

अधून-मधून नवऱ्याच्या हातचा प्रसादही तिला मिळू लागला. नंतर त्या मुलीला माहेरची व ईश्वराची आठवण होऊ लागली.

वरील उदाहरणावरून एक गोष्ट लक्षात येते की, मनुष्य ईश्वराला विसरला, स्वकर्तव्याला विसरला व सुखोपभोगालाच प्राधान्य दिले, तर त्याला ईश्वरी शिक्षा अथवा दुःख भोगावे लागते.

तसे पाहता या मुलीने काहीही चूक केलेली नाही, दुष्कर्म केलेले नाही किंवा पाप लागेल असेही काही केलेले नाही. असे असताना तिला कठोर शिक्षा भोगावी लागली. मग जे दुष्कर्म करतात, वाईट कर्मे करतात त्यांचे काय होईल याचा विचार वाचकांनीच करावा.

अशा प्रकारची अनेक उदाहरणे देता येतील परंतु विस्तारभयास्तव एक-दोन उदाहरणे देऊन हे प्रकरण संपवितो.

एक अतिशय सज्जन सद्‌गृहस्थ होते. आयुष्यभर त्यांनी ईश्वरभक्ती केली व सत्पुरुषांची चरित्रे प्रसिद्ध केली. अनेक सत्पुरुषांच्या सहवासात राहिल्याने आपल्याला साधू-संतांची चांगली पारख आहे, असे त्यांना वाटत असे. जवळजवळ पन्नास-पंचावन्न वर्षे ते सतत सत्कर्म करीत होते.

एक दिवस देवता कोटीतील एक व्यक्ती त्या प्रकाशकाकडे आली व बोलता बोलता तिने त्यांना विचारले....

'आमच्या स्वामींचे चरित्र तुम्ही प्रसिद्ध कराल काय?'

'मी जिवंत सत्पुरुषांची चरित्रे प्रसिद्ध करीत नाही.' प्रकाशकाने उत्तर दिले.

आता या दोन वाक्यांच्या संवादात त्या प्रकाशकाने कुठलेही पाप केलेले नाही; परंतु ईश्वरी नियम इतके काही विचित्र आहेत, की त्यात कोण, केव्हा, कोठे अडकेल हे सांगता येत नाही.

मला स्वत:लाही यात प्रकाशकाचे काही चुकले आहे, असे वाटत नाही; परंतु सृष्टीचे कायदे हे मानवी विचारशक्तीच्या पलीकडचे असतात.

'बरोबर वागलात की बक्षीस व थोडे जरी चुकलात तरी फटका' हा ठरलेला आहे. असो, केवळ एक वाक्य चुकीचे बोलल्याने त्या प्रकाशकाचे आनंदमय जीवन चिंतामय व दु:खमय होऊन गेले.

वरील वाक्य बोलल्यानंतर काही दिवसांनीच त्याला एक शब्दपंडित भेटला. या शब्दपंडिताचे सर्व आयुष्य लबाडीत व

धूर्ततेत गेलेले होते. अनेकांना त्याने टोप्या घातलेल्या होत्या. या धूर्त शब्दपंडिताचा वृद्धापकाळ सुरू झाला होता. वृद्धापकाळातील जीवन ऐषारामात जावे, म्हणून त्याने आध्यात्माचा आश्रय घेतला होता. या शब्दपंडिताने या प्रकाशकाशी दोस्ती केली. आपल्या शब्दज्ञानाने त्याला प्रभावित करून टाकले. प्रकाशकाने या शब्दपंडिताचा भरपूर प्रचार केला. या शब्दपंडिताने प्रकाशकाला पैशाचे आमिष दाखविले व एक दिवस त्याची सर्व प्रकाशन संस्था गिळंकृत केली. सध्या हा वृद्ध प्रकाशक आपणच निर्माण केलेल्या अतिशय जुन्या प्रकाशन संस्थेत नोकरासारखा काम करत आहे व तो चतुर धूर्त शब्दपंडित त्याला दहा-दहा रुपयांचा हिशोब विचारत असतो. या सर्व घटनेमध्ये प्रकाशकाने कुठलेच पाप केलेले नाही परंतु ईश्वराने मनुष्य जन्म दिला, त्या मनुष्य जन्माचा दुरुपयोग केला तर शिक्षा भोगावी लागते. ईश्वराने बुद्धी दिली, त्या बुद्धीचा दुरुपयोग केला तर शिक्षा भोगावी लागते. अदृश्य सृष्टीतील शासनव्यवस्थेचे प्रत्येक मानवावर बारकाईने लक्ष असते. येथे सज्जनांना तात्काळ फटका बसतो व त्यांना सुधारले जाते, तर दुर्जनांना फारसे फटके बसत नाहीत. त्यांची रवानगी नरकात केली जाते व हजारो वर्षे त्यांना शिक्षा भोगावी लागते.

स्वत:ला विद्वान व बुद्धिवान समजणाऱ्या या प्रकाशकाचे एवढेच चुकले की, ''मी जिवंत सत्पुरुषांची चरित्रे छापत नाही'' असे बोलल्याने त्यांना अदृश्य सृष्टीतून फटके बसले. यावरून माणसाने बोलतानाही किती सावधगिरीने बोलले पाहिजे याचा बोध होतो.

पूर्वीच्या काळी आई मुलाला सांगत असे, ''खोटे बोलू नकोस, देव कान कापेल!'' मुलगा वेडे वाकडे बोलल्यास, ''असे वेडेवाकडे बोलू नको! देव कान कापेल!'' याशिवाय दररोज सकाळ-संध्याकाळ मुलांना देवासमोर उभे करून ''देवा मला चांगली बुद्धी दे!'' अशी प्रार्थना मुलांकडून करवून घेतली जात असे. या साध्या-सोप्या गोष्टीत खूप अर्थ होता.

आजकालच्या मुलांकडून अशा प्रकारच्या प्रार्थना करवून न घेतल्याकारणाने ही मुले अतिशहाण्यासारखी वागतात व देवासमोर उभे राहून हात जोडणे तर त्यांना कधी माहीतच नसते. फक्त संकटाच्या व परीक्षेच्या वेळी आजकालची मुले देवाला जुलमाचा रामराम करतात. अशा या संस्कारहीन मुलांचे भविष्य अंध:कारमय असते.

# ७. मानव जन्मरहस्य

**अहं करोमिति वृथाभिमानः ।**
**प्रारब्ध सूत्रं ग्रथितीही लोकाः ।।**

अर्थ- 'मी करतो' हा अहंकार खोटा आहे. तुमच्या जीवनात घडणाऱ्या सर्व गोष्टी प्रारब्धानुसार घडत असतात.

या संस्कृत सुभाषितामध्ये वरीलप्रमाणे लिहिलेले आहे. एखाद्या चांगल्या ज्योतिषाला जर आपली पत्रिका दाखविली, तर तो आपल्या जीवनातील सुख-दुःख, शिक्षण, व्याधी, रोग, अपघात, यश-अपयश अशा सर्व गोष्टी अचूक सांगू शकतो.

अशाप्रकारे मानवी जीवन हे अदृश्य सृष्टीतून नियंत्रित

केले जाते.

बुद्धिकर्मानुसारिणी या म्हणीप्रमाणे माणसाला त्याच्या पूर्वजन्मातील कर्मानुसार बुद्धी होत असते. सद्प्रवृत्ती व दुष्प्रवृत्ती याही पूर्वजन्मीच्या कर्मानुसार होत असतात. आपणाला भेटणारी मित्रमंडळी अथवा काहीही कारण नसताना निर्माण होणारे शत्रू हेही पूर्वजन्मातील कर्मानुसार घडत असते. घर, पैसा, पत्नी, मुले, नातेवाईक या सर्व गोष्टी पूर्वजन्मातील कर्मानुसार किंवा पूर्वजन्मातील ऋणानुसार प्राप्त होत असतात. आपल्या मृत्यूचा दिवसही जन्माला येतानाच ठरलेला असतो व मृत्यू कसा येणार हेही ठरलेले असते.

अहंकार, क्रोध, ईर्षा, द्वेष, मत्सर, स्वार्थीपणा, दुष्टपणा इत्यादी सर्व दूषित पूर्वजन्मातील पापकर्मामुळे निर्माण होतात. दया, क्षमा, शांती, करुणा, अहिंसा, प्रेम, ईश्वरभक्ती इत्यादी सर्व सद्‌गुण पूर्वजन्मातील पुण्याईमुळे प्राप्त होतात.

अज्ञान, मूढता, अशिक्षितपणा, दारिद्र्य या गोष्टी पूर्वजन्मातील दूषित कर्मानुसार भोगाव्या लागतात.

मानवाचे सत्कर्म देव-देवतांच्या आशीर्वादाच्या रूपाने फळाला येते.

मानवाचे दुष्कर्मच मानवाला वाईट शक्तींच्या ताब्यात

देते व विविध प्रकारचे क्लेश भोगावयास लावते.

असे म्हणतात की, 'पुण्यवान माणसाला यम देवरूपात दिसतो, तर पापी माणसाला तो भयंकर रूपात दिसतो.'

पूर्वजन्मीची कर्मे जर चांगली नसतील, तर मित्र व साथीदार चांगले भेटत नाहीत.

पुण्यवान आई-वडिलांच्या पोटी जन्म मिळणे, लहानपणी चांगले संस्कार मनावर होणे, दैवीकृपा लाभणे, चांगल्या सत्पुरुषाचा सहवास मिळणे, ज्ञान होणे, ईश्वरभक्ती अंत:करणात निर्माण होणे या सर्व गोष्टी पूर्वजन्मीच्या पुण्याईमुळे प्राप्त होतात.

हलक्या दर्जाच्या व कुविचारी आई-वडिलांच्या पोटी जन्म मिळणे, स्वार्थी व अप्पलपोटी आई-वडील असणे, आई-वडील तांत्रिक-मांत्रिकाच्या नादी लागलेले असणे, भुताखेतांना भजणारे आई-बाप असणे किंवा पिशाच्च साधना करणाऱ्या साधूच्या सहवासात आई-बाप असणे, लहानपणापासून मनावर स्वार्थी संस्कार होणे व मोठेपणी तांत्रिक-मांत्रिकाच्या गाठी-भेटी होणे किंवा पिशाच्च साधना केलेल्या साधूचा सहवास होणे या सर्व गोष्टी पूर्वजन्मातील दुष्कर्मामुळे घडतात.

अशा प्रकारे कर्माच्या भट्टीमध्ये तावून-सुलाखून

मनुष्याचा आत्मा शुद्ध होत असतो व ईश्वराच्या दिशेने पुढे पुढे जात असतो.

दहा लाखातील एखादा मनुष्य असा असतो, की बुद्धीकर्मानुसारिणी हा नियम त्याला लागू पडत नाही. तो स्वतंत्र इच्छेने जगत असतो. असा मनुष्य सत्पुरुष असतो. त्याला प्रारब्ध नसते. केवळ लोककल्याणार्थ असे आत्मे भूतलावर अवतरित झालेले असतात. प्रवाहपतिताप्रमाणे वाहत जाणाऱ्या सामान्य माणसांना असे सत्पुरुष शक्ती प्रदान करतात व कर्मानुसारिणी चाललेल्या बुद्धीला ईश्वरानुरागी करतात व प्रारब्धसूत्रातून आत्म्यांची सुटका करतात.

श्री अक्कलकोट स्वामी, महाअवतार बाबाजी, लाहिरी महाशय, स्वामी विवेकानंद, रामकृष्ण परमहंस, योगानंद, शिर्डीचे साईबाबा अशा थोर विभूतींनी समाजाला मार्गदर्शन करण्यासाठी अवतार घेतले व हजारो लोकांना त्यांनी प्रारब्ध प्रवाहातून बाजूला ओढून ईश्वराच्या दिशेने पुढे नेले.

या सिद्ध महात्म्यांचे वैशिष्ट्य असे असते की, ते जेव्हा समाजात राहतात तेव्हा लोकांना त्यांची किंमत कळत नाही. त्यांच्या महानिर्वाणानंतर लोक त्यांच्या समाधिस्थानी गर्दी करू लागतात. यावरून एक गोष्ट लक्षात येते की, सिद्धपुरुषांचे खरे कार्य अदृश्य सृष्टीतून चालते. ते उपेक्षित

जीवन जगतात, ईश्वराशी एकरूप होतात व त्यांच्या महासमाधीनंतर त्यांच्या समाधिस्थानात हजारो-लाखो लोकांना दिव्यत्वाची प्रचिती येते.

चक्रमेनिक्रम न्यायाप्रमाणे जीव पाय रहाटातील पोहऱ्याप्रमाणे सतत वर-खाली होत असतो. त्याला सुटका नसते. एक विशिष्ट वेळ आल्यानंतर त्याच्या सत्कर्मांचे फळ म्हणून त्याला खऱ्याखुऱ्या सद्‌गुरुची भेट होते व हा खरा सद्‌गुरु प्रारब्धाच्या कचाट्यातून जिवाची मुक्तता करतो. प्रारब्धसूत्रातून त्याची सुटका होते. जीव स्वतंत्रपणे जीवन जगू लागतो. त्याचे संचित जळून भस्म होते. प्रारब्ध शिल्लक रहात नाही व क्रियामाण शुद्ध होते. मृत्यूनंतर अशा जिवात्म्यांना मोक्ष प्राप्त होतो; पण अशा सद्‌गुरुंची भेट होणे अतिशय कठीण असते. एक तर ते समाजात रहात नाहीत व समाजात राहिले तर अतिशय उपेक्षित जीवन जगत असतात. त्यामुळे त्यांना ओळखणेही कठीण जाते. म्हणून परमेश्वराची सतत भक्ती करत राहिले पाहिजे; कारण परमेश्वराच्या कृपेने खऱ्याखुऱ्या सिद्धपुरुषांची गाठ पडते. लेखकाला काही लेखनमर्यादा असल्याकारणाने या विषयावर तो जास्त प्रकाश टाकू शकत नाही. दासबोधामध्ये रामदासांनी खरे गुरु व खोटे गुरु यांच्यावर चांगला प्रकाश टाकला आहे.

माझ्या प्रवासी जीवनामध्ये मला अनेक प्रकारचे तांत्रिक-मांत्रिक भेटले. त्यातील काही तर स्वत:च्याच शरीराचे सर्व अवयव वेगवेगळे करून दाखवत व पुन्हा जोडत. डोळे काढून हातावर घेत व पुन्हा डोळे जागेवर बसवीत, सिनेमागृहात चाललेला चित्रपट स्वत:च्या भिंतीवर दाखवीत. सर्व भूतकाळ अचूक सांगत; परंतु भविष्य सांगता येत नसे. हवेतून विविध प्रकारचे पदार्थ निर्माण करून खाण्यास देत.

मायाशक्तीच्या आधाराने असे असंख्य चमत्कार करता येतात; परंतु असे चमत्कार करणारे साधक ईश्वराशी एकरूप झालेले नसतात. त्यांच्या मायाशक्तीमुळे त्यांना समाजात खूप मानाचे स्थान असते; परंतु ईश्वराच्या दरबारात अशा साधकांना फारशी किंमत नसते. मृत्यूनंतर असे लोक पिशाच्चलोकात हजारो वर्षे खितपत पडतात. अशा लोकांच्या नादाला लागू नये. असे लोक आपल्या भक्तांची आध्यात्मिक शक्ती व पुण्याई खेचून घेतात व अशा प्रकारे आयुष्यभर दुसऱ्याच्या पुण्याईवर व शक्तीवर मजेत राहतात. त्यांचा अंतकाळ मात्र चांगला नसतो व त्यांच्याप्रमाणे त्यांना भजणाऱ्या लोकांचीही दुर्गती होते.

अशा या तांत्रिक मांत्रिकापेक्षा, ईश्वराचे एखादे स्तोत्र, दररोज तीन-चार वेळा वाचणारा मनुष्य खूपच श्रेष्ठ असतो.

मध्य प्रदेशामध्ये मला एक तांत्रिक साधक भेटला. हा साधक दररोज एक कप रक्त पीत असे. त्याला वश असणारा पिशाच्चलोकातील आत्मा त्याच्याद्वारा हे रक्त पीत असे. तो बसल्या जागेवरून जगात कुठे काय चालले आहे ते अचूक सांगू शकत असे. माझी परिचित मित्रमंडळी या क्षणी काय करत आहेत हे त्याने मला अचूक सांगितले व मित्रमंडळींचे नाव-पत्तेही अचूक सांगितले. कालांतराने मी मुंबईला आलो व मुंबईहून एका माणसाला त्या साधूकडे पाठविले व 'मी कोठे आहे व काय करत आहे हे त्या साधूला विचार !' असे सांगितले. त्याप्रमाणे माझ्या माणसाने त्या साधूला विचारले की, " आपण तर सर्वज्ञ आहात. स्वामीजी कोठे आहेत व काय करत आहेत हे मला सांगा." तेव्हा त्या साधूने उत्तर दिले, "माझी विद्या सामान्य माणसांविषयी सांगू शकते; परंतु सत्पुरुषांविषयी सांगू शकत नाही."

मध्ये बराच काळ लोटला. बरीच वर्षे निघून गेली व पुन्हा एकदा मध्य प्रदेशात जाण्याचा योग आला. मैहरच्या शारदामातेचे दर्शन घेऊन या रक्त पिणाऱ्या साधूच्या भेटीस

मी गेलो.

त्याची अवस्था अतिशय दयनीय झालेली होती. रक्त पिणाऱ्या पिशाच्चाने त्याच्यावर पूर्णपणे ताबा मिळविलेला होता. आता त्याला रक्त पिण्याचे झटके येत व वेड्यासारखा रक्त पिण्यासाठी तडफडत असे. यासाठी त्याला चोवीस तास त्याच्याजवळ बकरे, कोंबड्या असे प्राणी पाळावे लागत.

त्याच्या झोपडीच्या आसपास बऱ्याच कोंबड्या व बकऱ्या होत्या. रक्त पिण्याचा झटका येताच तो तीक्ष्ण हत्याराने बकरीवर अथवा कोंबडीवर वार करत असे व त्यांच्या गळ्याला तोंड लावून रक्त पीत असे.

आत्म्याने आध्यात्मात प्रगती करावी, सद्‌गुण व सद्‌प्रवृत्ती यांची जोपासना करावी यासाठी ईश्वर आत्म्याला मनुष्यजन्म देतो. ईश्वरीकृपेचा लाभ आत्म्याला मिळावा म्हणून, ईश्वराची स्तोत्रे, नामस्मरण, सद्‌ग्रंथांचे वाचन असे विविध उपाय सामान्य माणसांनाही माहीत असतात; परंतु सुलभ मार्गाने जाण्याचे सोडून झटपट काहीतरी साध्य करावे म्हणून माणसे ईश्वरचिंतनाचा मार्ग सोडतात, नामस्मरण, भक्तीचा मार्ग सोडतात व तंत्र मंत्राच्या नादी लागून स्वत:चे नुकसान करून घेतात. एकदा का आत्मा चुकीच्या मार्गाला

लागला, की तो हजारो वर्षे चुकीच्याच मार्गाने भरकटत राहतो. युगानुयुगे त्याला पुन्हा योग्य मार्ग सापडत नाही.

रक्त पिणाऱ्या साधूला ईश्वराने नरजन्म दिला. त्याने चुकीची संगत केली व स्वत:चे प्रचंड नुकसान करून घेतले. मृत्यूनंतर त्याचा आत्मा पृथ्वीला चिकटून राहील व रक्त पिण्यासाठी तडफडत राहील... हजारो वर्षे ! लाखो वर्षे !

वस्तुत: अशा प्रकारचे सामर्थ्य मिळविण्यासाठी प्रचंड धैर्याची आवश्यकता असते, प्रबळ इच्छाशक्तीची आवश्यकता असते. स्वत:तील इच्छाशक्ती, धैर्य, साहस, सहनशक्ती या सद्‌गुणांचा वापर जर त्याने योग्य प्रकारे केला असता, तर तो उच्च दर्जाचा सिद्धपुरुष झाला असता. खरे पाहता असे लोक हे प्रारब्धसूत्राच्या बाहेर असतात. स्वतंत्र इच्छाशक्तीने ते वागत असतात. झटपट सिद्ध होण्याच्या नादामध्ये स्वतंत्र इच्छाशक्तीचा त्याच्याकडून दुरुपयोग झाला व माणसाचा देव बनण्याऐवजी राक्षस बनला.

या रक्त पिणाऱ्या साधूने सामर्थ्य मिळविण्यासाठी साधना तरी केली होती परंतु पुष्कळ साधू असे असतात की, आयुष्यभर ते लोकांना फक्त उल्लू बनवत राहतात. हे लोक अतिशय धूर्त व कपटी असतात. तर काही साधू मेस्मेरिझम,

हिप्नॉटिझमद्वारा लोकांना फसवीत असतात. काही साधूंनी नजरबंदी साध्य केलेली असते व त्याद्वारे ते लोकांना फसवीत असतात, ज्यांचे प्रारब्ध खराब आहे, असे लोक अशा साधूंच्या मायाजालात फसतात. म्हणजे चांगला साधू भेटण्याकरिता प्रारब्धशुद्धीची अतिशय आवश्यकता असते हे सिद्ध होते.

साधू म्हणजे पवित्र आत्मा. पुष्कळ संसारी माणसे संसारात राहूनही सत्पुरुषाप्रमाणे जीवन जगत असतात. ज्यांचे आचार, विचार पवित्र आहेत, त्यांनाच साधू म्हटले जाते. मग ते संसारी असोत अथवा नसोत.

आचार-विचार जसजसे पवित्र होऊ लागतात तसतसे माणसाला साधुत्व प्राप्त होते व मनुष्य अंतर्बाह्य पवित्र होतो तेव्हा त्याला साधू म्हटले जाते.

मला काही असेही साधक भेटले, की ज्यांनी क्षुद्र शक्तीची उपासना केली होती. क्षुद्र शक्तीच्या आश्रयाने ते लोकांची कामे करीत व सज्जनतेने वागत. नि:स्वार्थबुद्धीने रहात; परंतु सज्जनतेने व नि:स्वार्थबुद्धीने वागूनही त्यांची आध्यात्मात प्रगती होत नसे. असे का होते यावर जेव्हा मी चिंतन केले तेव्हा माझ्या लक्षात पुढील गोष्टी आल्या -

क्षुद्र शक्तीची उपासना करणे हे परमेश्वराला अजिबात आवडत नाही.

क्षुद्र शक्ती या तीन-सात-नऊ दिवस साधना केल्यानंतर प्राप्त होतात. वातावरणातील पृथ्वीला चिकटून राहणारे काही पिशाच्च आत्मे अशा साधकाला वश होतात व त्याच्याद्वारा थोडेफार परोपकाराचे कार्य करतात. हे जरी खरे असले, तरी साधकाने आत्म्यांना वश करण्यासाठी साधना केलेली असते व असे करणे ईश्वराला आवडत नाही.

आत्म्यांना वश करण्यासाठी साधना करणे, सिद्धी-सामर्थ्याच्या प्राप्तीसाठी साधना करणे, विविध प्रकारच्या शक्ती प्राप्त करण्यासाठी साधना करणे, भूत, प्रेत, वेताळ यांच्या साधना करणे, यक्ष-यक्षिणी यांच्या साधना करणे हे ईश्वराला अजिबात आवडत नाही. अशा साधकांना मृत्यूनंतर कठोर शिक्षांना तोंड द्यावे लागते. त्यांनी ज्या स्तरावरील आत्म्यांची अथवा शक्तींची साधना केलेली असते, त्या स्तरावर त्यांना जाऊन रहावे लागते व पुष्कळवेळा मनुष्येतर योनीत अशा साधकांना जन्म घ्यावे लागतात.

अशा साधना करणारे भारतात लाखो लोक आहेत. पूर्वजन्मीच्या पुण्याईमुळे ते प्रारब्धसूत्रातून बाजूला झालेले असतात परंतु सिद्धी-सामर्थ्याच्या लोभाने, खूप मोठे

होण्याच्या अपेक्षेने ते फसतात व पुन्हा प्रारब्ध चक्रात अडकतात.

सर्वसामान्य माणसे प्रारब्धसूत्रानुसार जीवन जगत असतात. हजारातील एखादी व्यक्ती स्वतंत्र इच्छाशक्तीने जगत असते; परंतु जर इच्छाशक्तीचा दुरुपयोग झाला, तर भयंकर दुष्परिणाम होतात. वरील उदाहरणावरून हे सिद्ध होते.

माणसांचा मेंदू हा रेडिओप्रमाणे असून, या मेंदूमध्ये लाखो-करोडो शक्तिकेंद्रे आहेत. पिशाच्चांपासून परमेश्वरापर्यंत सर्व स्टेशन्स आपल्या मेंदूमध्येच आहेत. पिशाच्च शक्ती ग्रहण करणारी केंद्रे जागृत होऊ नयेत याची काळजी घ्यावी लागते.

पुढील गोष्टींमुळे पिशाच्च शक्ती ग्रहण करणारी केंद्रे, दुष्ट स्पंदने ग्रहण करणारी केंद्रे जागृत होतात व हळूहळू मनुष्य दुष्टशक्तींच्या कब्जात जातो.

१) दारू पिणे.

२) सिगारेट ओढणे.

३) अमली पदार्थांचे सेवन करणे.

४) ज्या पदार्थांनी नशा येते, अशा पदार्थांचे सेवन करणे.

५) दक्षिणेकडे पाय करून झोपणे.

६) दक्षिण-उत्तर झोपणे.

७) दक्षिणेकडे तोंड करून जप करणे.

८) दक्षिणेकडे तोंड करून देवाची पूजा करणे.

९) लघवी पिणे.

१०) अंगाला लघवी चोळणे.

११) मायाशक्तींची उपासना करणे.

१२) तंत्र-मंत्राची साधना करणे.

१३) स्मशानाच्या जवळपास राहणे.

१४) कब्रस्तानाच्या जवळपास राहणे.

१५) क्षूद्र शक्तींच्या स्थानामध्ये जात-येत राहणे.

१६) म्हसोबा, विरोबा अशा स्थानामध्ये जात-येत राहणे.

१७) जी स्थाने अतिशय प्राचीन आहेत अशा स्थानांमध्ये निवास करणे किंवा जात-येत राहणे.

१८) ज्या वास्तूमध्ये तीन वर्षे दिवा लावला जात नाही, अशा स्थानांमध्ये आपोआपच पिशाश्चशक्तींचा निवास होतो व अशा स्थानांच्या आसपास राहणाऱ्यांना त्रास होतात. अशा स्थानांच्या आसपास राहणारे लोक

स्वार्थी व कंजूष बनतात.

१९) घरातील व्हायब्रेशन्स शुद्ध राहण्यासाठी आपल्या घरामध्ये तुपाचा दिवा लावावा. दररोज दहा मिनिटे सकाळी व दहा मिनिटे संध्याकाळी तुपाचा दिवा लावल्याने घरातील वातावरण अतिशय शुद्ध राहते व घरात दैवी शक्तींचा निवास होतो.

मानवी शरीर, मन, बुद्धी अशुद्ध व भ्रष्ट करून मृत्यूनंतर पिशाच्चलोकात शेकडो वर्षे ज्या कारणांमुळे खितपत पडावे लागते, अशी अठरा कारणे वर दिलेली आहेत व एकोणिसाव्या मुद्यामध्ये आपले घर कसे शुद्ध राखावे याविषयी मार्गदर्शन केलेले आहे. वाचकांनी या गोष्टींकडे जरूर लक्ष द्यावे व स्वत:ची उन्नती करून घ्यावी.

उदासीनता, खिन्नता, चिंता, अशांत मन या सर्व गोष्टी दुष्ट स्पंदनामुळे निर्माण होतात.

मनाला जेव्हा वरीलप्रमाणे वाटेल, तेव्हा तात्काळ ईश्वरचिंतन करावे, म्हणजे तुम्हाला तात्काळ फरक जाणवेल.

**पुढील गोष्टींमुळे आपण सदैव दैवी शक्तींच्या, चांगल्या शक्तींच्या अधिपत्याखाली राहतो. या दैवी शक्तींच्या अथवा ईश्वरी शक्तींच्या आपण जितके जवळ**

**जाऊ तितके सद्‌गुण आपल्याला प्राप्त होतात. आनंद, शांती, समाधान इत्यादी प्राप्त होतात. ईश्वरी कृपेचा वर्षाव आपल्यावर होतो. त्या सर्व गोष्टींची आपण आता माहिती घेऊ.**

१) दररोज ईश्वराचे नामस्मरण करणे. किमान एक तास सकाळी व एक तास संध्याकाळी, याशिवाय येता-जाता-उठता- बसता ईश्वराचे नामस्मरण मनातल्या मनात करीत राहणे किंवा आपल्याला ऐकू येईल एवढ्या हळू आवाजात करीत राहणे.

२) एखाद्या स्तोत्राचे हजारो पाठ करणे.

३) श्वासावर लक्ष ठेवणे. श्वास आत घेताना व बाहेर सोडताना त्यावर लक्ष ठेवणे व शक्य झाल्यास श्वासाबरोबर देवाचे नामस्मरण करणे. दररोज किमान १५-२० मिनिटे ही साधना केल्याने मनाला शांती व आनंद प्राप्त होतो.

४) पूर्व-पश्चिम झोपावे. शक्यतो पूर्वेकडे डोके करावे.

५) घरात नेहमी तुपाचा दिवा लावावा.

६) पशू-पक्ष्यांना खायला घालावे.

७) अन्नदान, वस्त्रदान करावे.

८) सर्वांशी प्रेमाने वागावे.

९) शक्यतो दुसऱ्याला मदत करीत रहावे.

वरील गोष्टींचे आचरण केल्यास ईश्वरी कृपा होते. ईश्वरी शक्ती आपले संरक्षण करतात व मानवी जीवन सुखी होते.

महिन्यातून एकदा किंवा दोनदा तरी घरात हवन करावे. अग्निमध्ये तुपाच्या आहुती द्याव्यात. याने वास्तू शुद्ध होते व घरात दैवी स्पंदने निर्माण होतात. शक्य झाल्यास आपल्या घरामध्ये जितक्या खोल्या आहेत त्या प्रत्येक खोलीमध्ये महिन्यातून एकदा तरी हवन करावे; यामुळे वास्तू व खोल्या शुद्ध होतात.

ईश्वराच्या कृपेने ध्यानामध्ये मला जे काही ज्ञान प्राप्त होते, समाजाच्या भल्यासाठी पुस्तकांद्वारे मी ते लोकांसमोर मांडत असतो व पुस्तक लिहिण्यापूर्वी मला प्राप्त झालेल्या ज्ञानाचे असंख्य प्रयोगही करून पाहतो. असेच काही प्रयोग पुढे देत आहे.

**श्रीफल कल्प**

नारळामध्ये दुष्ट स्पंदने खेचून घेण्याची ताकद आहे, असे मला ध्यानामध्ये कळले व त्यानुसार मी असंख्य प्रयोग केले. या प्रयोगांतून जे काही ज्ञान झाले त्याची थोडक्यात

माहिती देत आहे.

१) आपण ज्या अंथरुणावर झोपतो त्या अंथरुणावर नारळ ओला करून ठेवावा. पंधरा-वीस मिनिटांनी नारळ काढून पाण्याने भरलेल्या बादलीत बुडवून ठेवावा. पाच-दहा मिनिटे पाण्यात ठेवल्यानंतर बादलीतील सर्व पाणी ओतून टाकावे व पुन्हा बादली पाण्याने भरून तोच नारळ पाच मिनिटे पाण्यात ठेवावा व नंतर परत तो अंथरुणावर ठेवावा. दोन-तीन तास अंथरुणावर ठेवून नंतर तो नारळ वाहत्या पाण्यात सोडून द्यावा किंवा दूर कोठेतरी फोडून टाकावा.

असे केल्याने शांत झोप लागते. वाईट स्वप्ने पडत नाहीत.

अर्थात, असे एक दिवस करून चालणार नाही. काही दिवस सतत हा प्रयोग करत रहावे लागते. जे ईश्वरभक्त आहेत त्यांना लवकर अनुभव येतो परंतु ज्या घरात पिशाच्चस्पंदने आहेत त्यांना सलग महिनाभर हा प्रयोग करूनसुद्धा चांगले अनुभव येत नाहीत.

देहशुद्धी व वास्तुशुद्धी झाली, की खूप चांगली स्वप्ने पडू लागतात. शांत झोप लागते. अशांती व अस्वस्थता निघून जाते; नैराश्य, उदासीनता निघून जाते.

वरीलप्रमाणेच आणखी एका प्रयोगाने आपली वास्तू शुद्ध करता येते.

एका प्लॅस्टिकच्या भांड्यामध्ये पाणी ठेवून त्या पाण्यात नारळ ठेवावा. अशा प्रकारे प्रत्येक खोलीत प्लॅस्टिकच्या भांड्यात पाणी ठेवून नारळ ठेवावा. दर दोन तासांनी पाणी बदलत रहावे. संध्याकाळी सर्व नारळ वाहत्या पाण्यात सोडावे, अथवा बाहेर दूर नेऊन फोडून टाकावेत. असे सलग चाळीस दिवस केल्यानंतर वास्तू शुद्ध होते, समस्यांचे निवारण होते, घराला बरकत येते, असे अनुभव आहेत. वर्षातून एकदा तरी हा चाळीस दिवसांचा प्रयोग करावा किंवा अधूनमधून हाच प्रयोग सात-सात दिवस करीत रहावा. याने वास्तू शुद्ध होते व थोडेफार प्रारब्धही शुद्ध होते.

या नारळ कल्पाला मी श्रीफळ कल्प असे नाव दिले आहे व मला याचे असंख्य अनुभव आहेत. त्यातील एक अनुभव येथे सांगतो.

एकदा मी एका भक्ताच्या गाडीने प्रवास करत होतो. गाडीची व ड्रायव्हरची स्पंदने नेहमी शुद्ध राहतील अशी दक्षता सतत मला घ्यावी लागते. त्याप्रमाणे सर्व दक्षता घेतलेली होती. एक-दोन दिवस प्रवास केल्यानंतर एका ओळखीच्या

व्यक्तीला मी ड्रायव्हरच्या शेजारी बसवले व दोन-तीन तास त्याच्याबरोबर हिंडलो. नंतर ती व्यक्ती तिच्या घरी निघून गेली. ती व्यक्ती निघून गेल्यानंतर मी ड्रायव्हरच्या शेजारच्या सीटवर बसलो, मला तात्काळ गरगरायला लागले. डोळे उघडे ठेवणे कठीण होऊ लागले. डोळे आपोआप मिटू लागले.

त्या बाह्यात्कारी सज्जन व्यक्तीतील वाईट स्पंदने त्या सीटमध्ये घुसलेली होती व त्याचा त्रास मला होत होता. मी ड्रायव्हरला गाडी थांबविण्यास सांगितले. जवळच्या दुकानातून एक नारळ विकत आणण्यास सांगितले व नारळ पाण्याने चिंब भिजवून त्या सीटवर ठेवला. दहा-पंधरा मिनिटांनंतर तो नारळ बाहेर फेकून दिला व त्याच सीटवर बसून पुढील प्रवास केला. नंतर मला काहीही त्रास झाला नाही.

शरीर व मन शुद्ध रहावे म्हणून मी माझ्या ओळखीच्या लोकांना हवन, जप, दीर्घ श्वसन अशा साधना सांगतो. त्याप्रमाणे लोक साधना करतात व स्वत:चे शरीर व मन स्वच्छ ठेवण्याचा प्रयत्न करतात. लोकांमधील अशुद्ध स्पंदनांचा मला खूप त्रास होतो व म्हणून मी शक्यतो समाजापासून दूर राहतो. अगदी खास काम असेल तरच

एखाद्या व्यक्तीला भेटतो.

असेच एकदा काही कामानिमित्त अरुण नावाच्या एका सद्भक्ताला भेटण्यास बोलविले. त्याला बघताक्षणी मी विचारले –

''काय अरुण ! तुझी स्पंदने (व्हायब्रेशन्स) आज खूपच चांगली आहेत. काय केलेस ?''

तो म्हणाला '' काय करणार! तुमच्याकडे यायचे म्हणून चार तास हवन करून आलो.''

मी म्हटले, ''तरीच तुझी स्पंदने (व्हायब्रेशन्स) इतकी चांगली आहेत!''

यानंतर फक्त चारच दिवसांनी काही कामानिमित्त मी त्याला फोन केला. फोनवर त्याचा आवाज ऐकताक्षणीच मी त्याला विचारले, ''काय अरुण ! आज अशा कुठल्या जागी गेला होतास? तुझी स्पंदने (व्हायब्रेशन्स) खूपच खराब झालेली आहेत!''

तेव्हा तो म्हणाला, ''मी आज एका पैसे खाणाऱ्या ऑफिसरच्या प्रेतयात्रेला गेलो होतो व तेव्हापासून मलाही अस्वस्थ वाटत आहे.''

मानवी देहाचे महत्त्व कळावे म्हणून या गोष्टी सांगितल्या

आहेत.

अजय व विजय या नावाचे माझे दोन भक्त होते. दोघेही मला अतिशय प्रिय होते व दोघांचीही मी आध्यात्मिक उन्नती करून घेत होतो. दोघांनाही मी सारखे प्रेम देत असल्याने दोघेही माझ्याकडे एकत्र येत असत व तासन्तास गप्पा मारत बसत असत. माझ्याकडून त्यांना खूप आध्यात्मिक स्पंदने मिळत असत. त्या दोघांचीही आध्यात्मात चांगली प्रगती होत होती.

कालांतराने माझ्या असे लक्षात आले की, अचानक त्या दोघांची आध्यात्मिक प्रगती थांबली असून, त्या दोघांमध्ये समान प्रकारच्या विचित्र प्रवृत्ती निर्माण झाल्या आहेत. ते दोघेही मला थापा मारत आहेत. मोठेपणाचा हव्यास त्या दोघांमध्ये निर्माण झाला आहे. आपल्याला खूप काही कळत आहे, असा भ्रम त्यांच्यामध्ये निर्माण झालेला असून, त्या भ्रमाच्या आधारे ते दोघे जगत आहेत. असंख्य भ्रामक कल्पनांनी त्यांचे मन भरून गेले आहे.

असे का व्हावे, हे मला समजेना. सुमारे एक वर्षभर मी त्यांच्या प्रवृत्ती तपासत राहिलो. अतिशय वेगाने त्यांची अधोगती होत होती, तरीही त्यांचे माझ्यावर खूप प्रेम होते.

असे का होते याचा शोध घेण्याचा मी ध्यानमार्गाने प्रयत्न केला तेव्हा मला पुढील गोष्टी आढळल्या,

पूर्वजन्मातील काही दुष्कर्मांमुळे या दोन्ही मित्रांच्या पाठीमागे काही दुष्ट शक्ती होत्या व या दुष्ट शक्ती त्यांना आध्यात्मात प्रगती करू देत नव्हत्या व यावर उपाय म्हणून या दोघांनी एकमेकांपासून थोडे दूर राहणे आवश्यक होते. अप्रत्यक्षरित्या मी त्यांना तशा सूचनाही केल्या परंतु त्यांच्या ते काही लक्षात आले नाही. जर मी उघडपणे बोललो असतो, तर गैरसमज झाले असते, म्हणून मी उघडपणे बोलूही शकत नव्हतो.

ते दोघे मनाने एकत्र रहात असल्याने त्यांच्या पाठीमागे असणाऱ्या दुष्ट शक्तींची ताकद खूपच वाढली होती व या दुष्ट शक्ती दोघांनाही भरकटत नेत होत्या व मला सर्व दिसत असूनही मी काही करू शकत नव्हतो.

शेवटी दोघांना मी एक दिवस सांगितले,

''तुम्ही दोघेही मला अतिशय प्रिय आहात परंतु एकाचे प्रारब्ध दुधासारखे आहे व दुसऱ्याचे प्रारब्ध लिंबासारखे आहे. तुम्ही जर जास्त एकत्र राहिलात, तर तुम्हा दोघांचेही नुकसान होईल!''

पुढे काय झाले हे मला कळण्यास मार्ग नाही कारण तद्नंतर ते मला कधीही भेटले नाहीत.

मानवाला होणारी बुद्धी जरी प्रारब्ध-कर्मानुसार होत असली, तरी काही गोष्टी ईश्वराने मानवाच्या हातात ठेवल्या आहेत.

उदा. - एखादा पदार्थ खायचा की खायचा नाही हे मानव ठरवू शकतो. आज जेवायचे की उपाशी राहायचे हेही मानव ठरवू शकतो. झोपायचे की जागे राहायचे हेही मानव ठरवू शकतो. कर्णमधुर संगीत ऐकायचे की कर्कश संगीत ऐकायचे हेही मानव ठरवू शकतो.

अशाप्रकारे काही अंशी मानवाला परमेश्वराने स्वातंत्र्य दिले आहे, या स्वातंत्र्याचा वापर करून मानवाने स्वत:चा उद्धार करून घ्यावा, अशी परमेश्वराची इच्छा असते व परमेश्वर मानवाला सतत संधी उपलब्ध करून देत असतो परंतु ईश्वराने दिलेल्या प्रत्येक संधीचा वापर मानव फक्त स्वार्थासाठी करत असतो व त्यामुळे त्याचे  नुकसान होते.

मानवाने काही गोष्टी अंत:करणावर कोरून ठेवायला हव्यात.

१)  आपण चांगले वागलो अथवा वाईट वागलो,

स्वार्थाने वागलो अथवा नि:स्वार्थ वागलो, तरी आपण जास्तीत जास्त सत्तर पंचाहत्तर वर्षेच जगणार !

जर असे आहे तर चांगले वागून, नि:स्वार्थ बुद्धीने वागून, ईश्वरभक्ती करून, मृत्यूनंतरचे जीवन सुखमय केलेले जास्त चांगले !

२) आपण सदैव जिवंतच असतो. देह मृत्यू पावल्यानंतर आपण अधिक जिवंत होत असतो. पुण्यवान आत्मा परमानंदात डुंबत अनंत आकाशात विहार करतो. देव-देवतांचा त्याला सहवास प्राप्त होतो. शब्दांनी ज्याचे वर्णन करणे अशक्य आहे, अशी अप्रतिम सौंदर्यस्थळे त्याला पाहायला मिळतात. आत्मा जर अतिशय पुण्यवान असेल, तर वर्धमान महावीर, गौतम बुद्ध, श्री स्वामी समर्थ, रामकृष्ण परमहंस, लाहिरी महाशय, साईबाबा, परमहंस योगानंद, स्वामी विवेकानंद अशा परमेश्वरस्वरूप महान आत्म्यांचा त्याला सहवास मिळतो. विविध प्रकारचे ज्ञान त्याला प्राप्त होते. चंद्रलोक, सूर्यलोक, नक्षत्रलोक अशा दिव्य लोकांतील तेजस्वी आत्म्यांचा त्याला सहवास मिळतो. जीवनातील गूढ रहस्यांचे ज्ञान त्याला होते. या अवस्थेमध्ये इतका काही परमानंद होत असतो की, त्याचे वर्णन सरस्वतीही करू शकत

नाही.

३) पृथ्वी हे एक फार मोठे विद्यापीठ असून, या विद्यापीठामध्ये आत्म्याला मनुष्य-शरीर देऊन ईश्वर शिकण्यासाठी पाठवत असतो. पूर्वजन्मातील सत्कर्माची व दुष्कर्माची सुख-दुःखरूपी फळे भोगत मानवाने अधिकाधिक पवित्र होण्याचा प्रयत्न करायचा असतो. अधिकाधिक शुद्ध होण्याचा प्रयत्न करायचा असतो. अधिकाधिक तेजस्वी होण्याचा प्रयत्न करायचा असतो, शांत व स्थिर होण्याचा प्रयत्न करायचा असतो. हे साध्य करण्याऐवजी जर मनुष्य फक्त स्वार्थासाठीच जगला, तर मृत्यूनंतर ज्या यातना त्याला शेकडो वर्षे भोगाव्या लागतात त्याचे वर्णन करणेही अशक्य आहे.

मानवाने थोडासा सद्सद्विवेकबुद्धीचा वापर करून चांगले वागण्याचे ठरवावे व स्वार्थीपणा सोडून द्यावा. जमेल तसा परोपकार करत रहावे. एक हजार वेळा परमेश्वराचे नामस्मरण करणे व एक परोपकार करणे या दोन्ही गोष्टी समान आहेत; किंबहुना परमेश्वराच्या सहस्त्रनामांपेक्षा एक परोपकार श्रेष्ठ आहे, असे मला वाटते.

हे लिहीत असताना ज्या एक-दोन गोष्टी आठवल्या त्या सांगून हे प्रकरण संपवितो.

श्रीशैलच्या अरण्यामध्ये मी काही काळ साधना करत होतो. या काळात अरण्यात फिरत असताना केव्हातरी एखादे फळ मिळायचे. एवढाच माझा आहार होता.

काही महिने अशा प्रकारे साधना केल्यानंतर मी श्रीशैल येथे आलो. मला भूक तर लागतच नसे व खाण्याची इच्छाही होत नसे.

श्रीशैल मल्लिकार्जुन मंदिराच्या परिसरात मी ईश्वरचिंतन करत बसलो होतो. एच. एम. दौला नावाचा एक मनुष्य माझ्याजवळ आला व त्याने आस्थेने माझी विचारपूस केली. माझी इच्छा नसतानाही आग्रहाने घरी नेऊन जेवायला वाढले व नंतर एका ओळखीच्या ट्रकमध्ये बसवून पुढील पन्नास कि.मी. पर्यंत प्रवासाची सोय केली.

दोन वर्षांनंतर मी परत श्रीशैलला गेलो व एच.एम. दौला यास भेटलो, तेव्हा त्याने मला पुढीलप्रमाणे हकिकत सांगितली. संपूर्ण हकिकत सांगताना त्याच्या डोळ्यांतून अश्रुधारा वाहत होत्या.

दोन वर्षांपूर्वी तुम्ही भेटण्याअगोदर मी दारिद्र्याने गांजलेला होतो. डोक्यावर कर्जाचा डोंगर होता. दहा रुपयेसुद्धा कोणी उसने देत नव्हते. अक्षरश: अश्रू पिऊन जगत होतो.

मुलांचे हाल बघवत नव्हते. कधी कधी उपाशी रहावे लागत होते. जेमतेम मुलांचे अर्धे पोट भरेल एवढे त्यांना देऊन आम्ही नवरा-बायको उपाशी झोपत होतो. ज्या दिवशी तुमची माझी भेट झाली त्या दिवशी एका व्यक्तीकडून व्याजाने पन्नास रुपये आणले होते व घरात भरपूर जेवण शिजविलेले होते. आपल्याकडे पाहिल्यानंतर मला वाटले की, आपण खूप मोठे अवलिया आहात व म्हणून मी आपल्याला आग्रह करून जेवायला वाढले.

तुम्हाला ट्रकमध्ये बसवून मी घरी गेलो. आनंद व समाधानाच्या लहरी माझ्या पोटातून डोक्याकडे जात होत्या. मला पाहताच माझी बायको म्हणाली, ''आज तुम्ही एकदम वेगळे दिसत आहात. आनंद तुमच्या चेहऱ्यावरून ओसंडून वाहत आहे.''

मी म्हणालो, ''ते साधू जेवून गेल्यापासून खरंच मला खूप आनंद वाटत आहे, समाधान वाटत आहे व आपले दैन्याचे दिवस संपले असे वाटत आहे. का कोण जाणे, माझे मन आनंदाने अक्षरश: नाचत आहे !''

माझी बायको म्हणाली, ''मलाही खूप आनंद होत आहे व घरातील वातावरण उत्साहवर्धक झालेले आहे.''

दुसऱ्या दिवशी एका कॉन्ट्रॅक्टरने मला बोलावले व एक कॉन्ट्रॅक्ट देऊन ॲडव्हान्सही दिला.

आज मी एक मोठा कॉन्ट्रॅक्टर झालेला असून, माझ्या डोक्यावरील सर्व कर्ज मी फेडून टाकले आहे. आत्मकूर येथे दहा एकर जागा खरेदी केली असून, शेतात एक विहीर खणली आहे. या विहिरीला भरपूर पाणी असून, दहा हॉर्स पॉवरची मोटार विहिरीवर बसवली आहे. एक दुमजली इमारत बांधली आहे. हे सर्व आपल्या आशीर्वादाने घडले.'' डोळ्यांतून वाहणाऱ्या अश्रुधारा पुसत एच. एम. दौलाने आपली कहाणी संपविली.

मी त्याला म्हटले...

''हे तुझ्या सत्कर्माचे फळ आहे. जेव्हा एखादा मनुष्य एखाद्या भुकेलेल्याला अन्न देतो, तेव्हा त्याला खूप पुण्याई प्राप्त होते आणि तू तर अनेक दिवस उपाशी असलेल्या एका माणसाला अन्न दिलेस, त्यामुळे तुझ्या हातून तीव्र सत्कर्म घडले त्याचे हे फळ आहे. अशीच सत्कर्मे करून पुण्य वाढवीत राहा !'' असे सांगून मी त्याचा निरोप घेतला.

एक चार्टर्ड अकाउंटन्ट होता. त्याची पत्नी शिक्षिका

होती. दोन मुले होती.

नोकरीसाठी खूप प्रयत्न करूनही त्याला नोकरी मिळत नव्हती. बेकारीमुळे तो हैराण झाला व दारू पिऊ लागला. दारूसाठी तो बायकोकडे पैसे मागू लागला व घरातून पैसे चोरू लागला. त्यामुळे रोज घरात भांडणे होऊ लागली.

या कुटुंबाला मी प्रत्यक्षात कधी भेटलो नाही. त्यामुळे त्यांची नावे मला माहीत नाहीत. एका भक्ताने मला वरील सर्व हकिकत सांगितली. मी त्या सद्भक्ताला सांगितले...

''त्या चार्टर्ड अकाउंटन्टला दररोज एक रुपया आंधळा, लुळा अथवा पांगळा यापैकी कोणाला तरी द्यायला सांगा!''

सद्भक्ताने माझा निरोप त्यांना पोहोचवला. त्या चार्टर्ड अकाउंटन्टने सांगितल्याप्रमाणे केले. दीड महिन्यात त्याला चांगली नोकरी मिळाली व त्याची दारूही सुटली.

परोपकार व दान याचा महिमा सर्व लोकांना कळावा या उद्देशाने वरील दोन कथा लिहिल्या आहेत. अशा शेकडो कथा मला माहीत आहेत. ईश्वराचा आश्रय घेऊन मानवाने जर योग्य मार्गाने प्रयत्न केले, तर मर्यादित प्रमाणात का होईना, मनुष्य

प्रारब्धावर मात करू शकतो, हेच या उदाहरणांवरून लक्षात येते.

ज्योतिषी सांगतो, ''आज खूप पाऊस पडणार आहे.''

ज्योतिषाने असे सांगितल्यावर आपण छत्री घेऊन बाहेर पडतो. पावसापासून आपले संरक्षण होते.

आपल्या प्रारब्धातील दु:खाचा, कष्टाचा, संकटाचा काळ एखाद्या चांगल्या ज्योतिषाकडून जाणून घेऊन तो काळ सुरू होण्यापूर्वीपासून व संपेपर्यंत भरपूर ईश्वरभक्ती करावी व परोपकार, दान करत रहावे, म्हणजे सर्व कष्ट सुसह्य होतात.

हिंदू धर्मामध्ये गाईला अतिशय पवित्र मानले जाते; कारण गाईमध्ये तेहतीस प्रकारची दिव्य स्पंदने आहेत. गाईला स्पर्श केल्याने अथवा गाईच्या आसपास काही क्षण उभे राहिल्याने आपल्या देहाची स्पंदने शुद्ध होऊ लागतात. यामुळे हिंदू धर्मामध्ये गाय पवित्र मानली गेली आहे.

# ८. मानव देहरहस्य

**हिमालयामध्ये** चालत-फिरत असताना अनेक दिव्य अद्भुत गोष्टी ऐकण्यास मिळाल्या, तर काही पाहण्यास मिळाल्या. त्या सर्व येथे देणे शक्य नाही. त्यातील काही येथे नमूद करीत आहे.

हिमालयामध्ये हेडाखान नावाचे एक छोटेसे गाव असून, या गावात जाण्यासाठी सुमारे सात-आठ मैल चालावे लागते. अजूनही या भागात रस्ते झालेले नाहीत. येथे सुमारे दोनशे वर्षांपूर्वी घडलेली घटना.

या गावात एक नदी असून, नदीच्या पलीकडे आदिकैलास नावाचा पर्वत आहे. असे म्हणतात की, पूर्वी

याच पर्वताला कैलास मानले जायचे. हिमालयात जसजशी उष्णता वाढू लागली, तसतसा बर्फ मागे मागे जाऊ लागला. पूर्वी गोमुख येथे बाराही महिने बर्फ असायचा, तर आता गोमुख येथे आठ महिने बर्फ असतो.

अशाप्रकारे हिमालयातील बर्फाचे प्रमाण १९६२ नंतर कमी झाले असून, १९६२ पासून वातावरणातील उष्णताही खूप वाढली आहे. सन २००० नंतर वातावरणातील उष्णता कमी कमी होऊ लागेल व सन २०५० पर्यंत उष्णतेने उघडी पडलेली हिमालयातील शिखरे पुनश्च बर्फाने झाकली जातील, असे हिमालयातील अनेक साधूंचे भाकित आहे. गेल्या दोन-चार वर्षांत थंडीचे प्रमाणही वाढू लागले आहे. त्यावरून हे भाकित खरे ठरेल, असे वाटते.

एक दिवस हेडाखान गावातील ग्रामस्थांनी पाहिले की, नदीपलीकडील कैलास पर्वतातून एक ज्योत खाली उतरत आहे. सर्वजण आश्चर्याने त्या ज्योतिकडे पाहू लागले.

ग्रामस्थ जेथे बसले होते तेथे जवळच ती ज्योत स्थिर झाली व त्या ज्योतितून एक योगी पुरुष प्रकट झाले.

सर्व ग्रामस्थ डोळे विस्फारून हा आश्चर्यजनक प्रकार पहात होते. सर्वांनी योगिराजांना साष्टांग नमस्कार घातला. तेथे जवळच असणाऱ्या एका गुहेत योगिराज राहू लागले.

लोक त्यांची सेवा करू लागले. ते अधूनमधून फळे खात व ताक पीत. त्यांनी अनेक अद्‌भुत लीला केल्या. त्यातील एक-दोन पुढे देत आहे.

हे योगिराज हेडाखान गावात प्रगट झाले, त्यामुळे सर्व लोक त्यांना हेडाखानबाबा म्हणू लागले.

हेडाखानबाबांचा मुक्काम अल्मोडा परिसरात होता. एक दिवस ते गुमानी नावाच्या आपल्या भक्तास म्हणाले, ''चल आपण बद्रिनाथला जाऊ या!''

हेडाखानबाबा व गुमानी उभयता चालत, मजल दरमजल करत बद्रिनाथला निघाले.

कर्णप्रयागच्या आसपास आल्यानंतर गुमानीची प्रकृती अचानक बिघडली. मृत्यू त्याच्या डोळ्यांसमोर दिसू लागला. त्याला आपल्या बायको-मुलांची आठवण येऊ लागली.

हेडाखानबाबा त्याला म्हणाले,

''गुमानी, तू काळजी करू नकोस, तू मरणार नाहीस. तुझ्याऐवजी मी मरेन!'' असे म्हणून हेडाखान बाबांनी गुमानीच्या देहावरून आपला वरदहस्त फिरविला.

गुमानीला, तसेच दर्शनार्थी जमलेल्या सर्वांना ते म्हणाले, ''गुमानीचा मृत्यू मी स्वत:वर ओढवून घेतला आहे.

उद्या सकाळी मी मरेन. तुम्ही सर्वांनी माझ्या देहाला अग्नि द्या व माझ्या देहाची राख गंगेत सोडून द्या !''

दुसऱ्या दिवशी सकाळी सूर्योदयाच्या सुमारास हेडाखानबाबा मृत्यू पावले. गुमानीने स्वत: त्यांच्या देहाला अग्नि दिला. इतर भक्तांच्या मदतीने मृत्यूनंतरचे सर्व संस्कार केले. तिसऱ्या दिवशी राख एकत्र करून गंगेत सोडली व तो अल्मोड्याला परत येण्यास निघाला. या सर्व गोष्टी करेपर्यंत पाच दिवस होऊन गेले होते. सहाव्या दिवशी गुमानीने अल्मोड्याच्या दिशेने प्रयाण केले.

त्या काळामध्ये रस्ते नव्हते, वाहने नव्हती. सर्व प्रवास चालत, पायवाटेने करावा लागत असे.

अल्मोड्याला येऊन तेथील सर्व भक्तांना त्याने हेडाखानबाबांच्या मृत्यूची हकिकत सांगितली.

सर्व भक्तांवर हेडाखानबाबांच्या मृत्यूच्या बातमीचा काही परिणाम झाला नाही. उलट ते विचित्रपणे गुमानीकडे पाहू लागले व ते गुमानीला म्हणाले,

''बद्रिनाथच्या दिशेने तुम्ही दोघेही निघालात हे खरे आहे; परंतु दोन दिवसांनंतर बाबा परत आले व ते अद्यापही येथेच आहेत. सुमारे दोन महिने हेडाखानबाबा कोठेही गेलेले

नाहीत.'' असे म्हणून सर्वजण गुमानीला घेऊन बाबा जेथे होते तेथे गेले.

हेडाखानबाबांना जिवंत पाहून गुमानीला आश्चर्याचा धक्का बसला. हा सर्व प्रकार कसा घडला हे कोणालाच कळले नाही. हेडाखानबाबा म्हणाले,

''जो मेला तो पण मीच व जिवंत आहे तो पण मीच!''

हेडाखानबाबांनी अशा अनेक लीला केल्या.

एकदा हेडाखानबाबा हेडाखान गावामध्ये दोन-तीन भक्तांबरोबर बसले होते. एक भक्त खिचडी करत होता.

हेडाखानबाबांनी त्याला विचारले...

''खिचडी तयार होण्यास कितीसा वेळ लागेल ?''

''बाबा! अर्ध्या तासात खिचडी तयार होईल,'' भक्ताने उत्तर दिले.

''मी गंगास्नान करून येतो!'' असे हेडाखानबाबा म्हणाले.

हे ऐकून गुमानी म्हणाला....

''बाबा! गंगा येथून साठ मैल दूर आहे. गंगेवर जायला चार दिवस व परत यायला चार दिवस, असे आठ दिवस

आपल्याला गंगास्नान करून यायला लागतील.''

यावर हेडाखानबाबा म्हणाले...

''खिचडी तयार होईपर्यंत मी गंगास्नान करून येईन. तुला माझ्याबरोबर यायचे असेल तर चल!''

गुमानीला आश्चर्य वाटले व तो म्हणाला, ''चला बाबा, मी पण येतो तुमच्याबरोबर!''

हेडाखानबाबांनी गुमानीचा हात धरला व त्याला डोळे मिटण्यास सांगितले.

दुसऱ्याच क्षणी दोघेही गंगाकिनारी पोहोचले. बाबांनी गुमानीला डोळे उघडण्यास सांगितले. दोघांनी गंगास्नान केले.

पुनश्च बाबांनी गुमानीचा हात धरला. त्याला डोळे मिटण्यास सांगितले. एका क्षणात ते हेडाखानला पोहोचले होते.

अशाप्रकारे एकशे वीस मैलांचा प्रवास गुमानीला घेऊन हेडाखानबाबांनी केवळ एका तासात केला. ते परत येईपर्यंत खिचडी तयार झालेली नव्हती.

अशाप्रकारे अनेक लीला करीत हेडाखानबाबा हिमालयातील हेडाखान, आस्कोट, पिठोरागड, काठगोदाम, भीमताल, नैनिताल, सितलाखेत इत्यादी परिसरात फिरत होते.

नेपाळच्या राजासहित असंख्य लोक त्यांचे भक्त होते. एक दिवस हेडाखानबाबांनी सर्वांना सांगितले की, आपण आता अदृश्य होणार!

ही बातमी नेपाळच्या राजाला कळताच नेपाळचा राजा लवाजम्यासहित आला. एका विशिष्ट दिवशी हेडाखानबाबांनी आस्कोटच्या दिशेने प्रयाण केले. नेपाळच्या राजाने पालखीत बसून प्रयाण करावे म्हणून प्रार्थना केली. हेडाखानबाबा पालखीत बसले. सर्व लवाजम्यासहित पालखी आस्कोटला आली. आस्कोटपासून तीन मैलांवर काळी नदी व गोरी नदी यांचा संगम आहे.

या संगमावर बाबा पालखीतून उतरले. त्यांनी सर्वांना तेथेच उभे राहण्यास सांगितले व दोन्ही नद्यांच्या संगमात कमरेइतक्या पाण्यात उभे राहिले. सर्वजण हेडाखानबाबांकडे एकटक पहात होते.

अचानक हेडाखानबाबांचा देह ज्योतिर्मय झाला. ती ज्योत आकाशाच्या दिशेने वर गेली व अनंत आकाशात विलीन झाली.

कर्नाटकामध्ये सुमारे २००० वर्षांपूर्वी अल्लमप्रभू नावाचे एक महायोगी होऊन गेले. त्यांचा देहही चिन्मय होता.

एकदा एका नाथपंथी साधूने त्यांच्या अंगावर तलवारीचे असंख्य वार केले; परंतु त्यांना काहीही झाले नाही. हवेत फिरविल्याप्रमाणे तलवार त्यांच्या देहातून आरपार जात होती.

भारतामध्ये अशा प्रकारचे शून्यदेह योगी एकेकाळी खूप होते. कलीचा प्रभाव जसजसा वाढू लागला, तसतसे हे अजर-अमर शून्यदेह महायोगी, सामान्य जनांना दिसेनासे झाले; तरीपण अजूनही काही भाग्यवंतांना, अरण्यात फिरणाऱ्या साधकांना अशा अजर-अमर महायोग्यांची दर्शने होतात; तसेच हज़ारो वर्षांपासून तप:श्चर्या करणाऱ्या ऋषी-महाऋषींचे दर्शन काही वेळा पूर्वपुण्याईने होत असते. श्रीशैल, निलगिरी पर्वतातूनही प्राचीनकालीन ऋषी आजही तपस्या करत आहेत, असे म्हटले जाते.

एकदा काही शिकारी अरण्यामध्ये शिकारीसाठी गेले होते. त्यांनी एक हरणांचा कळप पाहिला व हरणांवरती गोळ्या झाडल्या; परंतु एकही गोळी हरणांना लागली नाही व हरणे पळालीही नाहीत. शिकाऱ्यांना या गोष्टीचे अतिशय आश्चर्य वाटले. म्हणून ते हरणांच्या मागोमाग गेले.

एका शिलेवर श्री स्वामी समर्थ (अक्कलकोट) बसलेले त्यांनी पाहिले. सर्व हरिणे त्यांच्याजवळ जाऊन उभी राहिली.

शिकाऱ्यांना खूप राग आला. त्यांनी हरणांवर परत गोळ्या झाडल्या; परंतु एकही गोळी हरणांना लागली नाही.

हा साधू काहीतरी मंत्रविद्या करत आहे असे त्यांना वाटले म्हणून त्यांनी सरळ श्री स्वामी समर्थांनाच गोळ्या घातल्या.

शिकारी समर्थांना गोळ्या घालत होते व सर्व गोळ्या समर्थांच्या शरीरातून आरपार जात होत्या.

हा सर्व प्रकार पाहून शिकारी थक्क झाले व समर्थांना शरण आले.

श्री समर्थांनी त्यांच्याकडून ''आयुष्यात पुन्हा कधीही शिकार करणार नाही.'' असे वचन घेतले व क्षमा केली.

या अध्यायामध्ये महायोग्यांच्या अतिशय महत्त्वपूर्ण व निवडक कथा दिल्या आहेत. अशा आणखी कितीतरी कथा सांगता येतील. उदाहरणार्थ –

१) **सिद्ध नागार्जुन :–** हे सुमारे दीड हजार वर्षांपूर्वी होऊन गेलेले सिद्धपुरुष ! हे रसायनविद्येच्या आधाराने दगड–मातीचेही सोने बनवत असत.

२) **चिदंबर दीक्षित :** यांनी अनेकदा मातीचे सोने बनविले. हे अठराव्या शतकात होऊन गेले.

**३) श्री स्वामी समर्थ (अक्कलकोट) :** यांनी सर्पाचे सोने बनविले, हाडाचे सोने बनविले व मातीचेही सोने बनविले.

४) सुमारे दोन हजार वर्षांपूर्वी भारतात असे योगी होते, की त्यांच्या लघवीनेच धातूचे रूपांतर सोन्यामध्ये होत असे.

रक्त, हाडे, मांस म्हणजे मनुष्यशरीर असे विज्ञान म्हणते. अशा या विज्ञानाला व वैज्ञानिकांना या अध्यायातील कथा, विचार करण्यास लावतील.

मानवी देह म्हणजे एक रहस्य असून, या रहस्याचा पूर्ण उलगडा महायोग्यांशिवाय कोणालाही झालेला नाही. ढोबळमानाने सांगायचे झाल्यास, ढोपरापासून अंगठ्यापर्यंत क्षुद्र व अतिक्षुद्र शक्तींची केंद्रे आहेत. ढोपरापासून मांड्यांपर्यंत शक्तींची लाखो केंद्रे असून या सर्व शक्ती तामसमार्गात किंवा अंध:कारमय मार्गात येतात.

मांड्यांपासून वरच्या भागामध्ये हळूहळू तांबडे फुटावे त्याप्रमाणे (म्हणजे सूर्योदयाच्या अगोदर पहाट होते त्याप्रमाणे) प्रांत सुरू होतो व मूलाधार चक्रापासून धवल मार्गाची सुरुवात होते. नाभी स्थान हे सूर्याचे स्थान आहे. येथे आध्यात्मिक सूर्याचे दर्शन होते व नाभी स्थानापासून सहस्रार चक्रापर्यंत सर्व

ईश्वरीय प्रांत आहेत.

महायोग्यांना आपल्या देहातील सर्व केंद्रे शुद्ध व स्वच्छ करावी लागतात. तळपायापासून तो नाभीपर्यंतचा सर्व प्रांत व त्या प्रांतातील कोट्यावधी केंद्रे परिपूर्ण रितीने शुद्ध, स्वच्छ व प्रकाशमय करावी लागतात. इतके सर्व झाल्यानंतरच योगी खऱ्या अर्थाने महायोगी होतो, देहासहित प्रकाशमय होतो व देहासहित शून्य होतो.

अर्थात एका जन्मात या सर्व गोष्टी साध्य होत नाहीत. त्यासाठी अनेक जन्म घ्यावे लागतात व विविध प्रकारच्या साधना/तपस्या कराव्या लागतात. असे योगी बहुतकरून एकांतवासात राहतात.

मानवी मेंदू, षड्चक्रे, मानवी शरीरातील विशिष्ट केंद्रे, यावर संशोधन होणे अतिशय आवश्यक आहे व मानवी शरीरातील चांगल्या शक्तींची केंद्रे जर जागृत करता आली, तर मानवामध्ये सद्गुणांचा विकास होईल, मनुष्य भाग्यवान बनेल, तसेच त्याला दिव्य शक्तीही प्राप्त होईल.

मी असेही काही साधू पाहिले की, जे कुणाचीही कुंडलिनी व षड्चक्रे जागृत करतो असे सांगत असत परंतु प्रत्यक्षात ते कुंडलिनी व षड्चक्रे जागृत न करता माणसाच्या

शरीरात पिशाच्चे किंवा तिसऱ्या लोकातील आत्मे घुसवून देत असत.

आध्यात्मिक उन्नतीच्या दृष्टीने याचा काही उपयोग होत नाही. यातील काही साधू तर माणसाच्या शरीरातील पिशाच्च केंद्रे जागृत करत असत व त्यामुळे आपणाला काही दिव्य अनुभव येत आहेत, असा आभास भक्ताला होत असे.

आध्यात्मात झटपट प्रगती व्हावी किंवा काहीतरी अद्भुत चमत्कारिक मिळावे, अशा वृत्तीचे लोक येथे फसतात व त्यांना मरेपर्यंत आपण चुकलो हे कळत नाही. काही लोकांच्या घरामध्ये देवादिकांच्या फोटोतून भरपूर विभूती बाहेर पडताना मी स्वत: पाहिली आहे. ज्यांच्या घरामध्ये असे प्रकार घडतात ते लोक आपल्या घरामध्ये साक्षात् ईश्वराचे अस्तित्व आहे असे समजतात परंतु यातील बरेच प्रकार भूतविद्येचे असतात.

अर्थात वरच्या परिच्छेदामध्ये जे काही मी लिहिले आहे ही सत्याची एक बाजू आहे; परंतु दुसरे सत्य असे आहे की, काही सिद्धपुरुष आपल्या भक्तांची कुंडलिनी व षडचक्रे जागृत करून देतात. उच्च कोटीच्या देवता, महालक्ष्मी, दुर्गा इत्यादी यांचा संचार आपल्या भक्तांमध्ये करवून देतात व

त्यांच्याकडून उत्तम प्रतीचे मार्गदर्शनही मिळवून देतात, तर काही लोकांच्या घरामध्ये दिव्य आत्म्यांच्या प्रभावाने विभूती, कुंकू, गुलाल व बुक्का पडणे असे चमत्कारही घडतात.

या सर्व गोष्टी नेमक्या कुठल्या शक्तीने घडत आहेत हे समजण्यास मार्ग नाही. याबाबतीत मला आठवलेल्या एक-दोन गोष्टी सांगितल्या तर वाचकांचे मनोरंजन होईल.

एकदा एका व्यक्तीने मला सांगितले की, ''माझ्या अंगामध्ये अमुकअमुक सत्पुरुषाचा संचार आहे.'' त्याने ज्या सत्पुरुषाचे नाव घेतले ते सत्पुरुष माझे अतिशय जवळचे मित्र होते परंतु ही गोष्ट त्याला न सांगता सत्य काय आहे हे पाहायचे ठरविले.

मी त्याला विचारले, ''तुझ्या अंगात केव्हा संचार होतो?''

तो म्हणाला, ''केव्हाही! मी बोलविता क्षणी ते सत्पुरुष माझ्या अंगात संचार करतात व बोलू लागतात; तसेच माझ्यामध्ये इतर काही देवताही येतात.''

मी त्याला त्या सत्पुरुषांना बोलवायला सांगितले.

एका क्षणात त्याचे अंग हलू लागले व तो त्या

सत्पुरुषाच्या आवाजाची नक्कल करत बोलू लागला.

आता त्या सत्पुरुषाबरोबर थोड्या इकडच्या-तिकडच्या गप्पा मारल्यानंतर, मी पटकन त्या सत्पुरुषाला तो जेथे रहात आहे, त्या गावच्या शेजारच्या गावाचे नाव विचारले.

एका क्षणापूर्वी आपण ब्रह्माण्डाचे कसे स्वामी आहोत, असे सांगणाऱ्याला तो स्वत: जेथे चाळीस वर्षे रहात आहे त्याच्या शेजारच्या गावाचे नाव सांगायची वेळ आली तेव्हा गडबड उडाली व संचार निघून गेला.

यावरून तो संचार त्या सत्पुरुषाचा नव्हता हे सिद्ध झाले.

नवनाथ, दत्त, महालक्ष्मी यांची नावे संचारात अनेक भूते सांगतात, असा माझा अनुभव आहे; परंतु त्याचबरोबर काही संचार खऱ्या देवतांचे असतात, हेही खरे आहे.

कर्नाटकामध्ये फिरत असताना मला आणखी एक विचित्र अनुभव आला. सत्ती सौंदी नावाच्या गावामध्ये मी दोन-चार दिवस राहिलो होतो. या काळात विराप्पा नावाच्या एका व्यक्तीबरोबर माझा परिचय झाला.

मी ते गाव सोडून पुढे निघून गेलो. पुनश्च दोन वर्षांनी

त्या गावात परत गेलो तेव्हा गावातील लोकांनी मला एक अद्‌भुत प्रकार सांगितला.

गावातील ग्रामस्थ माझ्याकडे आले व मला म्हणाले,

''विराप्पाच्या बायकोमध्ये चक्क तुमचा संचार येत आहे व ती लोकांना उपास तापास वगैरे करण्यास सांगत आहे. तसेच आपल्या घराच्या वाऱ्या करण्यास सांगत आहे.''

मला या गोष्टीचे अतिशय आश्चर्य वाटले व मी माझ्याच संचाराच्या दर्शनार्थ गेलो.

त्या स्त्रीच्या अंगात एका भुताचा संचार झाला होता व तो चक्क माझे नाव सांगत होता. मी त्या भुताला सज्जड दम भरला. त्याने माफी मागितली व पुन्हा असे प्रकार करणार नाही, असे सांगितले. पण प्रत्यक्षात पुढे काय झाले हे मला माहीत नाही, कारण ही घटना सुमारे बत्तीस वर्षांपूर्वीची आहे. पुनश्च गावात जाण्याचा योग आला नाही. मात्र काही संचार खूपच चांगले असतात हेही तितकेच खरे आहे.

तिसऱ्या लोकामध्ये अडकलेले काही सज्जन आत्मे आपला लवकर उद्धार व्हावा म्हणून परोपकाराचे कार्य करतात व अशा वेळी ते एखाद्या सत्पुरुषाचे अथवा देवतेचे नाव

वापरतात; कारण जितक्या लोकांना ते सन्मार्गाला लावतील तितके पुण्य त्यांच्या खात्यात जमा होत असते. म्हणून म्हणतात,

**'परोपकार हेच पुण्य व परपीडा हेच पाप.'**

प्रत्येक माणसाच्या भोवती एक संरक्षक वलय असते. स्तोत्रपठणाने व सत्ग्रंथाच्या वाचनाने, एखाद्या स्तोत्राचे हजारो पाठ केल्याने, एखाद्या विशिष्ट मंत्राचा लाखो वेळा जप केल्याने हे संरक्षक कवच अधिकाधिक सुदृढ होत जाते. ईर्षा, द्वेष, मत्सर केल्याने, दारू, गांजा इत्यादी व्यसनाने हे संरक्षण कवच दुर्बल होते व दुष्ट शक्ती शरीरात प्रवेश करू लागतात.

उपासना करताना नेहमीच सात्त्विक देवतेची उपासना करावी. गणपती, दुर्गा, सरस्वती, महालक्ष्मी, ललिता, षोडषीत्रिपुरसुंदरी, दत्तात्रेय, गायत्री, विष्णू, शिव अशा देवतांची उपासना करण्यास हरकत नाही. यांच्याच कृपेने भक्तांचा उद्धार होतो. याउलट...

तामस देवतांच्या उपासनेने अंध:कारमय अशा पिशाच्चलोकाशी आपला संपर्क साधला जातो. सुरुवाती-सुरुवातीला काही चमत्कारिक, अद्भुत अनुभव येतात; परंतु

साधक मात्र हळूहळू पिशाच्चांच्या कब्जात जातो व पिशाच्चे त्याचा वापर करू लागतात.

मनुष्यजन्म ही मध्य स्थिती आहे. सत्कर्मे, परोपकार, ईश्वरभक्ती, चांगले विचार, मनाचा मोठेपणा, इतरांना मदत करण्याची वृत्ती, इतरांना क्षमा करण्याची वृत्ती, इतरांना आनंद देण्याची वृत्ती, पराकोटीचा नि:स्वार्थीपणा, नि:स्पृहता इत्यादी सद्गुण मानवाला देवत्व प्राप्त करून देतात व देवत्व प्राप्त झाल्यानंतरच खऱ्या अर्थाने योगसाधना सुरू होते व अनेक वर्षे योगसाधना केल्यानंतर मनुष्य दिव्य देहधारी सिद्धपुरुष होतो, जीवनमुक्त होतो.

मनुष्यजन्म मिळाल्यानंतर ईर्षा, द्वेष, मत्सर, कपट, कारस्थान, स्वार्थ, भूताखेतांच्या साधना, क्षुद्र शक्तींच्या उपासना अशा गोष्टी केल्यास आत्म्याची अधोगती होते व भूत, प्रेत, पिशाच्चलोकात हजारो वर्षे यातना भोगाव्या लागतात.

मनुष्यदेह एक वाहन आहे, या वाहनात बसून कुठे जायचे हे ज्याचे त्याने ठरवावे.

# ९. मानव मृत्युरहस्य

**मानवी** जीवनातील अनेक गूढ रहस्यांवर आपण प्रकाश टाकला आहे; तसेच मृत्यूनंतरचे परलोक जीवन कसे असते या विषयावरही माझ्या काही पुस्तकांमध्ये उल्लेख केलेला आहे.

मानवी जीवन जितके रहस्यमय असते, मानवी मृत्यूही तितकाच रहस्यमय असतो. मृत्यूच्या रहस्याकडे एक दृष्टिक्षेप.

मानवाचा मृत्यू झाल्यानंतर तिसऱ्या दिवशी स्मशानात जाऊन अस्थी गोळा करतात. या क्रियेला सारी भरणे असे म्हणतात. (हल्ली विद्युतदाहिनीमुळे अस्थी ताबडतोब घरी आणता येतात.)

अस्थी घरी आणल्यानंतर एखादा दिवस त्या घरी ठेवतात व नंतर पवित्र नदीमध्ये विसर्जन करतात.

हजारो वर्षांपूर्वी भारतामध्ये तांत्रिक-मांत्रिक लोकांचे प्राबल्य होते. मृत व्यक्तीचे एखादे हाड मांत्रिकाच्या हाती लागल्यास त्या हाडावर मंत्रविधी करून मांत्रिक त्या मृतात्म्याला आपला गुलाम बनवीत असे. असे घडू नये म्हणून अस्थी नदीत विसर्जन करण्याची प्रथा पडली. अस्थी घरी आणल्यानंतर त्यावर एक तांत्रिक क्रिया सुमारे एक हजार वर्षांपूर्वी केली जात असे. मुसलमानी आक्रमणाच्या काळात ही क्रिया पूर्णपणे लुप्त झाली. हल्ली ही क्रिया कोठेही केली जात नाही. इतकेच काय, या क्रियेविषयी कोणालाही काहीही माहीत नाही.

ही क्रिया पुढीलप्रमाणे केली जात असे.

एका छोट्याशा मडक्यामध्ये अस्थी ठेवून, ते मडके एका पाटावर ठेवले जात असे व मंत्रोच्चार करीत निखाऱ्यावर विशिष्ट प्रकारचा धूप टाकून मृतात्म्याला आवाहन केले जात असे. काही क्षणांतच मृतात्मा तांत्रिकासमोर साकार होत असे.

साकार झालेला मृतात्मा आपल्या मरणोत्तर स्थितीची सर्व माहिती तांत्रिकास देत असे. मरणोत्तर स्थिती जर वाईट असेल, तर मृतात्म्याला सद्‌गती प्राप्त व्हावी म्हणून उपाय

करण्यात येत असत.

कुंभार समाजामध्ये आजही कुंभारक्रिया म्हणून एक प्रकार कुंभार जातीतील वृद्ध मंडळी करतात; परंतु काळाच्या ओघामध्ये आत्म्याच्या सद्‌गती-दुर्गतीचे ज्ञान समाजाला न राहिल्याकारणाने फक्त कुंभारक्रिया करणे, आत्म्याला बोलाविणे व त्याच्या इच्छा विचारणे इतकेच केले जाते. या व्यतिरिक्त आत्म्याला सद्‌गती देणाऱ्या दुसऱ्या क्रिया केल्या जात नाहीत.

मारुती साळवी हा माझा बालपणीचा मित्र असून, गेली चाळीस वर्षे आम्ही एकमेकांचे मित्र आहोत. त्याच्याकडून मला कुंभारक्रियेसंबंधी जी काही माहिती मिळाली ती पुढे देत आहे.

कुंभारक्रियेमध्ये आत्म्याला आवाहन केले जाते व आत्मा कोणाच्या तरी शरीरात शिरून बोलतो. आलेल्या आत्म्याला प्रश्न विचारून तोच आत्मा आलेला आहे का, याची खात्री केली जाते.

मारुती साळवीचा मामेभाऊ हरिश्चंद्र साळवी याच्या मृत्यूनंतर कुंभारक्रिया केली होती. मृतात्मा हरिश्चंद्र साळवी हा आपल्या बहिणीच्याच शरीरात प्रवेश करून बोलू लागला.

प्रथम त्याने आपली आवडती पँट - शर्ट घातली व

सर्वांना पुनश्च भेटल्याचा आनंद व्यक्त केला व आपले आवडते पेय थोडेसे प्याला. त्याच्याशी पुढीलप्रमाणे प्रश्नोत्तरे झाली –

**प्रश्न :** तू हरिश्चंद्र आहेस हे कशावरून ?

**उत्तर :** मी हरिश्चंद्र आहे. मी ऑप्टिशियन होतो व दुकानात काम करत होतो.

**प्रश्न :** तुला कशाने मृत्यू आला ?

**उत्तर :** मी आजारी होतो व औषधे व्यवस्थित घेतली नाहीत, म्हणून मला मृत्यू आला. औषधे घेण्यामध्ये मी निष्काळजीपणा केला नसता तर आणखी दहा वर्षे जगलो असतो.

**प्रश्न :** तुझे मरणोत्तर जीवन कसे काय आहे ?

**उत्तर :** एक-दीड वर्षामध्ये माझ्या भावाचा मुलगा म्हणून मी परत जन्म घेणार आहे.

एवढी प्रश्नोत्तरे झाल्यानंतर सर्वजण जेवायला बसले. हरिश्चंद्राच्या आवडीचे सर्व पदार्थ (मटण, मासे वगैरे) जेवणात केलेले होते. आपल्या बहिणीच्या मुखाने हरिश्चंद्र पोटभर जेवला व नंतर सर्वांचा प्रेमाने निरोप घेऊन त्याने आपल्या बहिणीचे शरीर सोडले.

अर्धमूर्च्छित अवस्थेतून हरिश्चंद्राची बहीण जागृत झाली. आपल्या देहावर पुरुषाचे कपडे पाहून तिला अतिशय लाज वाटली. खोलीत जाऊन तिने कपडे बदलले व साडी नेसून ती बाहेर आली, तेव्हा सर्वांनी तिला हरिश्चंद्राने तुझ्या देहात प्रवेश केला होता, असे सांगितले.

मला खूप भूक लागली आहे, हरिश्चंद्राची बहीण म्हणाली, तिचे हे उद्‌गार ऐकून सर्वांना आश्चर्य वाटले व ते म्हणाले, ''तू आत्ताच भरपूर जेवलीस व मटण-मासेही खूप खाल्लेस.'' हे ऐकून हरिश्चंद्राची बहीण म्हणाली, ''असे होईलच कसे? आज तर माझा उपवास आहे. मी मासे, मटण खाणे शक्यच नाही. मला उपवासाचे पदार्थ खायचे आहेत.''

हे ऐकून सर्वांना आश्चर्य वाटले. एक वर्षानंतर हरिश्चंद्र आपल्या भावाच्या पोटी जन्माला आला. मानवी जीवन गूढ व रहस्यमय आहेच; पण मानवाचा मृत्यूही तितकाच रहस्यमय आहे.

मृत्यूनंतर १०,११,१२,१३ या चार दिवसांमध्ये विविध प्रकारचे विधी केले जातात. या विधींमध्ये काय रहस्य आहे, हे समजण्यास मार्ग नाही. शेवटच्या दिवशी पिंडदानाचा एक प्रकार असतो. भाताचे अनेक पिंड बनवितात व त्यातील एक पिंड मृतात्म्याच्या नावाने ठेवलेला असतो. मृतात्मा अतृप्त

असल्यास, त्याची काही इच्छा शिल्लक असल्यास, मृतात्म्याच्या नावाने ठेवलेल्या पिंडाला कावळा शिवत नाही. हा प्रकार आजही पाहायला मिळतो.

कुंभारक्रियेमध्ये आणखी एक विशिष्ट घटना घडते. काही दुष्कर्मांमुळे जर मृतात्म्याला पुढील जन्म मनुष्येतर योनीमध्ये मिळणार असेल तर मृतात्मा ज्या योनीत जाणार आहे, त्या योनीचे चित्र म्हणजे पक्ष्याचे चित्र अथवा पशूचे चित्र तेथे ठेवलेल्या पिठावर उमटते.

पुष्कळवेळा मृतात्मा मुंगीच्या रूपाने येऊन आपला आवडता पदार्थ खातो अथवा पितो. जेव्हा असे घडते तेव्हा मृतात्म्याला मनुष्यजन्म मिळणार नाही, असे समजले जाते.

एकदा अशीच कुंभारक्रिया सुरू असताना तेथे एक मुंगी आली व कपामध्ये ठेवलेली दारू पिऊ लागली. हे पाहून मृतात्मा मुंगीच्या रूपाने आला असे लोक समजले.

मानवी जीवनाइतकाच मृत्यू गूढ, गहन व रहस्यमय आहे. यावर संशोधन व्हायला हवे व मृत्यूनंतर आत्म्याला सद्‌गती कशी प्राप्त होईल, यावर विचार करायला हवा.

# १०. प्रार्थनेचा प्रभाव

**स्तोत्रपठण**, मंत्र, जप, ग्रंथवाचन व प्रार्थना हे सर्व ईश्वरभक्तीचे प्रकार आहेत. यातील कुठल्याही मार्गाचे अनुसरण केल्याने सद्भक्ताला चांगले अनुभव येतात. दु:ख-कष्टांचे निवारण होते. समस्या सुटू लागतात. अडचणीतून मार्ग मिळतो असे अनुभव येतात.

सद्भक्तांच्या कल्याणासाठी देवता तत्पर असतात; परंतु मानवाने ईश्वरभक्ती करावी, परोपकार व दान करावे, माणुसकीने वागावे व आध्यात्मात थोडीफार तरी प्रगती करून घ्यावी, अशी देव-देवतांची इच्छा असते. असे न वागल्यास देव-देवतांची कृपा नष्ट होण्याचीही शक्यता असते. म्हणून

सद्भक्तांनी हे लक्षात ठेवावे की, ईश्वरभक्ती, प्रेम, परोपकार व माणुसकी या गोष्टी तुम्हाला दैवी कृपा प्राप्त करून देतात.

केवळ स्वार्थापुरती देवाची प्रार्थना करणाऱ्या लोकांना ईश्वराच्या दरबारात काहीही स्थान नसते. वरील मुद्यांवर प्रकाश टाकणाऱ्या काही घटनांचा या प्रकरणात परामर्ष घेऊ.

श्री स्वामी समर्थ सप्तशती, श्री दुर्गा सप्तशती, श्री दुर्गा त्रिशती, संक्षिप्त श्रीगुरुचरित्र, श्री सिद्धलीलामृत-श्री दत्तलीलामृत या पोथ्या लेखकाने लिहिल्या आहेत, तसेच इतरही अनेक आध्यात्मिक पुस्तके लिहिलेली आहेत. पुस्तके व ग्रंथ वाचणाऱ्यांना योग्य मार्ग मिळावा म्हणून नेहमी मी प्रार्थना करीत असतो. या प्रार्थनेचा प्रभाव म्हणून की काय, हजारो लोकांना दिव्य अनुभव येत असतात. यातील काही निवडक अनुभव पुढे देत आहे.

शीतलादेवी मुंबई येथे नवरात्रोत्सव सुरू होता. आमच्या प्रकाशकांचा एक सहाय्यक यशवंत याने शीतलादेवी मंदिराजवळ एका फूल विक्रेत्याकडे श्री स्वामी समर्थ सप्तशती पोथ्या ठेवल्या.

त्या रात्री अक्कलकोटनिवासी श्री स्वामी समर्थ फूल विक्रेत्याच्या पाच वर्षांच्या मुलीच्या स्वप्नात आले व तिच्याबरोबर गोट्या खेळू लागले. थोडा वेळ तिच्याबरोबर

गोट्या खेळून त्यांनी तिला भरपूर गोट्या दिल्या व आशीर्वाद देऊन निघून गेले.

पहाटे पाच वाजता ती मुलगी उठली व गोट्या शोधू लागली. 'माझ्या गोट्या कोठे गेल्या ?' म्हणून रडू लागली. आई-वडिलांनी 'काय झाले ?' म्हणून विचारले असता तिने श्रीस्वामी समर्थ सप्तशतीवरील अक्कलकोट स्वामींचा फोटो दाखवून म्हणाली, ''हे आजोबा माझ्या स्वप्नात आले होते. माझ्याशी गोट्या खेळले व मला भरपूर गोट्या देऊन गेले.'' असे म्हणून गोट्या कोठे आहेत, म्हणून ती विचारू लागली !

आई-वडिलांनी तिची समजूत घालून तिला परत झोपविले.

श्रीस्वामी समर्थ सप्तशती या ग्रंथावर अक्कलकोट स्वामींचा जो फोटो छापलेला आहे तो फोटो जर खूप मोठा केला तर त्यांच्या उजव्या हातात एक गोटी आहे, असे स्पष्ट दिसते. श्रीस्वामी समर्थ सप्तशतीवरील फोटो लहान असल्याने ती गोटी दिसत नाही. या मुलीला स्वामींनी स्वप्नामध्ये गोट्या देऊन आपण स्वत: आल्याचे सूचित केले. म्हणजे हा स्वप्नभ्रम नव्हता. श्रीस्वामी समर्थांच्या चरित्रामध्ये श्री स्वामी समर्थांचा अवतार शके १०७१, चैत्र, शुद्ध द्वितीया, अश्विनी नक्षत्र, प्रात:काळी दोन घटका दिवस असताना हस्तिनापुराहून

बारा कोसांवर छेलाखेडा नावाच्या गावात एका वडाच्या झाडाखाली गणपती मूर्तीसन्निध श्री महाराजांचा भक्त रामसिंग हा गोट्या खेळत असता त्याच्यावर गोट्यांचा डाव आल्यामुळे श्री स्वामी समर्थांची अष्टवर्षांची मूर्ती धरणीतून प्रकट झाली. अशा प्रकारे स्वामी समर्थांचा अवतार झाल्याचे लिहिले आहे.

सकाळी उठल्यानंतरही ती मुलगी गोट्यांची आठवण करत होती व स्वामी समर्थांची आठवण करत होती. दुपारी तिची मावशी तिच्याकडे आली. इतर बायकांबरोबर बोलताना ती मावशी म्हणाली,

''माझा हा रोग केव्हा जाणार ईश्वरालाच माहीत. किती डॉक्टर केले, किती औषधे केली पण रोग बरा होत नाही.''

हे ऐकून ती पाच वर्षांची मुलगी म्हणाली...

''मावशी तू हे पुस्तक वाच! म्हणजे तुझे सगळे रोग जातील.'' असे म्हणून तिने श्री स्वामी समर्थ सप्तशती तिला दिली.

तिच्या मावशीने ती श्रद्धेने घेतली व वाचायला सुरुवात केली. दुसऱ्याच दिवशी ती परत त्या मुलीला भेटायला आली व मुलीच्या आईला म्हणाली, ''तुझ्या मुलीच्या तोंडात साखर

पडो. बऱ्याच वर्षांनी मला आज खूपच बरे वाटत आहे. अगदी आपण बरे झालो, असे वाटत आहे. खूप उत्साह वाटत आहे.''

श्री. प्रभाकर मुळे वकील आहेत. यांच्याकडे सल्ला घेण्यासाठी म्हणून एक कुटुंब आले.

''सून बरोबर वागत नाही व सुनेच्या वागण्यामुळे आम्ही कंटाळलो आहोत. आम्हाला घटस्फोट मिळवून द्या,'' असे त्यांनी सांगितले.

श्री. मुळे यांनी त्यांची समजूत घातली. त्यांना संक्षिप्त श्रीगुरुचरित्र पोथी दिली व रोज वाचायला सांगितले. वकिलाचा हा विचित्र सल्ला ऐकून सासरेबुवा जरा चक्रावले, परंतु सासूबाईंनी संक्षिप्त श्रीगुरुचरित्र वाचण्याचे कबूल केले.

दोन-तीन आठवड्यांनंतर सासू, सासरा व मुलगा श्री. प्रभाकर मुळे यांच्याकडे आले.

सर्वांचे चेहरे आनंदाने प्रफुल्लित झालेले होते. ते म्हणाले, ''संक्षिप्त श्रीगुरुचरित्राची पोथी आमच्या घरात वाचण्यास सुरुवात केल्यापासून आमच्या घरातील वातावरण पालटले. माहेरी निघून गेलेली सून घरी परत आली व घरातील भांडणे बंद झाली !'' असे म्हणून त्यांनी श्री. प्रभाकर

मुळे वकिलांचे आभार मानले.

एक सद्‌भक्त श्रीगुरुलीलामृत नावाचा श्री स्वामी समर्थांचा ग्रंथ दररोज वाचत असे. एकदा ते हा ग्रंथ वाचत असताना त्यांच्यासमोर एक व्यक्ती आली व श्री स्वामी समर्थ सप्तशती त्यांना देऊन म्हणाली,

''हा ग्रंथ सिद्धयोग्याने लिहिला असून, या ग्रंथात शक्ती आहे!'' असे म्हणून श्री स्वामी समर्थ सप्तशती ग्रंथ देणारी ही व्यक्ती अदृश्य झाली.

श्री दुर्गा सप्तशती या ग्रंथाचेही लोकांना असेच अनुभव येत आहेत.

एका स्त्रीची परिस्थिती अतिशय हलाखीची होती. तिने श्री दुर्गा सप्तशती ग्रंथातील देवीसूक्त दररोज तीन वेळा वाचायला सुरुवात केली. तिची सर्व परिस्थिती पालटली व ती सुखी झाली.

देवीसूक्ताचे १४०० पाठ पूर्ण झाल्यानंतर तिला देवीने स्वप्नात दर्शन दिले. (श्री दत्तावधूत विरचित श्री दुर्गासप्तशती ग्रंथाच्या पाचव्या अध्यायात देवीसूक्त हे स्तोत्र आहे.)

डॉ. मेघल ठक्कर ही कॅनडामध्ये राहते. भारतातील तिच्या आजारी आईला आराम वाटावा म्हणून ती श्री

दत्तलीलामृत – श्री सिद्धलीलामृत वाचते. या पोथीच्या पारायणाने भारतातील तिच्या आईला खूप चांगले वाटते, असा तिचा अनुभव आहे. काही कारणाने जेव्हा तिचे वाचन बंद पडते तेव्हा तिच्या आईची प्रकृती बिघडते व वाचन सुरू करताच प्रकृती सुधारते.

अशाप्रकारे ग्रंथवाचन व स्तोत्रवाचनाने निरनिराळे अनुभव येतात. देव-देवता असे अनुभव माणसातील भक्ती वाढावी म्हणून देतात; परंतु माणसातील भक्ति-भावना न वाढता माणसाने जर स्तोत्र, मंत्र, प्रार्थना यांचा वापर फक्त स्वत:च्या स्वार्थापुरताच केला, तर देवता नाराजही होतात, याचीही जाणीव ठेवायला हवी. याचे एक उदाहरण देत आहे.

सुमारे वीस वर्षांपूर्वी मी मुंबईत श्री. मुळे यांचेकडे आलो होतो. तेव्हा तेंडुलकर नावाची एक स्त्री माझ्याकडे आली होती. तिच्या डोळ्यांना खूप त्रास होत होता. औषधोपचार करूनही डोळे बरे होत नव्हते.

मी तिला म्हणालो, ''महालक्ष्मीची ओटी भर व ओटीमध्ये चांदीचे डोळे देवीला दे व वर्षातून एकदा ओटी भरत जा! विसरू नकोस !''

मी सांगितल्याप्रमाणे तिने केले व तिचे डोळे चांगले झाले. ती दर वर्षी आठवणीने देवीची ओटी भरत होती व

आठवणीने देवीला डोळेही देत होती.

अशा प्रकारे सुमारे पंधरा वर्षे गेली. पंधरा वर्षे तिचे डोळे सुव्यवस्थित राहिले. तिच्या डोळ्यांना कुठलाही त्रास झाला नाही. सोळाव्या वर्षी देवीला डोळे देण्यास ती विसरली. त्याच रात्री देवी तिच्या स्वप्नात आली व म्हणाली, ''तू मला डोळे दिले नाहीस, आता माझी जबाबदारी संपली. स्वामीजींच्या बंधनातून मी मोकळी झाले !''

दुसऱ्या दिवशी सकाळपासून तिच्या डोळ्यांना त्रास सुरू झाला व नंतर लेझर किरणांसहित अनेक उपचार करूनही तिचे डोळे बरे झाले नाहीत.

माणसाने माणुसकीने वागावे, परोपकार, दान-धर्म करावा, आध्यात्मात प्रगती करावी, सद्गुण वाढवावेत, असे देव-देवतांना वाटत असते. असे न करता माणसे स्वार्थासाठी देव-देवता, साधू-संत यांना प्रार्थना करतात. प्रार्थनेचे फळ म्हणून काही दिवस सुखाचे येतात. या सुखाच्या दिवसांमध्ये माणसाने सज्जनतेने वागायला हवे, परोपकार, दान-धर्म करायला हवा, असे केले असता ईश्वरी कृपा टिकून राहते.

# ११. उद्‌बोधक कथा

**आपली** जी मातृभाषा असेल, त्या मातृभाषेमध्ये वृक्ष, प्राणी, दगड, नदी यामध्ये राहणारे आत्मे बोलतात असा माझा स्वत:चा अनुभव आहे. साधना करताना असे अनुभव येतच असतात. यात विशेष असे काही नाही.

'**करावे तसे भरावे**' या ईश्वरी नियमाप्रमाणे जीवात्मा आपल्या कर्मानुसार विविध योनींमधून फिरत असतो. कधी त्याला दगडात रहावे लागते, तर कधी त्याला वृक्षात रहावे लागते. कधी वाघ, कोल्हा, कुत्रा, सर्प अशा योनीत जन्मही घ्यावे लागतात. अशाच काही कथा या अध्यायात आपण पाहू!

श्री स्वामी समर्थ हिमालयात एका गुहेमध्ये बसलेले होते. त्यांच्यासमोर काही भक्तगण बसले होते. एवढ्यात तेथे दोन वाघ आले. त्या वाघांकडे पाहून श्री स्वामी समर्थ म्हणाले,

''काहो पंडित? पूर्वजन्मी हत्तीवर बसून हिंडत होता. गावोगाव फिरून इतर पंडितांना अपमानित करीत होता! आता या व्याघ्र योनीत कसे काय वाटत आहे?''

श्री स्वामी समर्थांनी असे म्हणताच वाघ मनुष्यवाणीने बोलू लागले व त्यांनी आपल्याला मुक्ती द्यावी म्हणून प्रार्थना केली.

ज्यांनी श्रीगुरुचरित्र वाचले असेल, त्यांना या दोन पंडितांची हकिकत नक्कीच आठवेल.

श्री नृसिंहस्वामी सरस्वती जेव्हा गाणगापुरात रहात होते, तेव्हा म्हणजे सुमारे सातशे वर्षांपूर्वी घडलेली ही घटना आहे.

दोन पंडित होते. त्या पंडितांना चारही वेद पाठ होते. गावोगावी फिरून ते तेथील ब्राह्मणांशी वादविवाद करीत, ब्राह्मणांना हरवीत व त्यांच्याकडून जयपत्रे लिहून घेत. अशाप्रकारे शेकडो जयपत्रे त्यांनी गोळा केली होती. विद्वान

ब्राह्मण म्हणून मुस्लीम राजांच्या दरबारामध्ये त्यांना मान होता. अनेक राजांनी त्यांना हत्ती, घोडे, पालखी व नोकरवर्ग दिलेला होता, त्यामुळे ते अतिशय उन्मत्त झालेले होते.

एकदा त्या ब्राह्मणांना असे कळले की, कुमसी नावाच्या गावामध्ये त्रिविक्रम भारती नावाचे एक संन्यासी यती रहात असून, चारही वेद त्यांना पाठ आहेत.

आपल्यापेक्षा कोणीही मोठा विद्वान पंडित पृथ्वीवर असू नये, असे या दोन्ही ब्राह्मणांना वाटत असे आणि म्हणून त्रिविक्रम भारतींचे नाव कळताच ते त्रिविक्रम भारतींकडे, कुमसी गावामध्ये येऊन पोहोचले.

असे म्हणतात की, 'गीदड की जब मौत आती है तब वो शहर की ओर भागता है !' म्हणजे अरण्यात राहणाऱ्या कोल्ह्याचा जेव्हा मृत्यू जवळ येतो तेव्हा शहराकडे जाण्याची दुर्बुद्धी त्याला होते.

त्रिविक्रम भारतींकडे येऊन त्यांनी ''आमच्याबरोबर वाद करा किंवा आम्हाला जयपत्र लिहून द्या!'' असा हट्ट धरला.

त्रिविक्रम भारतींनी त्यांना खूप समजावून सांगण्याचा प्रयत्न केला; परंतु ते ऐकेनात. शेवटी त्रिविक्रम भारती त्या

दोन्ही पंडितांना घेऊन आपले श्रीगुरु श्री नृसिंहस्वामी सरस्वती यांच्याकडे गाणगापुरी आले.

कुमसी ते गाणगापूर हा प्रवास दोन्ही पंडितांनी पालखीत बसून केला, तर त्रिविक्रम भारतींनी हाच प्रवास चालत केला.

संन्याशाला चालायला लावल्याने त्या दोन्ही पंडितांना खूप मोठे पाप लागले. याशिवाय अनेक विद्वान पंडितांना अपमानित केल्याने त्यांना अगोदरच खूप पाप लागले होते.

गाणगापूरला पोहोचल्यानंतर श्री नृसिंहस्वामी सरस्वतींनी त्यांची समजूत घालण्याचा खूप प्रयत्न केला; परंतु वाद करा किंवा जयपत्र लिहून द्या, असा हेका दोन्ही पंडितांनी धरला.

पंडित ऐकत नाहीत हे पाहून श्री नृसिंहस्वामी सरस्वतींनी तेथे जवळ उभ्या असलेल्या एका अंत्यज माणसाद्वारे त्या पंडितांचा गर्व भंग केला.

हे पंडित मृत्यूनंतर पिशाच्च योनीत गेले व तद्नंतर त्यांना व्याघ्रयोनीत जन्म मिळाला.

अक्कलकोटचे श्री स्वामी समर्थ हरिद्वारमध्ये एका भक्ताच्या घरी गेले होते. अचानक तेथे एक सर्प आला.

घरातील सर्व माणसे काठ्या घेऊन सर्पाला मारायला धावली तेव्हा अक्कलकोट स्वामींनी ''सर्पाला मारू नका'' असे सांगितले. नंतर ते आपल्या भक्ताला म्हणाले...

''हा सर्प तुझा बाप आहे. तुझ्या वडिलांना मृत्यूनंतर सर्प योनी प्राप्त झाली आहे व सध्या ते सर्पयोनीत आहेत. तू जर या सर्पाला मारले असते तर तुला पाप लागले असते.''

अक्कलकोट संस्थानातील हत्ती एकदा खूप पिसाळला. राजाने त्याला गोळ्या घालण्याचा हुकूम दिला. ही गोष्ट श्री अक्कलकोट स्वामींना कळताच त्यांनी हत्तीला मारू नका असे सांगितले व स्वत: त्या हत्तीच्या समोर गेले व त्याला म्हणाले, ''काय रे ? माजलास काय ? पूर्वजन्म विसरलास काय ?''

श्री स्वामी समर्थ (अक्कलकोट) यांचे हे उद्‌गार ऐकताच पिसाळलेला हत्ती एकदम शांत झाला, त्याच्या डोळ्यांतून घळघळा अश्रुधारा वाहू लागल्या व स्वामींसमोर तो नतमस्तक झाला.

वरील उदाहरणांवरून मनुष्यजन्माचा दुरुपयोग केला असता, प्राणी, पशू, पक्षी इत्यादी योनीत जन्म मिळतो व यातना भोगाव्या लागतात हे सिद्ध होते.

मनुष्य जन्म ही ईश्वराने आत्म्याला दिलेली एक सुवर्णसंधी असते. या सुवर्णसंधीचा मानवाने सदुपयोग

करायला हवा.

पुष्कळ माणसांना झाडातून बाहेर येऊन काही आत्म्यांनी दर्शने दिलेली आहेत. पिंपळाच्या झाडावर हमखास ब्रह्मसमंध असतात असे म्हटले जाते. आंब्याच्या झाडामध्ये सुद्धा यक्षिणी जातीचे स्त्री आत्मे निवास करतात.

पूर्वीच्या काळी झाड अथवा झाडाची फांदी तोडायची असेल, तर लाकूडतोड्या प्रथम झाडाला नमस्कार करत असे, त्यातील आत्म्याला बाजूला जायला सांगत असे व नंतर झाड अथवा झाडाची फांदी तोडत असे. अशा बऱ्याच चांगल्या चालीरीती काळाच्या ओघात लुप्त झाल्या आहेत.

कोलकाता येथील बोटॅनिकल गार्डनमध्ये एक विशाल वटवृक्ष असून, या वटवृक्षामध्ये एका साधूचा आत्मा निवास करत आहे. हा वटवृक्ष सुमारे एक हजार वर्षांचा असून, सुमारे हजार वर्षे हा साधूचा आत्मा त्या वृक्षात अडकून पडलेला आहे.

अमृतकुंड (कर्नाटक सोलापूर हैदराबाद रोडवर उमरग्याच्या पुढे पंचवीस कि. मी. अंतरावर) येथे दोन विशाल वटवृक्ष असून, या वटवृक्षांमध्ये अनेक आत्म्यांचा निवास आहे; तसेच या परिसरात सुद्धा अनेक पिशाच्च आत्मे

वास करून आहेत. ही सर्व पिशाच्च सृष्टी गुप्त रूपाने तप:श्चर्या करणाऱ्या एका ऋषीने ठेवलेली आहे. अशा प्रकारे मनुष्य–जन्माचा दुरुपयोग करणाऱ्या माणसास वृक्षरूपानेही जन्म घ्यावे लागतात.

रजस्वला स्त्री जर वड अथवा पिंपळ या वृक्षांच्या जवळपास गेली, तर तिला हमखास पिशाच्चबाधा होते. म्हणून रजस्वला स्त्रीने वड व पिंपळ अशा झाडांच्या आसपास पाळी चालू असेपर्यंत जाऊ नये; तसेच कब्रस्तानातही जाऊ नये.

# १२. भाग्यवंत ते नर

**काही** लोक जन्माला येतानांच इतके भाग्यवान असतात, की त्यांच्या भाग्याचे वर्णन करण्यास शब्दही अपुरे पडतात. अशा काही भाग्यवंत योग्यांच्या जीवनाकडे एक छोटासा दृष्टिक्षेप.

श्यामाचरण लाहिरी हे रेल्वेमध्ये नोकरीला होते. हिमालयातील राणीखेत येथे त्यांची बदली झाली. एका संध्याकाळी हिमालयातील निसर्गाचा आनंद लुटत फिरत असताना त्यांना श्री महाअवतार बाबाजी या अमर सिद्ध योग्याचे दर्शन झाले व रेल्वे खात्यात नोकरी करणारे श्यामाचरण लाहिरी हे महायोगी लाहिरी महाशय झाले.

राम ठाकूर वयाच्या बाराव्या वर्षी हिमालयात फिरत असताना त्यांना अनंगदेव या महायोग्याचे दर्शन झाले. त्यांचे दर्शन होताच राम ठाकूर यांना सिद्धावस्था प्राप्त झाली. आपल्या गुरुबरोबर ते अदृश्यरूपाने आकाशात भ्रमण करू लागले. नंतर एका जागी चाळीस वर्षे समाधी लावून बसले.

अक्कलकोट निवासी श्रीस्वामी समर्थांनी वीस वर्षांत सुमारे तीनशेहून अधिक सिद्धपुरुष निर्माण केले. ते साक्षात् भगवान् दत्तात्रेय होते. साईबाबा, गजानन महाराज, श्रीकृष्ण सरस्वती, देव मामलेदार, काळबुवा, रामानंद बीडकर, दत्तगिरी, स्वामीसूत, स्वामीकुमार, नरसिंहस्वामी सरस्वती, ताजुद्दीनबाबा अशा कितीतरी लोकांना त्यांनी सिद्धपुरुष बनविले व त्यांच्याद्वारे लाखो लोकांना मुक्ती प्राप्त करून दिली.

श्री महाअवतार बाबाजी, श्री अनंगदेव, श्री स्वामी समर्थ अशा परमसिद्ध योग्यांचे दर्शन ज्यांना झाले ते नर खरोखरच भाग्यवान म्हटले पाहिजेत, म्हणून या प्रकरणाला 'भाग्यवंत ते नर' असे नाव दिले आहे.

### गाय जिवंत झाली

भारतातील अनेक पर्वतांमध्ये प्राचीन काळापासून अनेक ऋषी तप:श्चर्या करत बसलेले आहेत. अतिशय

भाग्यवान लोकांना कधीतरी केव्हातरी महद्भाग्याने अशा ऋषींची, योग्यांची दर्शने होतात. माझ्या प्रवासी जीवनात काही कथा ऐकायला मिळाल्या. त्यांतील थोड्या कथा येथे नमूद करीत आहे.

श्रीशैल पर्वतातील घनदाट जंगलामध्ये एक भिल्ल आपली गुरे चारत होता. त्याची एक गाय पाय घसरून दरीत कोसळली व गतप्राण झाली. ती संध्याकाळची वेळ होती. भिल्लाने विचार केला...

'आता आपण आपल्या भिल्ल वस्तीत जाऊ. तोपर्यंत अंधार पडेल. उद्या सकाळी दहा-वीस भिल्लांना घेऊन येऊ व एखादा खड्डा खणून गाईला पुरून टाकू !'

दुसऱ्या दिवशी सकाळी दहा लोकांना बरोबर घेऊन तो भिल्ल जेथे गाय उंचावरून पडून मरण पावली होती त्या दरीत गेला. त्याच्या आश्चर्याला पारावार उरला नाही. 'गाय तेथे आरामात चरत होती.'

हा चमत्कार कसा घडला हे त्या भिल्लाला कळले नाही; कारण आदल्या दिवशी संध्याकाळी गाय तडफडून मेलेली त्याने पाहिली होती. त्याने आजूबाजूला थोडे शोधून पाहिले तर त्याला तेथे एक गुहा दिसली. त्या गुहेत एक ऋषी समाधिस्थ बसलेले होते. त्यांनीच गाईला जिवंत केले हे

भिल्लाने ओळखले. त्याने दूरूनच ऋषींना नमस्कार केला व तो आपल्या मुक्कामी परतला.

**योगी वेमन्ना**

अरण्याच्या जवळपास राहणाऱ्या एका ग्रामस्थाकडे अनेक गाई होत्या. एका दुभत्या गाईने अचानक दूध देणे बंद केले. या गाईचे दूध कोणीतरी काढून नेत असावे, असे वाटून गाईच्या मालकाने पाळत ठेवण्याचे ठरविले.

एक दिवस तो आपल्या गुराखी नोकराला घरी ठेवून स्वत: गाई राखण्यास जंगलात गेला व त्या विशिष्ट गाईवर त्याने पाळत ठेवली.

कळपातील सर्व गाई चरत होत्या. थोड्या वेळाने ती विशिष्ट गाय कळप सोडून अरण्यात जाऊ लागली. गाईचा मालकही विशिष्ट अंतर ठेवून तिच्या मागोमाग जाऊ लागला. थोड्या वेळाने गाय एका गुहेत शिरली.

गाय गुहेत गेलेली पाहून मालकाला अतिशय आनंद झाला. तो मनात म्हणाला,

''मी खूपच भाग्यवान आहे. नक्कीच या गुहेत कोणीतरी ऋषी किंवा योगी आहे व तो माझ्या गाईचे दूध पीत आहे.''

''ही गाय नक्कीच पूर्वजन्मीची कोणीतरी देवता असली

पाहिजे व शापामुळे गाय झाली असली पाहिजे आणि म्हणूनच हे योगी गाईला आपल्याकडे खेचून घेत असावेत व तिचे दूध पीत असावेत.''

अशा प्रकारे मनात विचार करीत गाईचा मालक गुहेपासून दूर अंतरावर उभे राहून पुढे काय घडते हे पहात होता.

थोड्या वेळाने गाय बाहेर आली व कळपाच्या दिशेने निघून गेली. आपण गाईला दिसणार नाही याची दक्षता गाईच्या मालकाने पहिल्यापासूनच घेतली होती.

गाय बरीच दूर गेल्यानंतर उभयहस्त जोडून योगिराजांची मनातल्या मनात प्रार्थना करत गाईच्या मालकाने गुहेत प्रवेश केला.

गुहेमध्ये एका शिलेवर एक योगिराज बसलेले होते. त्यांनी गाईच्या मालकाला आशीर्वाद दिला व म्हणाले, ''मी येथे तपस्या करीत आहे हे तू कोणालाही सांगू नकोस !''

गाईचा मालक म्हणाला,

''आपण येथे आहात हे मी कोणालाही सांगणार नाही; परंतु माझी एक प्रार्थना आहे. उद्यापासून आपणासाठी मी दूध घेऊन येईन. चालेल का ? मी भल्या पहाटे दूध घेऊन येईन

म्हणजे कोणीही बघण्याचा प्रश्नच येणार नाही.''

योगिराज म्हणाले, ''ठीक आहे!''

गाईचा मालक जातीने सोनार होता.

दुसऱ्या दिवसापासून गाईच्या मालकाने - म्हणजे सोनाराने योगिराजांची सेवा निष्ठेने सुरू केली. पहाटे चारला उठून, एक किटलीभर दूध घेऊन तो योगिराजांकडे जायचा व योगिराजांना दूध द्यायचा. अशा प्रकारे त्याची सेवा सुरू झाली.

काही वर्षे अशाप्रकारे सोनाराने योगिराजांची सेवा केली.

सोनाराच्या घराच्या शेजारी एक वेमन्ना नावाचा तरुण युवक रहात होता.

एक दिवस वेमन्ना पहाटे उठला आणि बहिर्दिशेस जाण्यास निघाला. त्याने पाहिले की, सोनार हातामध्ये दुधाची किटली घेऊन कोठेतरी जात आहे.

त्याने सोनाराला विचारले, ''इतक्या पहाटे दूध घेऊन कोठे चाललास ?''

अचानक विचारलेल्या या प्रश्नामुळे सोनार गडबडला; परंतु त्याने खरे काही सांगितले नाही.

सोनार खोटे बोलत आहे, हे वेमन्नाने ओळखले. तो काहीच बोलला नाही.

दुसऱ्या दिवशी वेमन्ना पहाटे उठला व त्याने सोनारावर पाळत ठेवली. सोनार दुधाची किटली घेऊन आपल्या घरातून बाहेर पडला व अरण्याच्या दिशेने चालू लागला.

त्याला कळणार नाही अशा पद्धतिने भरपूर अंतर ठेवून वेमन्ना त्याच्या मागून जाऊ लागला. सुमारे तासभर चालल्यानंतर सोनाराला एका गुहेत जाताना त्याने पाहिले. वेमन्नाने विचार केला, ''गुहेत नक्की कोणीतरी योगी आहे व हा सोनार त्याला दूध नेऊन देत असावा.'' मनात असा विचार करत वेमन्नाने गुहेत प्रवेश केला.

सोनार व योगिराज यांचे संभाषण त्याच्या कानावर पडू लागले. तो तेथेच थबकला व काळजीपूर्वक संभाषण ऐकू लागला.

योगीराज म्हणाले, ''मी उद्या सकाळी हा देह सोडून जाणार आहे, तेव्हा उद्या तू शेवटचे दूध घेऊन ये ! तद्नंतर येथे येण्याची आवश्यकता नाही. तुझ्या हातचे दूध प्यायल्यानंतर मी देहत्याग करीन ! तुला सेवेचे फळ मी उद्या देईन !''

''तुला जीवनमुक्त सिद्धपुरुष करीन !''

वरील संभाषण ऐकल्यानंतर वेमन्ना हळूच मागच्या पावली गुहेच्या बाहेर आला व आपल्या घरी निघून गेला.

वेमन्नाने या सर्व गोष्टी इतक्या शिताफीने केल्या की, सोनाराला यातले काहीही कळले नाही.

घरी आल्यानंतर वेमन्नाने बराच वेळ विचार करण्यात घालविला. कसेही करून उद्या पहाटे दूध घेऊन आपण जायचे व सोनाराला जाऊ द्यायचे नाही, असे त्याने ठरविलेले होते; परंतु ही गोष्ट साध्य कशी करायची हेच त्याला समजत नव्हते. अशा प्रकारे विचार करण्यात अर्धा दिवस गेला.

आपला दीर सकाळपासून अतिशय चिंतेत आहे, कसल्या तरी विचारात गढलेला आहे, हे पाहून वेमन्नाच्या वहिनीने काय झाले म्हणून वेमन्नाला खोदून विचारले. शेवटी वेमन्नाने सर्व हकिकत तिला सांगितली.

यावर वेमन्नाची वहिनी म्हणाली...

''मी माझ्या जवळ असणारे सर्व दागिने त्या सोनाराला नेऊन देते व सांगते उद्या सकाळपर्यंत मला याचे नवीन दागिने करून हवे आहेत. तो रात्रभर जागला तरीही नवीन दागिने बनविणे त्याला शक्य होणार नाही. या अवधीमध्ये तू तुझा

कार्यभाग साधून घे!''

वेमन्नाला ही युक्ती एकदम पटली.

ठरल्याप्रमाणे वेमन्नाच्या वहिनीने सोनाराला कामाला लावले. सोनाराने विचार केला. रात्रभर जागून आपण दागिने बनवू व पहाटे योगिराजांकडे जाऊ! सोनार रात्रभर दागिने घडवीत राहिला. पहाटेच्या वेळी त्याला झोप लागली. बसल्या जागीच तो झोपी गेला.

इकडे वेमन्ना पहाटे चार वाजता दुधाची किटली घेऊन गुहेत गेला. त्याला पाहून योगिराज म्हणाले,

''त्या सोनाराने अनेक वर्षे सेवा केली, त्याचे फळ मी आज त्याला देणार होतो; पण तू त्याला कामाला लावलेस व दूध घेऊन आलास. त्याच्या सेवेचे फळ मी तुला देत आहे. तू जीवनमुक्त सिद्धयोगी होशील; परंतु जीवनमुक्त सिद्धयोगी झाल्यानंतर तू जेव्हा काव्यरचना करशील त्या काव्यामध्ये तू त्या सोनाराच्या नावाचा उल्लेख कृतज्ञतेने जरूर कर!''

वेमन्नाने साष्टांग नमस्कार घातला व योगिराजांनी सांगितलेली अट मान्य केली.

तात्काळ योगिराजांनी त्याच्याकडे एक दृष्टिक्षेप टाकला. वेमन्ना जीवनमुक्त सिद्धपुरुष झाला. आपल्या गुरुच्या

आदेशानुसार पुढे त्याने जे काव्य केले, त्या प्रत्येक काव्यात त्याने त्या सोनाराच्या नावाचा उल्लेख केला.

या सोनाराचे नाव **विश्वधाभिराम** असे होते.

योगी वेमन्ना आपल्या प्रत्येक काव्याच्या शेवटी म्हणतात, 'विश्वधाभिराम विनरवेमा' याचा अर्थ हे 'हे विश्वधाभिराम सांगत आहे, वेमन्ना तू ऐक!'

अशा प्रकारे वेमन्ना योग्याने विश्वधाभिराम या सोनाराला आपल्या काव्याद्वारे अमर केले.

### गुहेतील गूढ

बनगानपल्लीच्या आसपास बऱ्याच गुहा आहेत. दोन गुराखी रानात गुरे चारीत होते. त्यांना एक गुहा दिसली. ते गुहेत गेले. गुहेत काहीही आढळले नाही; परंतु एका बाजूला जेमतेम डोके जाईल एवढे भोक होते. एका गुराख्याने त्या भोकातून डोके घातले व आत पाहिले. आत अत्यंत सुंदर देवता नृत्य करीत होत्या. विपुल प्रकाश होता. त्या देवतांच्या अंगावर विविध प्रकारचे दागदागिने होते व त्या एवढ्या तेजस्वी होत्या की, जणू त्यांच्या अंगातून प्रकाश बाहेर पडत होता.

हे सारे दृश्य गुराखी विस्मयाने पहात होता. इतक्यात

एका देवतेचे लक्ष त्याच्याकडे गेले.

देवता त्याला म्हणाली,

''तुझ्या भाग्याने हे तुला पाहण्यास मिळाले आहे. कोणाला बोलू नकोस! बोलशील तर मुका होशील! जा, येथून ताबडतोब निघून जा!''

त्या गुराख्याने आपले डोके बाहेर काढले. दुसऱ्या गुराख्याला घेऊन तो गुहेच्या बाहेर आला.

त्या दुसऱ्या गुराख्याने सर्व भिल्लांना सांगितले, ''याने काहीतरी पाहिले आहे व ज्या अर्थी हा कोणाला सांगत नाही, त्या अर्थी नक्की तेथे विपुल धन असले पाहिजे. मी बरोबर असून सुद्धा याने मला डोकावू दिले नाही!'' धनाच्या लोभाने सर्व गावकऱ्यांनी त्या गुराख्यावर दबाब आणला व शेवटी दम भरला, ''जर तू काय पाहिले हे सांगितले नाहीस तर आम्ही ती गुहा खोदून काढू.''

शेवटी आपण जे दृश्य पाहिले ते गुराख्याने सर्व गावकऱ्यांना सांगितले.

त्याचे बोलणे पूर्ण होताच त्याला अस्वस्थ वाटू लागले व तो बेशुद्ध झाला. गावकऱ्यांनी उपचार करून त्याला शुद्धीवर आणला; परंतु त्याची वाचा कायमची गेली.

अशा प्रकारे भारतातील पर्वतांमधून अनेक प्रकारची रहस्ये दडलेली आहेत. काही भाग्यवान लोकांनाच अशा रहस्यांचा शोध लागतो. भारतातील विविध पर्वतांमध्ये आजही शेकडो ऋषी तप:श्चर्या करत बसलेले आहेत. भाग्यवंतांना त्यांचे दर्शन होत असते.

माझ्या प्रवासी जीवनामध्ये मला अनेक दंतकथा, लोककथा ऐकायला मिळाल्या. या दंतकथा, लोककथा खऱ्या की खोट्या हे समजण्यास मार्ग नाही. अशा अनेक दंतकथांपैकी एक-दोन दंतकथा येथे सांगून हा अध्याय संपवितो.

**कायाकल्प**

एक साठ वर्षांचा वृद्ध मनुष्य जंगलामध्ये लाकूडफाटा गोळा करण्यासाठी गेला होता. त्याने पाहिले की...

एका वानराची शेपटी पिंजलेल्या झाडाच्या फांदीत अडकली असून, तो त्यामुळे विव्हळत आहे.

म्हाताऱ्याला त्याची दया आली. त्याने वानराची शेपटी सोडविली. आनंदाने उड्या मारत वानर जंगलात निघून गेला.

'बिचारा वानर किती दिवसांपासून उपाशी राहिला होता कोण जाणे ?' तो वृद्ध गृहस्थ मनात विचार करू लागला.

तो मनात असा विचार करत आहे, इतक्यात त्याने पाहिले की, तो वानर त्याच्या जवळ आला व त्याला काहीतरी खुणावू लागला.

हा वानर आपल्याला काहीतरी दाखवू इच्छित आहे, असे वाटून तो वृद्ध मनुष्य त्या वानराच्या पाठोपाठ गेला.

जंगलात थोडे दूर गेल्यानंतर तो वानर एका झाडाजवळ थांबला. वानर त्या वृद्ध गृहस्थाकडे एक दृष्टिक्षेप टाकून झाडावर चढला, एक फळ घेऊन खाली आला. ते फळ त्याने त्या वृद्ध गृहस्थास दिले.

ते रसरशीत पिकलेले फळ वृद्ध गृहस्थाने ताबडतोब खाल्ले व मनातल्या मनात वानराच्या कृतज्ञता बुद्धीचे तो कौतुक करू लागला.

काही क्षणांतच त्याला आपल्यामध्ये प्रचंड परिवर्तन होत आहे असे जाणवले व थोड्याच वेळात त्याचे रूपांतर एका १६/१७ वर्षांच्या तरुणात झाले.

आपल्यामध्ये झालेला हा बदल पाहून त्या गृहस्थाला अतिशय आश्चर्य वाटले. वृद्धाला तरुण करणारा संजीवनी वृक्ष आपल्याला मिळाला म्हणून त्याला अतिशय आनंद झाला. ते झाड परत आपल्याला शोधून काढता यावे म्हणून त्याने त्या झाडाच्या आजूबाजूला काही खुणा ठेवून दिल्या व

गावाकडे परतला.

गावात येऊन त्याने सर्व हकिकत गावातील लोकांना सांगितली. गावातील लोकांना खूप आश्चर्य वाटले.

दुसऱ्या दिवशी १०-१२ जणांना घेऊन तो परत जंगलात गेला. बाकी सर्व गोष्टी जागच्या जागी होत्या; परंतु तो वृक्ष अदृश्य झालेला होता.

**नागासहित अदृश्य**

एक नऊ वर्षांची मुलगी दररोज गुरे घेऊन रानात जात असे. जेथे ती जात असे तो गवताळ भाग होता. सर्वत्र गवत होते. त्या कुरणामध्ये एका बाजूला काही लहान-मोठी झुडपे होती.

एक दिवस नेहमीप्रमाणे ती गुरे चारावयास गेली असता त्या गर्द झुडपांच्या राईतून 'मी येऊ का?' असा आवाज बऱ्याच वेळा ऐकू आला.

बराच वेळ असा आवाज ऐकल्यानंतर मुलीला थोडी भीती वाटली व गुरे घेऊन ती घरी आली व घरातील सर्वांना रानात घडलेली हकिकत सांगितली.

नऊ वर्षांच्या मुलीची छेडछाड करणारा हा कोणीतरी उनाड मुलगा असावा व तो लपून मुलीला घाबरवत असावा

असे घरच्यांना वाटले. त्यांनी मुलीची समजूत काढली व दुसऱ्या दिवशी परत रानात पाठवून दिले.

दुसऱ्या दिवशीही तोच प्रकार घडला.

मुलीने घरी येऊन घडलेला प्रकार सांगितला. आता मात्र घरचे लोक चिडले. त्यांनी या प्रकाराचा छडा लावण्याचे ठरविले.

गावातील लोकांची एक बैठक घेण्यात आली व सर्व प्रकार गावकऱ्यांना सांगण्यात आला.

ग्रामस्थांना या विचित्र प्रकाराचे आश्चर्य वाटले व सर्वांनी मिळून 'मी येऊ का ?' या प्रकरणाचा छडा लावण्याचे ठरविले.

ठरल्याप्रमाणे प्रथम मुलीला गुरे घेऊन पुढे पाठविण्यात आले व तिच्या मागून काही वेळानंतर तीस-चाळीस ग्रामस्थ निघाले.

मुलीला सांगण्यात आले होते, ''नेहमीप्रमाणे आज तू गुरे घेऊन रानात जा ! आम्ही तुझ्या मागून थोड्या वेळाने येऊ!''

'मी येऊ का ?' असे उद्‌गार त्या गर्द राईतून आले तरी तू घाबरू नकोस व तेथेच उभी रहा ! तुझ्या मागोमाग

थोड्या वेळाने आम्ही येऊन दुरून त्या संपूर्ण राईला एक वेटोळे करू! वेटोळ्याच्या मध्ये तू व ती राई असेल!

''इतक्या माणसांना पाहून 'मी येऊ का ?' विचारणारा पळूनच जाईल; परंतु त्यातूनही त्याने तुला 'मी येऊ का ?' असे जर विचारले तर तू खुशाल 'ये' असे म्हण! पाहूया काय होते!''

''तू मुळीच घाबरू नकोस. आम्ही सर्वजण तुझ्या पाठीशी आहोत.''

ती नऊ वर्षांची मुलगी गुरांना घेऊन रानात गेली व त्या राईच्या आसपास उभी राहिली. गुरे शांतपणे चरत होती.

आपल्या मागून चाळीस-पन्नास माणसे येत आहेत म्हणून आज तिला मुळीच भीती वाटत नव्हती.

बराच वेळ झाला तरी काहीच आवाज ऐकू येईना. जणू काही 'मी येऊ का?' विचारणाऱ्याला सर्व प्लॅन समजून चुकला होता.

अशीच दहा-पंधरा मिनिटे गेली. हातात लाठ्या-काठ्या घेतलेले चाळीस-पन्नास ग्रामस्थ तेथे येऊन पोहोचले व त्यांनी सर्व राईला घेरले.

मुलीने त्यांना सांगितले की आज 'मी येऊ का ?'

असा आवाज ऐकू आला नाही. त्यावर ग्रामस्थ म्हणाले, ''आम्हा सर्वांना बघून तो राईतच कोठेतरी लपून बसला असेल किंवा पळून गेला असेल, तरी पण आता आलोच आहोत तर सर्व राईला वेढा घालून थांबू!'' असे ठरवून सर्व ग्रामस्थांनी राईला वेढा घातला.

काही क्षण असेच शांततेत गेले आणि नंतर....

'मी येऊ का?'

असा दीर्घ गंभीर ध्वनि ऐकू आला.

सर्व ग्रामस्थ चकित झाले. आवाज मुलाचा नव्हता.

त्या मुलीला काय करावे हे सुचेना. तिने काहीच उत्तर दिले नाही.

ग्रामस्थांनी 'हो म्हण' असे तिला सांगितले.

पुन्हा काही क्षण शांततेत गेले.

थोड्या वेळाने पुन्हा आवाज ऐकू आला.

'मी येऊ का ?'

''हो! ये!'' मुलीने उत्तर दिले.

आता काय होणार याची उत्सुकता सर्व ग्रामस्थांना लागलेली होती.

ग्रामस्थांनी आपला वेढा आवळण्यास सुरुवात केली.

आता सर्वजण त्या मुलीपासून फक्त २०-२५ फूट अंतरावर होते. त्यातील काही तर खूपच जवळ होते.

इतक्यात सर्वांनी पाहिले, करंगळीएवढ्या जाडीचा व जेमतेम सहा-सात इंच लांबीचा एक साप त्या गर्द झाडीतून बाहेर आला व तो मुलीच्या अंगावर चढला. कमरेपर्यंत चढल्यानंतर त्या इवल्याशा सापाने महाभयंकर अशा पाच फडाच्या नागाचे रूप धारण केले व मुलीच्या डोक्यावर फणा धरला.

सर्व ग्रामस्थ हा विस्मयजनक प्रकार मंत्रमुग्ध होऊन पहात होते आणि दुसऱ्याच क्षणी...

'तो नागराज मुलीसहित अदृश्य झाला !'

आश्चर्यचकित होऊन सर्व ग्रामस्थ हा अद्‌भुत प्रकार पहात राहिले. हा सर्व प्रकार घडेपर्यंत ग्रामस्थ संमोहित झालेले होते. ही घटना सुमारे वीस वर्षांपूर्वी घडली.

# १३. सृष्टिरहस्य

**ध्यानामध्ये** मला ज्या काही गोष्टींचे ज्ञान झाले ते आतापर्यंत पुस्तकांद्वारे मी प्रसिद्ध केले आहे. या ज्ञानाचा अनेकांना फायदा झालेला आहे. केवळ माझी पुस्तके वाचून विविध प्रकारचे आध्यात्मिक अनुभव आल्याचे अनेक सद्‌भक्तांनी पत्रे पाठवून कळविले आहे. काही लोकांच्या आधी-व्याधी निवारण झाल्या, असे लोकांनी प्रकाशकास प्रत्यक्ष भेटून सांगितले.

ज्योतिषशास्त्र हा माझा विषय नव्हे. मला ज्योतिषशास्त्रातील काही कळत नाही. ध्यानामध्ये ज्या काही गोष्टी कळल्या त्या मी पुढे देत आहे. त्या बरोबर आहेत की

चूक आहेत हे ज्योतिषी, खगोलशास्त्रज्ञ व पंचांगकर्ते यांनी ठरवावे.

दर १८० वर्षांनी पृथ्वीतलावर काही विशेष बदल होतात. मानवी जीवनमान पूर्वी होते त्यापेक्षा बदलते व नवीन होते.

२६ मार्च २००१ पासून १८० वर्षांचे एक परिवर्तनीय लघुयुग सुरू होत असून, या १८० वर्षांत अनेक नवीन शोध लागतील. विवाह संस्थेचे अस्तित्व जवळजवळ ५० टक्के नष्ट होईल. ऐहिकदृष्ट्या मानव सुखी होईल. गुन्हेगारी व भ्रष्टाचार नष्ट होईल. परलोकातील आत्म्यांशी विज्ञानाद्वारे म्हणजे कॉम्प्युटर किंवा टी. व्ही. स्क्रीनप्रमाणे असणाऱ्या एखाद्या यंत्राद्वारे संपर्क साधला जाईल. त्यांचे सुख- दुःख जाणून घेता येईल.

एकविसाव्या व बाविसाव्या शतकातील स्त्रिया पुरुषांवर अवलंबून राहणार नाहीत. त्या पूर्णपणे स्वावलंबी होतील.

अनेक देशांच्या सीमारेषा पुसल्या जातील. भारताच्या आसपासचे सर्व देश भारतात विलीन होतील.

२१०० ते २१३० या काळात पृथ्वीवर अनेक ठिकाणी समुद्र आक्रमण करेल. पृथ्वीवर उल्कापात होईल.

मानवातील दुर्गुण कमी होतील. मानवता वाढेल. ध्यानयोगाचा प्रसार विश्वभर होईल. अमावास्येच्या रात्री चंद्रासारखा शीतल प्रकाश पृथ्वीवर पडेल.

**'करावे तसे भरावे'** हा ईश्वरी न्याय अबाधितपणे कार्य करत असतो.

गेली हजारो वर्षे पुरुषांनी स्त्रियांना गुलामाप्रमाणे वागविले, त्याचे दुष्परिणाम दिसू लागले आहेत. पुढील १८० वर्षांत स्त्रीसत्ताक पद्धती सुरू होईल. भारतामध्ये दत्तभक्त व देवीभक्त यांच्यात वाढ होईल. सत्पुरुषांच्या समाधिस्थानांमध्ये भाविकांची गर्दी वाढेल.

अनेक नवीन शोध लागतील. ताशी पाचशे किलोमीटर वेगाने धावणारी वाहने (Cars) निर्माण होतील. विमाने ताशी पाच हजार मैल वेगाने उडतील.

सर्वसाधारणपणे सन २००१ पासून पुढील १८० वर्षे ही अशी असतील.

दर १८० वर्षांनी मानवी जीवनमान बदलते, असे वर म्हटले आहे. याला आपण लघू परिवर्तनीय युग असे नाव देऊ या !

असे चार टप्पे गेल्यावर म्हणजे १८० x ४ = ७२०

वर्षांनी परिवर्तनाचा एक मोठा टप्पा येतो.

दर ७२० वर्षांनी परिवर्तनाचा पहिला मोठा टप्पा येतो. खूप मोठे परिवर्तन होते. या परिवर्तनात बरेच बदल होतात. अशी तीन परिवर्तने झाल्यानंतर म्हणजे ७२० x ३ = २१६० वर्षांनी एक लघुप्रलय होतो.

या लघुप्रलयामध्ये जे जुने आहे ते काही प्रमाणात नष्ट होते व नवीन गोष्टींचे सर्जन होते.

अशी बारा परिवर्तने पूर्ण झाल्यानंतर म्हणजे २१६० x १२ = २५,९२० वर्षांनी प्रलय होतो. जे जुने आहे ते जवळजवळ ७० टक्के नष्ट होते. अनेक भूभाग समुद्रात गडप होतात, समुद्रातील भूभाग वर येतात. पृथ्वीचा आस ढळतो. दक्षिण ध्रुव, उत्तर ध्रुव यांची स्थाने बदलतात. भूकंपाने पृथ्वीवरील पर्वत उद्ध्वस्त होतात. नवीन प्रजा निर्माण होते. नवीन धर्म उदयाला येतात.

अशी बारा आवर्तने पूर्ण झाल्यानंतर म्हणजे २५,९२० x १२ = ३,११,०४० (तीन लक्ष, अकरा हजार, चाळीस) वर्षांनी महाप्रलय होतो. जुने सर्व लयाला जाते. संपूर्ण पृथ्वीवर हिमयुग अवतरते. काहीही शिल्लक रहात नाही. अशा वेळी उत्तर ध्रुव, हिमालय, सह्याद्री, निलगिरी अशा पर्वतीय

प्रांतांतून गुप्त रूपाने वास करणारे योगी आपली गुप्त स्थाने सोडून बाहेर येतात व सृष्टी सृजनाचा आरंभ करतात. पुनश्च प्रजा निर्माण केली जाते.

३,११,०४० (तीन लक्ष, अकरा हजार, चाळीस) वर्षांनी येणारा टप्पा अथवा परिवर्तन अथवा महाप्रलय सन ३३०३ (तीन हजार-तीनशे तीन) या वर्षी सुरू होत असून, त्या वर्षांपासून संपूर्ण पृथ्वीतलावर हिमयुग सुरू होईल. पृथ्वी सामान्य मानवास राहण्यास योग्य असणार नाही. फक्त योगीच पृथ्वीतलावर वास करून राहू शकतील. सुमारे १०८ वर्षे असे वातावरण राहील व पुनश्च जगत्संसार सुरू होईल.

अशी बारा आवर्तने पूर्ण झाल्यानंतर म्हणजे ३,११,०४० x १२ = ३७,३२,४८० (तीन लक्ष, अकरा हजार, चाळीस x बारा = सदतीस लक्ष, बत्तीस हजार, चारशे ऐंशी) वर्षांनी ग्रहप्रलय होतो. पृथ्वीचे आकाशातील स्थान बदलते. दिवसाचे तास बदलतात. महिन्याचे दिवस बदलतात. ग्रहगती बदलते. आकाशात ग्रहतारांच्या टकरा होतात. सृष्टीतील रजोगुणांचे अस्तित्व पूर्णपणे नष्ट होते. वातावरणातील आत्मेही नष्ट होतात. सूक्ष्म सृष्टीचे अस्तित्व नष्ट होते. म्हणजे पृथ्वीला चिकटून असणारे; तसेच पाताळलोकात राहणाऱ्या आत्म्यांची सृष्टी नष्ट होते.

सप्तपाताळाचे अस्तित्व रहात नाही. अतल, वितल, सुतल, तलातल, महातल, रसातल, पाताळ या सूक्ष्म सृष्टींचे अस्तित्व नष्ट होते.

अशी बारा आवर्तने पूर्ण झाल्यानंतर म्हणजे ३७,३२,४८० x १२ = ४,४७,८९,७६० (सदतीस लक्ष, बत्तीस हजार, चारशे ऐंशी x बारा = चार कोटी, सत्तेचाळीस लाख, एकोणनव्वद हजार, सातशे साठ) वर्षांनी एक ब्रह्मप्रलय होतो. या ब्रह्मप्रलयामध्ये पृथ्वीलोकापासून पितृलोकापर्यंतची सर्व सृष्टी नष्ट होते. हजारो वर्षांपासून भू-लोकांपासून पितृ-लोकापर्यंतच्या वातावरणात भरकटत असणारे आत्मे नष्ट होतात.

अशी बारा आवर्तने पूर्ण झाल्यानंतर म्हणजे ४,४७,८९,७६० x १२ = ५३,७४,७७,१२० (चार कोटी, सत्तेचाळीस लाख, एकोणनव्वद हजार, सातशे साठ x बारा = त्रेपन्न कोटी, चौऱ्याहत्तर लाख, सत्त्याहत्तर हजार, एकशे वीस) वर्षांनी महाब्रह्मप्रलय होतो. या महाब्रह्मप्रलयात लक्षावधी वर्षांपासून स्वर्गात राहणाऱ्या देव-देवता नष्ट होतात. याला विष्णुप्रलय असेही म्हणतात.

अशी बारा आवर्तने पूर्ण झाल्यानंतर म्हणजे ५३,७४,७७,१२० x १२ = ६,४४,९७,२५,४४० (त्रेपन्न कोटी, चौऱ्याहत्तर लाख, सत्ताहत्तर हजार, एकशे वीस x बारा

= सहा अब्ज, चव्वेचाळीस कोटी, सत्याण्णव लाख, पंचवीस हजार, चारशे चाळीस) वर्षांनी ईश्वरप्रलय होतो. अणू, परमाणू नष्ट होतात. इलेक्ट्रॉन, न्यूट्रॉन, प्रोटॉन नष्ट होतात. सोप्या भाषेत सांगायचे म्हणजे ब्रह्मा, विष्णू, महेश लीन होतात आणि नंतर उरते फक्त मूलप्रवृत्ती आदिमाया, आदिशक्ती जगदंबा The Universal Divine Mother आणि नंतर ही आदी परात्पर शक्ती जगदंबा इलेक्ट्रॉन, न्यूट्रॉन, प्रोटॉन - ब्रह्मा-विष्णु-महेश यांना निर्माण करते. यांच्या शक्ती म्हणून महासरस्वती, महालक्ष्मी, महाकाली निर्माण होतात व पुनश्च सृष्टीचा आरंभ होतो.

## युगपरिवर्तन

दर २१६० वर्षांनी युगपरिवर्तन होते असे या लेखाच्या आरंभी म्हटले आहे. सन २००७ मध्ये २१६० वर्षांचे एक परिवर्तन युग पूर्ण होत आहे.

२००७ पासून पृथ्वीतलावरील पाप नष्ट होण्यास सुरुवात होईल. तो नवीन युगाचा आरंभ असेल. पृथ्वीतलावरील सर्व पाप धुतले जाईल. प्रलयंकारी चक्रीवादळांनी पृथ्वी धुवून निघेल. अनेक शहरे जलमय होतील. २०३० पर्यंत सर्व पृथ्वी स्वच्छ होईल व २०३४ पासून नवीन आनंददायी अशा युगाची सुरुवात होईल.

## नवदुर्गा

सृष्टीमध्ये एकूण नवमिती असून, प्रत्येक मितीवर एकेका दुर्गादेवीचे **आधिपत्य** आहे. अशा एकूण नऊ दुर्गा आहेत. म्हणून या देवतांना नवदुर्गा असे म्हणतात.

नऊ या आकड्याचे महत्त्व आपल्या जीवनात पदोपदी दिसून येते. कालचक्रामध्ये दर १८० वर्षांनी परिवर्तन होते. १+८+०=९, परिवर्तनाचा मोठा टप्पा ७२० वर्षांनी येतो. ७+२+०=९.

दर २१६० वर्षांनी पृथ्वीतलावर युगपरिवर्तन होते.

२+१+६+०=९

दर २५,९२० वर्षांनी पृथ्वीवर फार मोठा प्रलय होतो.

२+५+९+२+०=१८. १+८=९

या सृष्टिरहस्य अध्यायामध्ये कालचक्र परिवर्तनाचे जे काही आकडे दिलेले आहेत, त्या सर्व आकड्यांची बेरीज ९ येते.अशा प्रकारे संपूर्ण सृष्टीवर ९ चे म्हणजे नवदुर्गांचे आधिपत्य आहे.

**।। ॐ दुर्गे देवी नमोस्तुते ।।**

# १४. ईश्वरप्राप्तीचा मार्ग

## अध्याय एक

### जन्मकर्म

१) आध्यात्मात प्रगती करण्यासाठी, ईश्वराच्या दिशेने पुढे जाण्यासाठी ईश्वराशी एकरूप होण्यासाठी आत्म्याला परमेश्वर मानव जन्म देतो.

२) पृथ्वी हे एक विश्वविद्यालय असून, या विद्यालयात आत्म्याला शिकण्यासाठी पाठविले जाते, आत्मविकास व्हावा म्हणून पाठविले जाते, मानवदेहरूपी वाहनात बसून, परमेश्वराच्या दिशेने प्रवास करण्यासाठी पाठविले जाते.

३) ईश्वराने तुम्हाला पृथ्वीवर चांगल्या गोष्टी शिकण्यासाठी पाठविले आहे, याची सदैव आठवण ठेवा.

४) 'मी' म्हणजे देह नव्हे, हे मानवाने प्रथम समजून घेतले पाहिजे; कारण देह जन्माला येतो, वाढतो, तरुण होतो, वृद्ध होतो व मरतो. या देहात राहणारा मी मात्र देह मेल्यानंतरही जिवंतच असतो व सत्कर्मे केली असतील, तर शांती व आनंद उपभोगतो व दुष्कर्मे केली असतील, तर यातना भोगतो.

५) पृथ्वीतलावर आपले वास्तव्य जास्तीत जास्त ७० ते ८० वर्षे असते. यातील निम्मे आयुष्य झोपेत जात असते. एकतृतीयांश आयुष्य उद्योगधंदा करण्यात जाते. आयुष्याचा अतिशय थोडा वेळ मानवाजवळ साधना करण्यासाठी शिल्लक राहतो. या थोड्या वेळाचा उपयोग स्वतःच्या उद्धारासाठी करायला हवा, स्वर्गलोकात प्रवेश प्राप्त होण्यासाठी करायला हवा.

६) हा देह सोडून परलोकात जावे लागणारच आहे, याची सतत जाणीव मानवाने ठेवायला हवी. अशी जाणीव ठेवल्यास मनुष्य वाईट कर्मे करणार नाही.

७) धन, वैभव, जमीनजुमला, सत्ता या सर्व गोष्टी येथेच सोडून जायच्या आहेत, याची मानवाने सतत जाणीव

ठेवावी. मृत्यूनंतर आपले काय होईल, याचा विचार मानवाने सतत करीत रहावा.

८) पोट भरण्यासाठी अनेक प्रकारचे उद्योग अथवा काबाडकष्ट करताना मानवाने 'मी देह नव्हे, हा देह येथेच सोडून मला जायचे आहे याची जाणीव ठेवावी.' सतत अशा प्रकारची जाणीव ठेवल्यानंतर अहंकार होणार नाही, वाईट कर्मे हातून घडणार नाहीत. जगातील सर्व वस्तू क:पदार्थ वाटू लागतील.

९) **सर्व येथे राहणार ।**
**काही न येई बरोबर ।**
**सत्कर्म आणि सदाचार ।**
**हेचि जीवाचे सांगाती ।।**

१०) **परोपकारार्थं इदं शरीरम् ।**
**ईश चिंतनार्थं इदं मनः ।।**
**विवेकार्थं इदं बुद्धी । ब्रह्मज्ञानार्थ जीवनम् ।।**

११) दया, क्षमा, शांती, अहिंसा, करुणा, प्रेम, दान, परोपकार, नम्रता, ईश्वरभक्ती, एकाग्रता, ध्यान या गोष्टी मानवाने शिकाव्यात, अशी ईश्वराची इच्छा असते. यातील आपण थोडे जरी शिकलो, तरी ईश्वर संतुष्ट होऊन

आपल्याला पुनश्च मानव जन्म देतो व आणखी प्रगती करण्यासाठी संधी उपलब्ध करून देतो.

१२) पृथ्वीतलावर जे लोक सज्जनतेने वागतात, ईश्वरभक्ती करतात, दान करतात, परोपकार करतात, अशा लोकांना पृथ्वीतलावर यश, आनंद व शांती प्राप्त होते.

१३) जे लोक दान, परोपकार, ईश्वरभक्ती करीत नाहीत, अशा लोकांचे मन अशांत, अतृप्त राहते व त्यांना सतत अपयश येत राहते.

१४) सतत परोपकार करत रहावे. परोपकाराने पुण्य प्राप्त होते.

१५) **परोपकाराय पुण्याय । पापाय परपीडनम् ।।**

परोपकार हेच पुण्य, परपीडा हेच पाप.

१६) परोपकार करण्याची संधी ईश्वराच्या कृपेने प्राप्त होत असते, म्हणून आपल्या हातून जितका होईल तितका परोपकार करत रहावे.

१७) दुसऱ्याला कुठलाही त्रास, दुःख देऊ नये.

१८) दुसऱ्याला त्रास देणे, दुःख देणे हे पाप आहे.

१९) आपल्याकडून दुसऱ्याला त्रास होणार नाही, याची दक्षता घ्यावी.

२०) 'करावे तसे भरावे' हा न्याय सर्वत्र लागू आहे.

२१) स्वर्गलोकातील दिव्य आनंद प्राप्त व्हावा असे वाटत असेल, तर दया, करुणा, प्रेम व परोपकार यांचे आचरण करा.

२२) स्वर्ग इतका सुंदर आहे, की त्याचे वर्णन शब्दाने करता येणार नाही.

२३) कनिष्ठ स्वर्ग, श्रेष्ठ स्वर्ग, अत्युच्च स्वर्ग असे स्वर्गाचे अनेक प्रकार असून, पृथ्वीतलावरील सत्पुरुष, योगी, सिद्धमहात्मे, संत व पुण्यात्मे स्वर्गाच्या विविध स्तरांवर राहतात.

२४) मृत्यूनंतर आपण स्वर्गात जाणार की नरकात जाणार, हे समजणे अगदी सोपे आहे. स्वर्गात जाणाऱ्या माणसाचे मन एकाग्र होते, शांत व आनंदी असते आणि पवित्र असते.

२५) नम्रतेने वागणारे, प्रेमाने वागणारे स्वर्गात जातात. त्यांना शांती, आनंद व देवतांचा सहवास प्राप्त होतो.

२६) 'विद्या विनयेन शोभते' नम्रता ही आध्यात्माची पहिली पायरी आहे.

२७) आनंदात रहावे व सर्वांना आनंद द्यावा.

२८) आनंदात राहा, सुखात राहा, हास्यविनोद करा, मनोरंजन करा; परंतु ईश्वराला विसरू नका, सत्कर्माला विसरू नका.

२९) खिन्न, उदास, दुर्मुखलेले असे कधीही राहू नये. खिन्न, उदास राहिल्याने मनावर दुष्ट स्पंदनाचा दबाव येतो. किंबहुना दुष्ट स्पंदनांचा दबाव आल्यानंतर मनाला खिन्नता, उदासीनता प्राप्त होते.

३०) खिन्नता, उदासीनता मनाला प्राप्त झाल्यास ईश्वराचे स्तोत्र मोठ्याने म्हणावे, म्हणजे उदासीनता दूर होते.

३१) मोठेपणाची अपेक्षा करू नका. मोठेपणाची अपेक्षा आत्म्याची अधोगती करते.

३२) माणसाने भ्रमात राहू नये. मी कोणीतरी विशेष आहे, असे कधीही वाटून घेऊ नये. भ्रमात राहणारी माणसे अधोगतीला जातात.

३३) सतत इतरांचे आशीर्वाद घेत रहावे.

३४) आपल्याला पुण्य मिळेल असे कर्म करावे.

३५) दररोज काहीतरी पुण्य मिळविल्याशिवाय राहू नये.

३६) जास्तीत जास्त पुण्य मिळविण्याचा प्रयत्न करीत

रहावे.

३७) पुण्याईने मनुष्य इहलोकी व परलोकी सुखी होतो.

३८) प्रारब्धानुसार राजा-रंक, गरीब-श्रीमंत, मजूर-मालक अशा विविध रूपांमध्ये मानवाचा जन्म होत असतो. या सर्व भूमिका वठविताना ईश्वराचे विस्मरण होणार नाही याची दक्षता घ्यावी.

३९) पुण्याईने सर्व प्रकारची सुखे प्राप्त होतात, म्हणून सतत पुण्य करत रहा.

४०) पुण्याईने पृथ्वीतलावर सुख व मृत्यूनंतर स्वर्ग प्राप्त होतो.

४१) ईर्षा, द्वेष, मत्सर, अहंकार करणारे मानव मृत्यूनंतर शेकडो वर्षे यातना भोगतात.

४२) लाच खाणारे, दुसऱ्यांना फसविणारे, धूर्त, लबाड, सतत खोटे बोलणारे असे मानव मृत्यूनंतर शेकडो वर्षे यातना भोगत राहतात. अशा लोकांनी मानवदेहरूपी ईश्वराने दिलेल्या वाहनाचा दुरुपयोग केलेला असतो, म्हणून ते ईश्वरी शिक्षेला पात्र ठरतात. अशा मानवांना कठोर ईश्वरी शिक्षेला तोंड द्यावे लागते. इतकेच नव्हे, तर शिक्षा म्हणून अशा आत्म्यांना सडलेले मांस खाणाऱ्या प्राण्यांचे, पक्ष्यांचे जन्म प्राप्त होतात

व अनेक प्रकारच्या यातना भोगाव्या लागतात.

४३) दुष्टपणा करणाऱ्या, कपट-कारस्थाने करणाऱ्या, आतंकवाद पसरविणाऱ्या लोकांना मृत्यूनंतर लाखो वर्षे पृथ्वीच्या पोटात असणाऱ्या यातना लोकात पाठविले जाते. यांच्या यातनांना अंत नसतो.

४४) खुनी, बलात्कारी, गुंड, दहशतवादी, चोर, लुटारू इत्यादी पापकर्म करणाऱ्या लोकांना मृत्यूनंतर अंध:कारमयलोकात लाखो वर्षे रहावे लागते व विविध प्रकारच्या यातना भोगाव्या लागतात.

४५) जे लोक स्वार्थी असतात, जे दान करीत नाहीत- फक्त स्वत:चाच विचार करतात, अशा लोकांना मृत्यूनंतर शेकडो वर्षे पिशाच्च योनीमध्ये रहावे लागते व तेथे त्यांना अनेक प्रकारच्या यातना भोगाव्या लागतात.

४६) पृथ्वीतलावरील मदांध, धनांध, गर्विष्ठ, सत्तांध व इतरांची किंमत न करणारे असे जे लोक असतात, अशा लोकांना मृत्यूनंतर पिशाच्चलोक प्राप्त होतो.

४७) पृथ्वीतलावर ज्यांनी दु:ख, कष्ट, यातना व उपेक्षा सहन केली, तप:श्चर्या केली, ईश्वरभक्ती केली, सज्जनतेने वागले, गरीब असे लोक स्वर्गात आढळतात.

४८) पृथ्वीवरील धनमदांध, सत्ताधीश, गर्विष्ठ,

अहंकारी, दुष्ट, दुर्जन, स्वार्थी नरकामध्ये यातना भोगताना आढळतात.

४९) 'आत एक बाहेर एक' असे वागणारी माणसे पिशाश्च योनीत जातात.

५०) जे लोक कुत्सित बुद्धीने वागतात त्यांना पिशाच्च योनी प्राप्त होते.

५१) कंजूष माणूस स्वत:चाच घात करत असतो. अपयश, दारिद्र्य, अशांती कंजूष माणसाला घेरतात. वातावरणातील देव-देवतांचे शाप कंजूष माणसाला लागतात. लक्ष्मी त्याला सोडून निघून जाते. कुठल्याही प्रकारची बरकत त्याच्या घरात रहात नाही. मृत्यूनंतर पिशाच्च योनी प्राप्त होते.

५२) विद्वत्तेचा अहंकार करणारे मृत्यूनंतर शेकडो वर्षे पिशाच्च योनीत राहतात. यातना भोगतात व तद्नंतर क्रूर पशूंचा जन्म त्यांना प्राप्त होतो.

५३) तंत्र, मंत्र, भूत, पिशाच्च यांच्या साधना कधीही करू नयेत. अशा साधना करणारे मृत्यूनंतर भयंकर अशा पिशाच्चलोकात जातात व हजारो वर्षे यातना भोगतात.

५४) काही लोक जळू प्रवृत्तीचे असतात. दुसऱ्याला मोठेपणा मिळालेला त्यांना बघवत नाही, असे लोकही

मृत्यूनंतर दुर्गतीला जातात.

५५) वाईट कर्मे केल्यास, वाईट विचार केल्यास, वाईट लोकच प्राप्त होईल याची सतत जाणीव ठेवावी.

५६) कपट- कारस्थाने करू नयेत. कपट- कारस्थाने करण्याने मनुष्य पिशाच्चलोकात जातो व शेकडो वर्षे यातना भोगत राहतो.

५७) ईर्षा, द्वेष, मत्सर, लोभ, अहंकार, स्वार्थ हे सर्व राक्षस असून, यांना आपल्या मानगुटीवर बसू देऊ नका.

५८) ऋण, हत्या आणि वैर या तीन गोष्टी मानवाला अनेक योनींमध्ये पुन: पुन्हा जन्म घ्यायला लावतात.

५९) कोणाकडून उसने पैसे घेऊ नयेत. घेतले तर ठेवू नयेत. कोणाशी वैर करू नये. कोणाची हत्या करू नये; तसेच लाच घेऊ नये. कोणाचे उपकार घेऊ नयेत; कारण या सर्व गोष्टी आत्म्याची अधोगती करतात.

६०) मृत्यूनंतर आपले काय होईल याचा विचार सतत करावा.

६१) फक्त सिद्धपुरुषांना सेवा घेण्याचा अधिकार असतो, म्हणून तन, मन, धनाने सिद्धपुरुषांची सेवा करावी, म्हणजे पूर्वजन्मातील पापकर्मे जळून जातात.

६२) ध्यानयोगाद्वारे चतुर्दश लोकांचे भ्रमण करता येते व विविध प्रकारच्या आत्म्यांच्या गाठीभेटी घेऊन ज्ञान मिळविता येते.

६३) योगसाधनेद्वारा निरनिराळ्या लोकांमध्ये भ्रमण करताना, योग्याला वातावरणातील देव-देवता विविध प्रकारचे संरक्षण कवच बहाल करतात, यामुळे योग्याला अधोलोकातील दुष्ट शक्तींचा त्रास होत नाही.

६४) परोपकार व ईश्वरभक्तीने अदृश्य सृष्टीतील देव-देवतांची कृपा होते व जीवन सुखी होते, जीवनातील सर्व समस्यांचे निराकरण होते.

६५) दोन मित्र ज्याप्रमाणे एकमेकांशी आत्मीयतेने बोलतात, तितक्याच आत्मीयतेने वृक्ष मानवाशी बोलू शकतात. वृक्षांमध्येही आत्म्याचा निवास असतो. त्यांनाही स्वभाव असतो, भावना असतात. यासाठी वृक्षांचाही सन्मान करायला हवा. औदुंबरासारख्या सात्त्विक वृक्षावर देवतांचा निवास असतो, तर बाभळीसारख्या काटेरी वृक्षावर पिशाच्चांचा निवास असतो.

६६) सात्त्विक प्रवृत्तीच्या वृक्षांची लागवड करणे ही ईश्वराची सेवा होय. सात्त्विक वृक्ष वातावरणात सात्त्विकता निर्माण करतात व त्यामुळे माणसाच्या मनाला शांती लाभते.

## अध्याय दोन

### ईश्वरभक्ती

१) परमेश्वराचे नामस्मरण सतत करणे, ईश्वराची प्रार्थना करणे, याला ईश्वरभक्ती असे म्हणतात.

२) आपल्याला ईश्वराचे जे नाव आवडते, त्या नावाने ईश्वराचे नामस्मरण करावे.

३) आपल्याला ऐकू येईल, अशा पद्धतिने सतत नामस्मरण करीत रहावे.

४) हळूहळू मनामध्ये ईश्वराचे नामस्मरण करण्याचा प्रयत्न करावा.

५) मनातल्या मनात ईश्वराचे नामस्मरण होऊ लागले की, ईश्वरी कृपा होऊ लागते.

६) दररोज किमान एक तास नामस्मरण करावे.

७) आपल्या आवडत्या देवतेची मानसपूजा करावी.

८) श्वासोच्छ्वासाबरोबर नामस्मरण करण्याचा प्रयत्न करावा.

९) श्वास घेताना व सोडताना ईश्वराचे नामस्मरण करावे.

१०) एकाच आसनावर सतत तीन तास सकाळी व तीन तास संध्याकाळी बसून एक वर्ष जप केला असता ती देवता प्रसन्न होते.

११) आपल्या आवडत्या देव-देवतांच्या एखाद्या स्तोत्राचे हजारो पाठ करावेत, म्हणजे त्या देवतेची कृपा होते.

१२) एखाद्या छोट्याशा स्तोत्राचे किमान बावन्न हजार पाठ करावेत, म्हणजे त्या देवतेची कृपा होते.

१३) एखाद्या मंत्राचा किमान तीन लाख जप करावा, म्हणजे त्या मंत्रदेवतेचे कृपाकिरण प्राप्त होतात.

१४) मंत्र नेहमी छोटा असावा, म्हणजे कमी अक्षरांचा असावा म्हणजे तो लवकर सिद्ध होतो.

१५) आपल्या आवडत्या देवतेची, देवाची, सत्पुरुषाची मानसपूजा भक्तिभावाने करावी.

१६) भक्तिभावाने मानसपूजा करताना आपल्या आराध्य देवतेच्या स्थानात जावे.

१७) आपली आराध्यदेवता आसनावर बसली आहे, असे पाहावे व देवतेची षोडशोपचारे पूजा करावी. याला मानसपूजा असे म्हणतात.

१८) श्वास घेताना **सोऽऽ** व सोडताना **हम्ऽऽऽ** असा जो ध्वनि होतो त्या ध्वनिकडे लक्ष ठेवावे. ईश्वरप्राप्तीसाठी हा एक सुलभ मार्ग आहे.

१९) ईश्वरप्राप्तीच्या मार्गामध्ये, सद्‌गतीच्या मार्गामध्ये आपली पूर्वजन्मातील कर्मे आडवी येत असतात.

२०) पूर्वजन्मातील कर्मे शुद्ध करण्यासाठी दान व परोपकार अत्यंत आवश्यक आहेत, म्हणून आपल्या उत्पन्नातील २० टक्के भाग दान-धर्मात खर्च करावा.

२१) दानाने समृद्धी येते व स्वर्गलोकाचा मार्ग सुकर होतो.

२२) दान व परोपकार याने मन विशाल बनते.

२३) वागण्यामध्ये उदारपणा असावा. क्षमाशीलता असावी.

२४) ज्या ग्रंथामध्ये युद्धाची वर्णने आहेत, असे ग्रंथ घरामध्ये नेहमी वाचू नयेत.

२५) अनेक जन्मांमध्ये आपण जी काही कर्मे केलेली असतात, त्या कर्माच्या गाठोड्याला **संचित** असे म्हणतात.

२६) या जन्मी जन्मापासून मरेपर्यंत आपण जे काही भोगतो त्याला **प्रारब्ध** असे म्हणतात. संचितापासून प्रारब्ध

बाजूला काढले जाते.

२७) या जन्मी आपण जे काही कर्म करतो, त्या कर्माला **क्रियामाण** असे म्हणतात.

२८) या जन्मी केलेली सर्व कर्मे (क्रियामाण) पुन्हा संचितात जमा होतात. अशा प्रकारे संचिताचे गाठोडे नेहमी वाढत असते.

२९) संचित पूर्णपणे नष्ट झाल्याशिवाय मुक्ती प्राप्त होत नाही.

३०) प्रत्येक माणसाला **स्थूल, सूक्ष्म, कारण** व **महाकारण** असे चार प्रमुख देह आहेत.

३१) स्थूलदेह म्हणजे रक्त, हाडे व मांस यांचे शरीर. **हा स्थूलदेह अन्नावर जगतो**. आध्यात्मात प्रगती करण्यासाठी ईश्वर आत्म्याला मानवाचा स्थूल देह प्रदान करतो.

३२) **सूक्ष्मदेह** हा माणसाच्या स्थूलदेहात राहतो. स्थूलदेहाएवढाच त्याचा आकार असतो व सूक्ष्म ज्ञानेंद्रियांचा बनलेला असतो. **हा सूक्ष्मदेह विचारांवर जगतो.** मन निर्विचार झाले की सूक्ष्मदेह शुद्ध होतो, तेजस्वी होतो. ईश्वराची कृपा ग्रहण करण्यास योग्य

होतो. या सूक्ष्मदेहामध्ये **प्रारब्ध** असते. प्रारब्ध चांगले असेल तर चांगले विचार मनात निर्माण होतात व प्रारब्ध जर दुषित असेल तर मनात वाईट विचार निर्माण होतात. दुष्टकर्मे करणाऱ्या माणसाचा सूक्ष्मदेह काळा असतो व ईश्वरभक्ती करणाऱ्या, ध्यान-धारणा करणाऱ्या माणसाचा सूक्ष्म देह तेजस्वी असतो. अशी माणसे आनंदी व समाधानी असतात. हा सूक्ष्मदेह शुद्ध करण्यासाठीच ईश्वरभक्ती, सोऽहम् ध्यान, परोपकार व दान या गोष्टी करावयाच्या असतात. या सूक्ष्मदेहात मन व बुद्धी राहतात.

३३) कारणदेह हा अंगुष्ठप्रमाण असतो. माणसाच्या भ्रूमध्यामध्ये असतो. या कारणदेहामध्ये चित्त असते. या चित्तामध्ये शेकडो जन्मांमध्ये जी काही चांगली-वाईट कर्मे केलेली असतात, त्या सर्व कर्मांचे रेकॉर्ड असते. या रेकॉर्डला संचित असे म्हणतात. हजारो जन्मांच्या या रेकॉर्डमधून या जन्मामध्ये आपण जे काही भोगणार असतो त्याला प्रारब्ध म्हणतात. सामान्य भाषेमध्ये प्रारब्धाला नशीब म्हटले जाते व या जन्मी आपण जे काही कर्म करतो त्या कर्माला क्रियामाण कर्म

असे म्हणतात. प्रत्येक क्षणाला केलेल्या कर्मांची नोंद संचितामध्ये होत असते. **कारणदेह हा कल्पनेवर जगतो**. मन निर्विकल्प झाले की, कारणदेह महाकारणदेहात विलीन होतो.

३४) स्थूलदेह म्हणजे रक्त, हाडे व मांस यांचे शरीर, सूक्ष्मदेह सूक्ष्म ज्ञानेंद्रियांनी बनलेला असतो. या सूक्ष्मशरीरामध्ये प्रारब्ध वास करते व प्रारब्धानुसार मानवाला बुद्धी होते. प्रारब्धकर्म दूषित असेल, तर सूक्ष्मदेह काळा असतो.

३५) हा सूक्ष्मदेह शुद्ध करण्यासाठीच ईश्वरभक्ती, दान व परोपकार करावयाचे असतात.

३६) कारणदेह अंगुष्ठप्रमाण असतो.

३७) अनेक जन्मांच्या संचिताचे गाठोडे या देहात असते व या जन्मी आपण जी काही कर्मे करू ती सर्व कर्मे संचितात जमा होतात.

३८) महाकारणदेह हा विश्वव्यापी असतो. ईश्वरस्वरूप असतो.

३९) सद्‌गुणी माणसांचा सूक्ष्मदेह तेजस्वी असतो. मृत्यूनंतर दिव्यलोकात जातो. वाईट कर्मे करणाऱ्या माणसांच्या

सूक्ष्मदेहावर विविध प्रकारची आवरणे पडतात. असे आत्मे मृत्यूनंतर पिशाच्चलोकात यातना भोगत राहतात.

४०) ईश्वरभक्ती, साधना व तप:श्चर्या करून आपल्याच स्वरूपाशी म्हणजेच महाकारणदेहाशी तादात्म्य पावणे हाच मानव जन्माचा मुख्य हेतू असतो.

४१) पृथ्वीतलावर जन्माला आल्यानंतर मानवाला या सर्व गोष्टींचा विसर पडतो व जन्मापासून मरेपर्यंत तो अनेक प्रकारची चांगली-वाईट कर्मे करत राहतो.

४२) पृथ्वीतलावर जन्माला आलेल्या प्रत्येक मानवाने आपण कशासाठी जन्माला आलो आहोत याची जाणीव ठेवायला हवी व ईश्वरभक्ती करून, दररोज किमान २-३ तास साधना करून ईश्वराच्या दिशेने पुढे जाण्यासाठी प्रयत्न करायला हवा.

४३) पूर्वजन्मात जर भरपूर पापकर्मे केली असतील, ईश्वरसदृश सिद्धपुरुषांचे अपमान केले असतील, दुष्ट शक्तींचा प्रभाव मानवी बुद्धीवर झालेला असेल, तर ईश्वरभक्ती हातून होत नाही. अशी  माणसे भ्रमात

राहतात. आत एक-बाहेर एक असे वागतात. अशा सर्व प्रकारच्या माणसांनी भरपूर दान, ईश्वरभक्ती व नम्रतेने सत्पुरुषांची सेवा करायला हवी, तरच अशा लोकांना काहीतरी मार्ग मिळू शकतो, अन्यथा असे लोक विविध योनींमध्ये फिरत राहतात.

४४) येता-जाता, उठता-बसता, देता-घेता, चालता-बोलता, खाता-पिता ईश्वराचे नामस्मरण करत रहावे. असे केल्याने ईश्वराची कृपा होते व ईश्वर एखाद्या सत्पुरुषाची गाठ घालून देतो.

४५) नम्रतेने सत्पुरुषांची सेवा केली असता प्रारब्ध शुद्ध होते.

४६) कबीराने म्हटले आहे, की 'सर देकर गुरू मिले तो भी सस्ता होय !'

४७) गुरुची भेट होणे ही अतिशय कठीण गोष्ट आहे.

४८) गुरुची भेट झाल्यावर नम्रतेने त्याची सेवा करणे ही त्याहून कठीण गोष्ट आहे; कारण मानवाचे दूषित प्रारब्ध व अहंकार मानवाला सेवेपासून वंचित करतात.

४९) गुरुच्या आज्ञेचे पालन करणे ही अतिशय कठीण गोष्ट आहे.

५०) सर्वांत कठीण गोष्ट सद्‌गुरु शरणागती.

५१) ईश्वर जेव्हा मनुष्यरूप धारण करतो तेव्हा त्याला गुरु असे म्हटले जाते.

५२) अशी ही ईश्वराची मानवी रूपे मानवाच्या उद्धारासाठी ठिकठिकाणी वास्तव्य करून असतात व प्रसिद्धीपासून दूर राहून आपआपली कार्ये करत असतात.

५३) ईश्वरभक्तीमध्ये जसजशी प्रगती होऊ लागते तसतसे मन एकाग्र होऊ लागते.

५४) मन एकाग्र होऊ लागले, की साधनेची सुरुवात होते.

५५) एकाच आसनावर बसून दररोज तीन-तीन तास साधना केली असता, साधन मार्गात प्रगती होते.

५६) अशा प्रकारे काही वर्षे साधना केल्यानंतर डोळ्यासमोरील अंध:कार नष्ट होतो व आत्म्याचे प्रकाशमय रूप दृग्गोचर होऊ लागते.

५७) विविध प्रकारच्या देव-देवतांचे व दिव्यात्म्यांची दर्शने होतात.

५८) अशा प्रकारे परमानंदाचा अनुभव घेत गुरुच्या कृपेने वातावरणातील सिद्धपुरुषांच्या आशीर्वादाने भक्त

परमेश्वराच्या पायापर्यंत जाऊन पोहोचतो.

५९) योगसाधना करणारे योगी मनाला निर्विचार बनवितात व निर्गुणाची साधना करून परब्रह्माशी तादात्म्य पावतात.

६०) परब्रह्माशी तादात्म्य पावलेले असे हे योगी समाजाला ईश्वराच्या दिशेने पुढे नेण्याचे कार्य करतात.

६१) प्रारब्धानुसार ईश्वराने तुम्हाला जी काही भूमिका दिली असेल, ती भूमिका करत असताना ईश्वराची भक्ती, साधना करून मृत्यूनंतर सद्‌गती प्राप्त व्हावी म्हणून प्रयत्न करणे हेच मानवाचे आद्य कर्तव्य होय.

६२) एक ईश्वर हजारो नावे. ईश्वराच्या हजारो नावांपैकी आवडेल त्या नावाने त्याचे सतत स्मरण करा व प्रारब्धशुद्धीसाठी परोपकार व दान करा. हेच मानवजन्माचे मुख्य कर्तव्य होय.

६३) या ग्रंथात सांगितलेल्या गोष्टी वाचण्यास जरी सोप्या असल्या, तरी बऱ्याचशा लोकांचे प्रारब्ध, पूर्वजन्मातील कर्मे इतकी काही खराब असतात, की ते असे ग्रंथ वाचू शकत नाहीत व वाचल्यास आचरणात आणू शकत नाहीत. त्यांचे पूर्वजन्मातील कर्म त्यांना

सन्मार्गापासून दूर ठेवत असते.

६४) हवा डोळ्यांना दिसत नाही. ईश्वर डोळ्यांना दिसत नाही. आपण श्वास घेतो, श्वास सोडतो. हा श्वास डोळ्यांना दिसत नाही; परंतु या श्वासाशिवाय आपण जगू शकत नाही. हा श्वास म्हणजेच प्राण. हा प्राण म्हणजेच आपल्या शरीरात राहणारा ईश्वर. या ईश्वराची कास धरणे म्हणजेच ईश्वरभक्ती.

६५) या सर्व गोष्टी फक्त वाचण्यासाठी नसून, आचरणात आणण्यासाठी आहेत.

### घर

६६) घरामध्ये देवासमोर दररोज तुपाचा दिवा लावावा. कमीत कमी ५-१० मिनिटे तरी सकाळ, संध्याकाळ तुपाचा दिवा लावावा.

६७) तुपाचा दिवा लावणे शक्य नसेल, तर तेलाचा दिवा लावावा. सकाळी तीन तास व संध्याकाळी तीन तास तेलाचा दिवा लावावा.

६८) घरामध्ये तुपाचा दिवा लावल्याने देव-देवतांचे कृपाकिरण प्रवेश करतात.

६९) ज्या घरात तीन वर्षे दिवा लावला जात नाही, त्या घरामध्ये पिशाच्चे राहतात. अशा घरात राहणाऱ्या लोकांचे मन:स्वास्थ्य बिघडते. मन अशांत, अस्वस्थ, खिन्न, उदास होते.

७०) घरामध्ये देवाची स्तोत्रे दररोज वाचावीत. त्यामुळे घर पवित्र राहते.

७१) घरामध्ये सत्पुरुषांची चरित्रे वाचावीत. भक्तीचे महात्म्य ज्या ग्रंथांमध्ये वर्णन केले आहे असे ग्रंथ वाचावेत.

७२) दररोज १० मिनिटे तरी ईश्वराचे नामस्मरण, स्तुतिस्तोत्रे घरातील सर्वांनी एकत्र बसून म्हणावीत, असे केल्याने घर पवित्र राहते. आपले मनही पवित्र होते.

७३) सूर्याच्या प्रकाशाकडे डोळे मिटून दररोज एक मिनिट पाहावे.

७४) या पुस्तकात दिलेले सर्व मुद्दे तुम्ही आचरणात आणा, म्हणजे दिव्य परमानंदाची प्राप्ती होईल. जीवन संपूर्णपणे सुखी होईल.

७५) **परोपकार हेच पुण्य । परपीडा हेच पाप ।।**

# १५. ईश्वरप्राप्तीचे चार मार्ग

**योगमार्ग**

योगसाधना करताना पोट रिकामे असावे. पाणी प्यायल्यानंतर अर्धा तास व जेवणानंतर पाच तास साधना करू नये. पहाटे पाच ते साडेपाच ही वेळ साधनेसाठी सर्वोत्तम !

पूर्वेकडे किंवा उत्तरेकडे तोंड करून साधना करावी.

१. उजव्या हाताच्या अंगठ्याने उजवी नाकपुडी दाबून, डाव्या नाकपुडीने दीर्घ श्वास घ्यावा व सोडावा. असे २१ वेळा करावे. नंतर उजव्या हाताच्या मधल्या दोन बोटांनी डावी नाकपुडी दाबून उजव्या नाकपुडीने तसाच २१ वेळा श्वासोच्छ्वास करावा.

२. उजव्या हाताच्या अंगठ्याने उजवी नाकपुडी दाबावी व डाव्या नाकपुडीने श्वास घ्यावा. नंतर मधल्या दोन बोटांनी डावी नाकपुडी दाबून उजव्या नाकपुडीने श्वास सोडावा. नंतर उजव्या नाकपुडीने श्वास घेऊन तो डाव्या नाकपुडीने सोडावा. श्वास रोखून धरण्याची मुळीच आवश्यकता नाही.

अशा प्रकारे दररोज किमान एकवीस प्राणायाम सकाळी व संध्याकाळी करावे.

वरीलप्रमाणे प्राणायाम केल्याने मनात येणाऱ्या विचारांची संख्या कमी कमी होत जाते, मन एकाग्र होऊ लागते. सुरुवातीला एकवीस प्राणायाम करावेत. काही दिवसांनंतर प्राणायामांची संख्या वाढविली तरी चालेल. ज्यांना साधनेत प्रगती हवी असे वाटते, त्यांनी प्राणायामाच्या संख्येत हळूहळू वाढ करीत जावे. दररोज ३३३ प्राणायाम केल्याने सहा महिन्यांत नाड्या शुद्ध होतात, परंतु याच बरोबर सात्त्विक भोजनाची आवश्यकता आहे. दररोज अर्धा चमचा तूप घ्यावे किंवा जेवणात वापरावे.

३. प्राणायाम झाल्यावर ध्यान करावे. डोळे मिटावेत व आपले सर्व लक्ष भ्रूमध्याच्या ठिकाणी केंद्रित करावे.

हळुवारपणे दीर्घश्वसन चालू ठेवावे. मन चंचल झाल्यास आपला श्वास कोठे जातो ते पाहावे. ऋषी-मुनींनी सांगितलेला क्रियायोग हाच असून, याला लाहिरी महाशयांनी **'उलट पवन ठोकर मारे खोले दरवाजा'** असे म्हटले आहे. श्री महाअवतार बाबाजींनी ही साधना लाहिरी महाशयांना शिकविली.

४. श्वास घेताना व सोडताना **'सोऽ हम्'** असा जप चालू ठेवावा किंवा 'ॐ' असे म्हणावे किंवा आपल्या आवडत्या देवतेचे नामस्मरण करावे.

वरीलप्रमाणे अनुसरण केल्यास परमार्थात खूप प्रगती होते.

**ज्ञानमार्ग**

ज्ञानमार्ग हा अत्यंत कठीण मार्ग असून, कलियुगातील मानवांनी भक्तिमार्ग व योगमार्ग या दोन मार्गानेच जाणे जास्त श्रेयस्कर, तरीपण सद्भक्तांना ज्ञानमार्गाची थोडीशी तोंडओळख व्हावी, थोडासा परिचय व्हावा, इतकीच ज्ञानमार्गाची माहिती येथे देत आहे.

प्रथम आपले मन विचारशून्य करावे. ज्ञानमार्गाची ही पहिली पायरी होय.

दहा इंद्रिये, मन, बुद्धी, चित्त व अहंकार यांच्या पलीकडे असणारा 'मी कोण' याचा शोध घेण्याचा प्रयत्न करावा.

साधक जेव्हा असा प्रयत्न सुरू करतो, तेव्हा त्याला आपल्या बंद नेत्रामध्ये दिसणाऱ्या अंधारापलीकडे काय असेल, हे जाणण्याची उत्सुकता असते. या अंधाराला '**भूताकाश**' असे म्हणतात.

विचारशून्य अवस्थेमध्ये तो या अंधारात बुडी मारतो. जन्मोजन्मींची पुण्याई व ईश्वरीकृपा साथ देत असेल, तर साधक या अंधाराच्या पलीकडील क्षेत्रांत प्रवास करू शकतो, साधकाचे अंतरंग प्रकाशित होते. या प्रकाशित अवस्थेला '**चित्ताकाश**' असे म्हणतात.

या अवस्थेमध्ये असंख्य देव-देवतांचे दर्शन होते.

विचारशून्य, कल्पनाशून्य व देह-अहंताविरहित, अत्यंत विनयशील असा साधक अनेक देव-देवतांचे दर्शन घेत चित्ताकाशाचा प्रांत पार करतो. नंतर त्याचा **चिदाकाशात** प्रवेश होतो. येथे त्याला ब्रह्माचा साक्षात्कार होतो. हळूहळू त्याच्यामध्ये '**अहं ब्रह्मास्मि**', '**मी ब्रह्म आहे**' हा भाव उदय पावतो.

**'अहं ब्रह्मास्मि'** म्हणजे **'मी ब्रह्म आहे'**, यालाच सोप्या भाषेत **'शिवोऽहम्'** असे म्हणतात. म्हणजे 'मीच शिव आहे' किंवा 'मीच ब्रह्म आहे' किंवा 'मीच ईश्वर आहे' असा भाव मनात उदय पावतो. येथे अनेक साधक फसतात. कारण **'अहं ब्रह्मास्मि'** किंवा **'मी ईश्वर आहे'** यातील **'मी'** नाहीसा झालेला नसतो.

**'अहं ब्रह्मास्मि'** च्या मायाजालातून जे साधक पुढे सरकतात, त्यांना 'तत् त्वम् असि' असा साक्षात्कार होतो. **'तत् त्वम् असि'** म्हणजे **'ते तू आहेस !'**

येथे **'मी'** पणाची जाणीव साधक विसरू लागतो; परंतु **'तू'** पणाची जाणीव कायम राहाते. हा सर्व विषय अनुभवगम्य आहे. त्यामुळे सोप्या भाषेत सांगणे कठीण आहे. 'मी' पणाची जाणीव विसरल्यानंतर 'तू' पणाच्या जाणिवेत साधक येतो व 'मी-तू' पणाची जाणीव विसरल्यानंतर साधक **'प्रज्ञानम् ब्रह्म'** या अवस्थेत येऊन पोहोचतो. तेथे त्याची दृष्टी ज्ञानमय होते. त्याला अनेक प्रकारचे ज्ञान होऊ लागते व त्याला **'सर्वम् खल्विदम् ब्रह्म'** असा साक्षात्कार होतो. येथे त्याचा आध्यात्माचा ज्ञानमार्ग संपतो. या संपूर्ण विश्वामध्ये एका ब्रह्माशिवाय दुसरे काहीही नाही, असा अनुभव त्याला येतो.

## भक्तिमार्ग

भक्तिमार्गी साधकाने आपल्या आवडत्या देवतेचे नामस्मरण सतत करीत रहावे. नामस्मरणाला काळ-वेळेचे बंधन नसते. येता-जाता, उठता-बसता, देता-घेता, खाता-पिता सदैव ईश्वर नामस्मरण करीत रहावे. असे केल्याने चित्ताची शुद्धी होते व ईश्वरी साक्षात्कारही होऊ शकतो.

ईश्वर नामस्मरण सुरुवातीला फक्त आपल्यालाच ऐकू येईल, असे करावे. अनेक महिने असा अभ्यास केल्यावर मनातल्या मनात नामस्मरण करणे शक्य होते.

भक्तिमार्गी साधकाने दान व परोपकार सतत करीत रहावे; कारण दान व परोपकार केल्याने प्रारब्ध शुद्ध होते व परमार्थात प्रगती होते.

भक्तिमार्गी साधकाने एखाद्या स्तोत्राचे दररोज किमान ३६ पाठ करावेत. गणपती, दुर्गा किंवा दत्त यापैकी एखाद्या देवतेचे एक लहानसे स्तोत्र निवडावे व त्याचे दररोज किमान ३६ पाठ करावेत. स्तोत्राच्या पठणाने देवता भक्तावर प्रसन्न होते व सतत संरक्षण करीत राहते.

अशा प्रकारे भक्तिमार्गाचे अनुसरण केले असता आध्यात्मात प्रगती होते.

## मंत्रयोग

कुठल्याही मार्गाने ईश्वराच्या दिशेने वाटचाल करणाऱ्या साधकाला कुठल्या ना कुठल्या रूपाने मंत्रयोगाचा आधार घ्यावाच लागतो.

साधनेमध्ये अनेक प्रकारची विघ्ने साधकाच्या प्रारब्धानुसार निर्माण होत असतात व ही विघ्ने दूर करण्यासाठी मंत्रयोगाचा आधार घ्यावा लागतो.

**ॐ सर्वं बाधा प्रशमनम् त्रैलोक्यैस्य अखिलेश्वरि ।**

**एवमेव त्वया कार्यम् अस्मद् वैरि विनाशनम् ।।**

या मंत्राचा साधकाने दररोज किमान पाच मिनिटे जप करावा. याने सर्व प्रकारच्या बाधा व विघ्ने दूर पळतात.

मंत्रजपाची साधना करणाऱ्या साधकाला प्रथम आसन सिद्ध करावे लागते. न हलता, न डुलता एकाच आसनावर सहजतेने साडेतीन तास बसता येऊ लागले की, आसनसिद्धी प्राप्त होऊ लागते. आसनसिद्धी प्राप्त झाल्यावर अनेक प्रकारच्या **अतिंद्रिय** गोष्टींचे ज्ञान होऊ लागते.

दररोज किमान ११ हजार मंत्रजप करावा लागतो. ज्या देवतेचा मंत्रजप आपण करणार असतो ती देवता सात्त्विक असावी. तामस देवतांच्या (काली, तारा, भैरव इ.)

साधनेमध्ये खूप विघ्ने येतात. साधकांना वेड लागण्याची शक्यता असते.

**सात्त्विक देवता –** लक्ष्मी, विष्णू, सरस्वती, गायत्री, शिव, राम, कृष्ण इत्यादी देवतांची साधना करताना सहसा विघ्ने येत नाहीत व विघ्ने आली तरी ती परीक्षा पाहण्याकरताच असतात.

अशा प्रकारे साधक जेव्हा एकाच आसनावर बसून मंत्रजप करू लागतो, तेव्हा जर सत्पुरुषांचे आशीर्वाद पाठीशी असतील किंवा ईश्वरीकृपा असेल तर त्या साधकाला काही दिवसांतच दिव्य सुगंध येऊ लागतात. त्याच्या आसपास जणू काही अत्तराच्या अनेक बाटल्या ओतल्या आहेत असे जाणवते. मंत्रसिद्धीचे हे पहिले लक्षण आहे.

नंतर दिव्य नाद ऐकू येतात. पायातील नुपुरांचे आवाज ऐकू येतात. आपल्या अवतीभोवती कोणीतरी फिरत आहे, असे जाणवते. क्वचित प्रसंगी देवतेच्या मनोहर चरणकमलांचे दर्शनही होते. मंत्रसिद्धीचे हे दुसरे लक्षण आहे.

यानंतर देवता साक्षात् प्रकट होते व साधकाला वर प्रदान करते. येथे मंत्र सिद्ध होतो.

मंत्रयोगाचे सर्वसाधारण स्वरूप हे असे आहे.

मंत्रसाधना करताना खालील काही गोष्टी लक्षात ठेवाव्यात.

१. मंत्र शक्यतो लहान असावा.

२. एखाद्या सिद्धपुरुषाकडून मंत्र घेणे जास्त चांगले, कारण त्यामुळे सिद्धपुरुषाचे संरक्षण प्राप्त होत असते.

३. साधना करताना पोट रिकामे असावे.

४. भित्र्या लोकांनी साधना करू नये. पुष्कळवेळा साधना करताना अचानक सर्प किंवा विंचू अंगावर येण्याची शक्यता असते. साधनामार्गातील ही परीक्षा असते.

५. मंत्रसाधना करताना दररोज हवन करावे. मंत्राला 'स्वाहा' पल्लव लावून गाईच्या तुपाने १०८ आहुत्या द्याव्यात. याने मंत्रसिद्धी होण्यास मदत होते. याशिवाय हवन केल्याने म्हणजे अग्नित आहुती दिल्याने वायुमंडल शुद्ध होते. म्हणून सद्भक्ताने अधूनमधून आपल्या घरात हवन करीत रहावे, म्हणजे दुष्ट स्पंदने आपल्या घरात शिरकाव करू शकत नाहीत.

हवनाचे मुख्य तीन प्रकार असून, अग्नित आहुती दिल्यानंतर ज्या पदार्थांचा चर्रर्र असा आवाज होतो, अशी हवन द्रव्ये म्हणजे मध, दूध, जल इत्यादी अशा आहुतींनी भूत-प्रेत पिशाच्च तृप्त होतात. घरातील त्यांचे उपद्रव नाहीसे

होतात. म्हणून अशा प्रकारच्या हवनाला '**भूतयज्ञ**' असे म्हणतात.

जे पदार्थ अग्नित पडल्यावर तड् तड् असा आवाज करतात, म्हणजे तांदूळ, तीळ, जव इत्यादी. अशा हवनाने पितृलोकातील अतृप्त आत्मे तृप्त होतात. म्हणजे हे हवन पितरलोकापर्यंत जाऊन पोहोचते. म्हणून अशा हवनाला '**पितृयज्ञ**' असे म्हणतात.

जो पदार्थ अग्नित घातल्यावर कसलाही आवाज करीत नाही व ज्वाला एकदम भडकतात असा पदार्थ म्हणजे तूप ! तुपाने यज्ञ केल्याने देवता तृप्त होतात. हे हवन स्वर्गलोकापर्यंत जाऊन पोहोचते. स्वर्गातील देवता या हवनाने तृप्त होतात म्हणून या हवनाला '**देवतायज्ञ**' म्हणतात. म्हणून प्रत्येक व्यक्तीने आपल्या घरात तुपाचे हवन करीत रहावे.

अग्नि पेटवण्याकरिता समिधा, शेणी व कापूर यांचा वापर करावा.

समजा तुम्ही '**ॐ द्रां दत्तात्रेयाय नमः**' या मंत्राचा जप करीत आहात, तर हवन करताना '**ॐ द्रां दत्तात्रेयाय नमः ॐ स्वाहा**' असे म्हणून अग्नित तुपाची आहुती द्यावी.

# समाप्त

**परोपकारार्थं इदं शरीरम्।**

**ईश चिंतनार्थं इदं मनः ।**

**विवेकार्थं इदं बुद्धिः ।**

**ब्रह्मज्ञानार्थ जीवनम् ।।**

शरीर परोपकार करण्यासाठी आहे.

मन ईश्वर चिंतनासाठी आहे.

बुद्धी, चांगले - वाईट (विवेक)

यांचा विचार करण्यासाठी आहे.

**जीवन हे ब्रह्मज्ञानाच्या प्राप्तीसाठी आहे.**

**- श्री स्वामी दत्तावधूत**